रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २३३ । पृष्ठे १० ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६

किंमत ५ ₹

## कोर्ट रूममध्ये आत्महत्येचा प्रयत्न

**पनवेल** : पनवेल न्यायालयातील कोर्ट रूममध्ये राजेश परदेशी याने फिनेलसदृश्य द्रव्य पिऊन आत्महत्या केल्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. त्याला पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. राजेश याचा नातेवाईकांसोबत दिवाणी न्यायालयात दावा सुरू होता. त्यातूनच त्याने हा प्रकार केल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. राजेश करंजाडे येथे राहात असून, त्यांचा जमिनीसंदर्भात वाद सुरू आहे. यासंदर्भात पनवेलमधील दिवाणी न्यायालयात दावाही सुरू होता. या प्रकारामुळे त्रस्त असलेल्या राजेशने बुधवारी पान २ वर

## भीषण अपघातात एकाचा मृत्यू

**पनवेल** : पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्यावर शुक्रवारी एका अनियंत्रित इको कारने भीषण अपघात घडवला. या अपघातात एका पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला असून, परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास कार्यास सुरुवात केली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज एक इको कार चालक पनवेल रेल्वे स्टेशनच्या दिशेने जात असताना अचानक त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटले. तिने रस्त्यावरील एका ऑटो-रिक्षाला जोरदार धडक दिली आणि त्यानंतर पुढे पान २ वर

# छुपी युती, उघड सौदेबाजी

## चेंढरे, शहापूरमध्ये निकटवर्तीयांचा बळी




। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

राजकारणात सत्तेसाठी तडजोडी होत असतात; पण त्या तडजोडी जर थेट निष्ठावंत कार्यकर्ते, आपलेच कुटुंबीय आणि विश्वासू सहकाऱ्यांच्या बळीवर होत असतील, तर तो केवळ राजकारणाचा खेळ न राहता, तो निर्लज्ज सत्तालालसेचा नमुना ठरतो. भाजप-शिंदे गटातील सध्याची स्थिती नेमकी अशीच असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात उघडपणे सुरू आहे. आपल्या कुटुंबातील उमेदवार निवडून आणण्यासाठी भाजप-शिंदे गटाच्या नेत्यांनी निष्ठावंतांचा बळी देत उघड सौदेबाजी केल्याचे आरोप आता दबक्या आवाजात न राहता जाहीरपणे चर्चेत आले आहेत. स्थानिक आमदाराने आपल्या सुनेला जिल्हा परिषदेत निवडून आणण्यासाठी भाजपच्या तगड्या उमेदवारासोबत थेट सत्तासमझोता केल्याची चर्चा आहे. भाजपच्या प्रियदर्शनी पाटील यांच्यासमोर टिकाव लागणार नाही, या भीतीने आमदारांनी सौदेबाजी केल्याने प्रियदर्शनी पाटील यांनी माघार घेत जिल्हा परिषदेवरुन थेट पंचायत समितीवर उडी मारली आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सत्तावाटपाचे आमिष दाखवत, मदतीच्या नावाखाली राजकीय देवाणघेवाण करण्यात आली असल्याचे समोर आले आहे. या सौद्यामध्ये सर्वाधिक फटका मोठ्या अपेक्षेने शिंदे गटात प्रवेश केलेल्या चेंढरेतील मृणाल पाटील कुटुंबियांना बसला आहे.

संघर्ष आणि स्थानिक पातळीवरील ताकद असूनही, केवळ कौटुंबिक हितासाठी त्यांना बाजूला सारण्यात आल्याची खदखद कार्यकर्त्यांमध्ये स्पष्टपणे दिसून येत आहे. ''घरातली उमेदवारी सुरक्षित, बाहेरचे कार्यकर्ते संपवायचे'' हेच सूत्र या राजकारणामागे असल्याचा आरोप होत आहे. दुसरीकडे, भाजपमधील काही नेत्यांची स्थितीही तितकीच धक्कादायक आहे. स्वतःच्या निवडणुकीबाबत शाश्वती नसल्याने त्यांनी थेट आपल्या भावाचाच राजकीय बळी दिल्याची चर्चा आहे. केवळ स्वतःचा मार्ग मोकळा करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसला अंतर्गत सहकार्याचे आश्वासन देण्यात आले, अशी दबक्या आवाजातील कबुली कार्यकर्त्यांकडून दिली जात आहे. सार्वजनिकपणे एक भूमिका आणि आतून दुसरी, असा दुटप्पी चेहरा आता उघड होत आहे. या संपूर्ण घडामोडींमुळे भाजप-शिंदे गटातील निष्ठा, प्रामाणिकपणा आणि तळागाळातील कार्यकर्त्यांचे महत्त्व या घोषणांचा बुरखा गळून पडला आहे. निवडणूक जिंकण्यासाठी जर स्वतःच्या कुटुंबातील लोक, जुने सहकारी आणि निष्ठावंत कार्यकर्तेही वापरून फेकले जात असतील, तर अशा नेतृत्वावर जनतेने विश्वास ठेवायचा तरी कसा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पान २ वर



## वेधक

### ट्रकने एकाला चिरडले

**पनवेल** : पनवेलजवळील मुंब्रा-पनवेल महामार्गावरील रोडपाली बौद्ध वाडाजवळून नावडा फाट्याकडे मोटारसायकलवरून जात असताना एक भरधाव ट्रक दुचाकीस्वाराच्या डोक्यावरून गेल्याने अत्यंत भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की, मोटारसायकल पूर्णपणे चिरडली गेली असून, मृत व्यक्तीच्या डोक्याचा चेंदामेंदा झाला. गंभीर जखमांमुळे त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. विशेष म्हणजे, याच रोडपाली परिसरात अवघ्या दोन दिवसांपूर्वी एका महिलेचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. वारंवार अपघात होत असतानाही प्रशासनाकडून पान २ वर

### अल्पवयीन मुलाचे अपहरण

**पनवेल** : खांदेश्वर रेल्वे स्टेशन जवळील झोपडपट्टी परिसरातून एका १५ वर्षीय मुलाचे अज्ञात इसमाने अज्ञात कारणावरून फूस लावून कायदेशीर राखवलीतून पळवून नेल्याने अज्ञात इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार नोंद करण्यात आली आहे. या मुलाचे नाव ईरवी सुरजसिंग रजगौड (१५) असून, त्याचा रंग. सावळा, उंची. अंदाजे ४.४ फूट. नेसणीस, पांढऱ्या रंगाचा शर्ट, काळ्या रंगाची जीन्स पॅन्ट. दोन्ही गालवार विरळ जशी जन्म खुणेची निशाणी आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक महेंद्र डोके यांच्याशी संपर्क साधावा.

### पुन्हा एकदा धमकीचा मेल

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची पुन्हा धमकी देण्यात आल्याने एकच खळबळ उडाली. दुपारी सुमारे तीन वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत ई-मेलवर धमकीचा संदेश प्राप्त झाल्याची माहिती आहे. यानंतर तात्काळ अहिल्यानगर पोलिसांच्या बॉम्ब शोधक व नाशक पथकाने जिल्हाधिकारी कार्यालय परिसराची सखोल तपासणी केली. तपासणीदरम्यान कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. उल्लेखनीय म्हणजे, यापूर्वीही एकदा जिल्हाधिकारी कार्यालय उडवून देण्याची धमकी देण्यात आली होती. पोलिसांकडून धमकी देणाऱ्याचा शोध सुरू आहे.

### विमान बॉम्बने उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली** : कुवेतहून दिल्लीला जाणाऱ्या इंडिगोच्या विमानाला बॉम्बने उडवण्याची धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली. धमकी मिळाल्यानंतर विमानाचे अहमदाबादमध्ये आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. टिश्यू पेपरवर लिहिलेल्या चिठ्ठीत ही धमकी देण्यात आली. अहमदाबाद येथील विमानतळावर विमानाचे सुरक्षित लँडिंग करत विमानाची तपासणी सुरू करण्यात आली. धमकीची चिठ्ठी सापडल्यानंतर वैमानिकाने हवाई वाहतूक नियंत्रणाला सूचना दिली. विमान तात्काळ अहमदाबाद येथील विमानळावर वळवण्यात आले. विमानात एकूण १८० प्रवासी होते. सर्व प्रवाशांच्या सामानाची कसून तपासणी करण्यात आली. तपासणीत प्रवाशांकडे कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही.



● शेकाप-महाविकास आघाडीच्या चेंढरे जिल्हा परिषद मतदारसंघाच्या उमेदवार प्रविणा घासे आणि आक्षी पंचायत समितीचे उमेदवार प्रफुल्ल पाटील यांच्या प्रचाराचा शुभारंभ आक्षी येथील काळंबा देवीच्या मंदिरात नारळ वाढवून करण्यात आला. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, आक्षी सरपंच रश्मी पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अधिकचे वृत्त पान ३ वर

## सुनेत्रा पवार होणार उपमुख्यमंत्री?

### आज राष्ट्रवादीची मुंबईत महत्त्वपूर्ण बैठक

। मुंबई । प्रतिनिधी ।

अजित पवार यांच्या निधनाला तीन दिवस उलटले नाहीत तोवर राज्यात उपमुख्यमंत्री पदाबाबत राजकीय हालचालींना वेग आला आहे. दरम्यान, सुनेत्रा पवार यांच्या नावाची उपमुख्यमंत्री पदासाठी चर्चा सुरू आहे. शुक्रवारी सकाळी राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी अजितदादांकडे असणारी खाती राष्ट्रवादीला मिळावीत, सुनेत्रा पवार यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद द्यावे, अशी मागणी केल्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. उद्या शनिवारी राष्ट्रवादीच्या विधिमंडळ सदस्यांची बैठक बोलावली असून, त्यामध्ये बाकीचे निर्णय होतील, असेही भुजबळ म्हणाले.



शुक्रवारी राष्ट्रवादीच्या सुनील तटकरे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीनंतर छगन भुजबळांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यात ते म्हणाले की, अजितदादा गेले, ते प्रत्यक्ष तिथे जाऊन पाहिले त्यानंतर झोप उडाली आहे. मात्र, शेवटी शो मस्ट गो ऑन असं आहे. त्यामुळे कुणातरी ही सगळी जबाबदारी पक्ष असेल, सरकार असेल, हे पुढे चालवायला हवे. त्यामुळे उद्या शनिवारी विधिमंडळाचे जे सदस्य आहेत, त्यांची बैठक बोलावली आहे. त्यात विधिमंडळ नेतेपद जे अजितदादांकडे होते, त्या पदाबाबत निर्णय होईल, असं त्यांनी सांगितले. तसेच अनेक लोकांच्या सूचना पुढे येत आहेत. त्या रास्त आहेत. सुनेत्रा पवार यांच्याकडे हे पद द्यावे, अशी अनेकांची मागणी आहे. ते चूक आहे, असं वाटत नाही. ते करायला पाहिजे, पण शेवटी निर्णय हा पक्षाच्या बैठकीत होईल. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत माहिती नाही. सध्या अजित पवारांची राष्ट्रवादी आहे, त्याची कामे पुढे नेण्यावर लक्ष देत आहोत. उपमुख्यमंत्रीपदाची जागा रिक्त आहे. ती ताबोडतोब सुनेत्रा वहिनींच्या द्वारे कशी भरता येईल त्याकडे आमचे सगळ्यांचे लक्ष आहे. पान २ वर

## लाच घेणे पडले महागात

### नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सिडको ट्रान्सफरचे काम करून देण्यासाठी तब्बल दोन लाख रुपयांची लाच स्वीकारणे शासकीय अधिकाऱ्यासह त्याच्या खासगी साथीदाराला चांगलेच महागात पडले आहे. नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी (दि. २८) सापळा रचत लाच घेताना दोघांनाही रंगेहाथ पकडले. या कारवाईत सिडको विभागीय कार्यालयातील प्रभारी सहाय्यक वसाहत अधिकारी यांचा समावेश असून, या घटनेमुळे सिडको कार्यालयातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा उघडकीस आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे व्यवसायाने कॉन्ट्रॅक्टर असून, ते सोसायटी रजिस्ट्रेशन तसेच सिडको ट्रान्सफरची कामे करतात. सानपाडा येथील एका सदनिकेचे सिडको ट्रान्सफर करण्यासाठी तक्रारदाराने ११ जून २०२५ रोजी ऑनलाइन पद्धतीने सिडको कार्यालयात अर्ज सादर केला होता. मात्र, हे काम करून देण्यासाठी सिडको विभागीय कार्यालयातील प्रभारी सहाय्यक वसाहत अधिकारी शैलेश आत्माराम घरत यांनी तक्रारदाराकडे चार लाख रुपयांच्या लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. या बेकायदेशीर मागणीला कंटाळून तक्रारदाराने अखेर नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे २२ जानेवारी रोजी लेखी तक्रार दाखल केली. तक्रारीचे गांभीर्य लक्षात पान २ वर

## प्रशासनाकडून स्वच्छतेचा दिखावा

### जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात कचऱ्याचा ढिगारा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

स्वच्छता राखण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून सातत्याने केले जाते. मात्र, 'दुसऱ्या शिकवे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण' अशी अवस्था सध्या अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयाची झाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातच अपर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जुन्या इमारतीलगत मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचा ढिगारा साचल्याचे चित्र समोर आले आहे. जुनी कागदपत्रे, विविध प्रस्ताव आणि खराब झालेल्या फाईली यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्याबाबत प्रशासन उदासीन ठरल्याने प्रशासनाकडून केवळ स्वच्छतेचा दिखावा केला जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.



अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात स्वच्छता राखण्याचे प्रयत्न केल्याचा दावा प्रशासनाकडून केला जातो. मात्र, प्रत्यक्षात जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर आणि आवारात अनेक वेळा कचऱ्याचे ढिगारे दिसून येतात. पर्यावरणाचा समतोल राखणे, नागरिकांचे आरोग्य सुदृढ ठेवणे आणि स्वच्छ परिसर निर्माण करणे यासाठी जिल्हा प्रशासन स्तरावर सातत्याने बैठका घेतल्या जातात. विविध उपक्रम, अभियान पान २ वर


## २५ हजारांचा गांजा जप्त

### दोन आरोपी अटकेत

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल शहरात वाहतूक नियमांची अंमलबजावणी करत असताना पनवेल वाहतूक शाखेने अमलीपदार्थ विरोधी कायद्यान्वये महत्त्वाची कारवाई केली आहे. अंमलीपदार्थ विरोधी कायद्यान्वये पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस नाईक राकेश राजपूत, वाहतूक शाखा पनवेल शहर, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे विना हेल्मेट वाहन तपासणी करत असताना व्हिस्पा कंपनीची स्कुटर क्रमांक एमएच ०५ ईबी ६१८३ संशयास्पदरीत्या थांबविण्यात आली. तपासणीदरम्यान स्कुटरच्या डिक्कीतून सुमारे २५,००० रुपये किंमतीचा २९ ग्रॅम वजनाचा उग्र वास असलेला हायड्रो गांजा आढळून आला. या प्रकरणी पुढील तपास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण फडतरे व सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. कारवाईदरम्यान एकूण सुमारे १ लाख



५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यामध्ये २९ ग्रॅम गांजा (२५,००० रुपये), व्हिस्पा स्कुटर (७५,००० रुपये) व आयफोन १४ प्रो (५०,००० रुपये) यांचा समावेश आहे. या प्रकरणातील आरोपी केतन गिरीश मालू (वय २२, रा. खांदा कॉलनी, पनवेल) यास अटक करण्यात आली असून त्यास न्यायालयात विहित वेळेत हजर करण्यात येत आहे. पान २ वर

### स्थलांतरित मतदारांवर उमेदवारांची भिस्त | मनधरणीसाठी जोरदार हालचाली

# रायगडात राजकीय वातावरण तापले

धम्मशील सावंत

। पाली / बेणसे ।

मुंबई, ठाणे आणि पुण्याच्या सीमेवर वसलेल्या रायगड जिल्ह्यात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. पोटापाण्यासाठी कामानिमित्त मुंबई, ठाणे, पुणे, गुजरात तसेच इतर राज्यांमध्ये स्थलांतरित झालेल्या मतदारांवर यंदाच्या निवडणुकीत उमेदवारांची विशेष भिस्त आहे. या स्थलांतरित मतदारांची संख्या लक्षणीय असून, त्यांचा मतदानातील सहभाग एखाद्या उमेदवाराच्या विजयावर अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम करणारा ठरू शकतो. त्यामुळेच सर्वच पक्षांचे उमेदवार, राजकीय पुढारी आणि कार्यकर्ते सध्या या मतदारांच्या संपर्कात राहण्यावर भर देताना दिसत आहेत.

> **मतदार नोंदणी गावी असल्यामुळे मतदानासाठी गावी जाणे आवश्यक आहे. उमेदवारांचे कार्यकर्ते संपर्कात असून, येण्या-जाण्याची सोय सांगितली आहे. मतदान हा आपला हक्क असल्यामुळे जाण्याचा प्रयत्न करणार आहे.**
> **-स्थलांतरित मतदार (मुंबईत कार्यरत कामगार)**

> **कामासाठी बाहेर गेलो असलो तरी मतदानासाठी गावी बोलावले जात आहे. येण्याची सोय केली तर आम्ही नक्की मतदान करणार आहोत.**
> **-आदिवासी वाडीतील नागरिक**

रायगड जिल्ह्यातील अनेक गावांमधील तरुण, कामगार, कुटुंबप्रमुख रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतरित झाले आहेत. मात्र, मतदार नोंदणी मूळ गावीच असल्याने निवडणुकीच्या काळात हेच मतदार निर्णायक ठरतात. ही बाब लक्षात घेऊन उमेदवारांकडून स्थलांतरित मतदारांची यादी तयार करण्यात आली आहे. प्रत्येक बूथनिहाय मतदार यादी तपासून कोणता मतदार कुठे स्थलांतरित झाला आहे, याची माहिती संकलित केली जात आहे.

उपलब्ध माहितीनुसार, त्या मतदारांशी थेट संपर्क साधून मतदानासाठी गावी येण्याची विनंती केली जात आहे. ज्यांचा थेट पत्ता किंवा संपर्क क्रमांक मिळत नाही, अशा मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी त्यांच्या नातेवाईकांचा आधार घेतला जात आहे. 'आपण तुमच्या संपर्कात आहोत, आम्हाला विसरू नका,' अशा स्वरूपाचा संदेश देण्यासाठी कबड्डी, क्रिकेट स्पर्धा, सामाजिक कार्यक्रम आणि छोट्या मेळाव्यांचा आधार घेतला जात आहे. काही ठिकाणी स्वतः उमेदवारही स्थलांतरित मतदारांच्या भेटीगाठी घेत असल्याचे चित्र आहे.

स्थलांतरित मतदारांना मतदानासाठी गावी आणणे ही मोठी कसरत मानली जात आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांकडून नियोजन सुरू आहे. मतदानाच्या आदल्या दिवशी किंवा मतदानाच्या पान २ वर

PRAKRUTI RESORTS PVT. LTD.

**जॉब व्हॅकेन्सी**

**प्रकृती रिसॉर्ट्स प्रा. लि. (४ स्टार रिसॉर्ट)**

१) रिसेपशनिस्ट- फ्रंट ऑफीस
२) साऊथ इंडियन शेफ- एफ अँड बी प्रोडक्शन
३) पब्लिक रिलेशन मॅनेजर

**पगार- इंडस्ट्री स्टॅंडर्डनुसार**

**संपर्क** : ७३५०३२९८६९/८६९८३२८१४०
मुलाखत वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी ०४.००
जेवणाची व राहण्याची व्यवस्था रिसॉर्टकडून केली जाईल.

पत्ता : मु. पो. काशिद, ता. मुरुड, जि. रायगड-महाराष्ट्र ४०२ ४०१

# वरसगाव-भिरा फाटा 'अपघातांचा सापळा'



**• प्रशासनाची उदासीनता जीवघेणी**

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वरसगाव-भिरा फाटा सध्या अपघातांचे केंद्र बनला असून, वेगावर नियंत्रण आणण्यासाठी बसविण्यात आलेले गतिरोधकच आता प्रवाशांसाठी जीवघेणे ठरत आहेत. अवघ्या आठ दिवसांपूर्वी एकाच दिवशी दोन दुचाकी अपघात घडून वाहनचालक गंभीर जखमी झाले. या ठिकाणी अंडरपासऐवजी केवळ गतिरोधक बसविण्यात आल्याने अपघात टाळण्याऐवजी धोका अधिक वाढला असून, भविष्यात एखाद्या निष्पाप प्रवाशाचा बळी गेला तर याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल प्रवासी व स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील अनेक लहान गावांमध्ये अंडरपासची सोय करण्यात आली असताना, मुरुड-पुणे राज्यमार्गाला जोडणाऱ्या सतत वर्दळीच्या वरसगाव फाट्यावर ही सुविधा का डावलण्यात आली, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. महामार्गाच्या सर्वेक्षणात मोठी त्रुटी राहिल्याचा आरोपही प्रवासी वर्गाकडून केला जात आहे.

महामार्गाचे चौपदरीकरण पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील वाहनांचा वेग आणखी वाढणार असून, त्यामुळे वरसगाव-भिरा फाट्यावर अपघातांचा धोका दुपटीने वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे गतिरोधकांऐवजी या ठिकाणी तातडीने वाहतूक सिग्नल किंवा सुरक्षित पर्यायी व्यवस्था उभारावी, अन्यथा प्रशासनाच्या निष्काळजीपणाची किंमत निष्पाप जीवांना मोजावी लागेल, अशी कडक मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

## मंगळसूत्र खेचून चोरटे पसार

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

५५ वर्षीय महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून चोरटे पसार झाले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मंजुळा दमडे या भंगारपाडा येथे राहत असून, त्या माहेरी पारगाव येथून भंगारपाडा येथे पायी चालत जात होत्या. दापोली-भंगारपाडा रोडने पुष्पक नगर सेक्टर तीन येथे आले असता पाठीमागून आलेल्या अनोळखी ईसमाने त्यांना धक्का दिला आणि त्या खाली पडल्या. यावेळी त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र खेचून तो पळून गेला. चाळीस ग्राम वजनाच्या मंगळसूत्रापैकी एका बाजूचा तुकडा बारा ग्राम वजनाचा त्याने चोरून नेला आणि २८ ग्रॅम वजनाचा तुकडा दमडे यांच्या हातातच राहिला आणि चोर तेथून पळून गेला.

# नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळाची बिनविरोध निवड



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल येथील नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळ (रजि.) यांची सन २०२५-३० या कालावधीसाठी नूतन पदाधिकारी व कार्यकारिणीची बिनविरोध निवड नुकतीच पार पडली. मंडळाची पहिली त्रैमासिक सभा रविवार रोजी सेक्टर १/एस, प्लॉट नं. १३६ बी, शबरी हॉटेलजवळील मंडळाच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

सभेच्या सुरुवातीस सुवर्णकार समाजाचे आराध्यदैवत शिरोमणी संत श्री नरहरी सोनार महाराज यांच्या प्रतिमेला नवनिर्वाचित अध्यक्ष श्री छोटुलाल दामुशेठ मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. सन २०२०२५ या कार्यकाळाची समाप्ती झाल्याने नवीन कार्यकारिणीच्या निवडीसाठी ही सभा आयोजित करण्यात आली होती. निवड प्रक्रियेसाठी ज्येष्ठ संस्थापक सदस्य अशोक विसपुते यांची प्रभारी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

अशोक विसपुते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवडीत श्री छोटुलाल दामुशेठ मोरे (नेरुळ) यांची अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. उपाध्यक्षपदी हेमकांत पुरुषोत्तम सोनार, कार्याध्यक्षपदी धनराज विसपुते, सचिव विजय भामरे, कोषाध्यक्ष प्रवीण भामरे यांची निवड झाली. सहसचिव म्हणून शमिका सोनार व मनोज सोनार, सहकोषाध्यक्ष मिलिंद खरोटे तर सल्लागार म्हणून पुरुषोत्तम पोतदार यांची नियुक्ती करण्यात आली. नूतन कार्यकारिणीसमोर शिरोमणी संत नरहरी सोनार महाराज यांच्या नावाने सुवर्णकार समाज भवन उभारणी हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## नियमभंग करणाऱ्यांवर वाहनांवर कारवाई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**अडीच लाखांचा दंड वसूल**

दि. २८ जानेवारी २०२६ रोजी जिल्ह्यातील विविध २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मोहीम राबवली. या कारवाईत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २३३ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. संबंधितांकडून एकूण २ लाख ४५ हजार ७०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला असून, भविष्यातही अशी कारवाई सुरू राहणार असल्याचे सांगितले.

# ॲड. अविनाश ठाकूरना वाढता पाठिंबा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून, उमेदवार मतदारांपर्यंत पाहेचू लागले आहेत. मात्र मतदार हा राजा आहे. कुणाच्या पारड्यात मत टाकायचे हे मतदारावर अवलंबून आहे. महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार ॲड. अविनाश ठाकूर हे पेशाने वकील असल्याने त्यांना कायद्याचे ज्ञान आहे. त्यातच त्यांनी गेली अनेक वर्षे ग्रुप ग्राम पंचायत पिरकोनचे उपसरपंचपद भुषविले असल्याने त्यांना राजकीय अभ्यासाचा अनुभव आहे. तसेच ते विविध क्षेत्रातील तरुणांत मिळून मिसळून राहात आहेत. विशेष म्हणजे, सर्वांच्याच सुखदुःखात हिरीरीने सहभाग घेऊन योग्य तो मदतीचा हात पुढे करत असल्याने त्यांच्या दातृत्वाची स्थानिक मतदारांना जाण असल्यानेच तरुण मतदार हे ॲड. अविनाश ठाकूर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.

त्यातच या मतदार संघात शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना काँग्रेस या पक्षाच्या आघाडीमुळे त्यांचे पारडे अधिक जड आहे. एक उच्च शिक्षित तरुण उमेदवार जर शिवतीर्थवर निवडून गेला, तर या मतदार संघातील मतदारांना जे गढूळ पाणी प्यावे लागत आहे. ते पाणी पिण्याची वेळ तरी ॲड. अविनाश ठाकूर यांच्यासारख्या लोकप्रतिनिधी येऊ देणार नाही. हीच भावना आजच्या तरुण मतदारांमध्ये असल्याने ॲड. अविनाश ठाकूर यांना चिरनेर जि.प. मतदार संघातून विविध क्षेत्रातील तरुण मतदार जाहीर पाठिंबा देत त्यांच्या प्रचारार्थ संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत आहेत. मात्र, दोन्ही उमेदवार हे तुल्यबल्य असल्याने येथील मतदार हा मात्र योग्यच उमेदवारांची निवड करील.

## कोळंबी फार्मवर महिलेला मारहाण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील मिळकतखार येथील कोळंबी फार्मवर संवर्धनाचे काम सुरू असताना वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. फार्मच्या गेटवर जोरजोरात आवाज करणाऱ्या आरोपीला जाब विचारल्याने त्याने महिलेला शिवीगाळ व धमकी दिली. घटनेचा मोबाईल व्हिडीओ काढल्याचा राग धरून आरोपीने इतर दोघांना घटनास्थळी बोलावून घेतले. तिघांनी मिळून गेटजवळील विटांचे नुकसान केले तसेच लाकडी काठी व हाताबुक्क्यांनी महिलेला मारहाण केली. मांडवा सागरी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल आहे.

# शिरढोण विद्यालयात स्काऊट गाईड मेळावा

**। सुतारवाडी । प्रतिनिधी ।**

आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके माध्यमिक विद्यालय शिरढोण स्काऊट गाईड मेळावा आयोजित करण्यात आला होता. हा मेळावा कांचन मुकादम यांच्या शिरढोण येथील फॉर्म हाऊस येथे मंगळवारी (दि.२७) पार पडला. सी. एन. जी. पंपाचे संचालक घनश्याम मुकादम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. स्काऊट, गाईड यांनी आपल्या तंबूची उभारणी अतिशय काळजीपूर्वक व्यवस्थित केली. तसेच समोर सजावट करताना निसर्गाला कोणती हानी पोहोचणार नाही, याची काळजी घेतली.

शोभा यात्रेनंतर संध्याकाळी विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने भोजन तयार केले. मान्यवरांनी भोजनाचे परीक्षण केले. त्यानंतर भोजनाचा आस्वाद घेतला. रात्री शेकोटीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली. स्काऊट आणि गाईड विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना, कलागुणांना वाव देण्यासाठी, आपली संस्कृती संस्कृती जतन करण्यासाठी शेकोटीचा प्रोग्राममध्ये आपली कला सादर केली.

## स्वच्छतेकडे एक पाऊल पुढे!

**पनवेल** : पनवेल महानगरपालिकेतर्फे शहर स्वच्छ व सुंदर राखण्यासाठी रस्त्यावर कचरा न टाकता तो थेट घंटागाडीत टाकावा, यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात आली. शहरातील विविध चौक व व्यावसायिक गल्ल्यांमध्ये लाऊडस्पीकरद्वारे नागरिक व दुकानदारांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या. रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. ज्वेलरी बाजार परिसरात आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे यांच्या उपस्थितीत ही मोहीम राबविण्यात आली.

# चेक बँकेत वटवून ६५ हजारांची केली फसवणूक

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

चेक बँकेत वटवून ६५ हजार ७५० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

डॉ. आशिष बांदेकर हे पळस्पे येथे राहत असून सर्व डेंटल डॉक्टरांची पनवेल डेंटल नावाची कमिटी आहे. डेंटल वेल्फेअर असोसिएशनचा वाशी येथे कार्यक्रम होता. त्या ठिकाणी खर्चासाठी बँकेतून पैसे काढण्यासाठी ते बँकेत गेले होते. त्यांनी पनवेल बँकेत जाऊन चेक देऊन पैसे काढले आणि चेकबुक बँकेतच विसरून निघून गेले होते. त्यावेळी चेकबुक मध्ये दोन ते तीन रिकामे चेक सह्या केलेले होते. वाशी येथे कार्यक्रमाचे ठिकाणी चेकबुक पाहत असताना त्यांना चेक बुक मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी घरी फोन केला तर घरी चेकबुक नव्हते. बँकेत चेकबुक राहिले असेल म्हणून बँकेसोबत संपर्क साधला असता बँकेत चेकबुक असल्याचे समजले. त्यानंतर त्यांना काही वेळाने मोबाईलवर बँकेचा मेसेज आला आणि असोसिएशनच्या खात्यातून ६५ हजार ७५० रकमेचा धनादेश वटला गेल्याचे दिसून आले. त्यांच्या सभासदांने चेकचा वापर केला आहे का याची विचारणा केली असता त्यांनी चेकचा वापर केला नसल्याचे सांगितले.

# वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**



रसायनीतील चांभार्ली येथील रजत मुंढे यांच्या ३० जानेवारी रोजी साजऱ्या झालेल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. यानिमित्ताने जिल्हा परिषद मराठी शाळा, चांभार्ली तसेच देवळोली राजिप शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षणासोबत समाजहिताची जाणीव ठेवणारा हा उपक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

रजत मुंढे हे जे.एच. अंबानी स्कूल, लोधिवाली (रायगड) येथील विद्यार्थी असून, शालेय जीवनापासूनच त्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. लाँग जंप, बॅडमिंटन, १०० मीटर धावणे तसेच क्रिकेटमध्ये त्यांनी अनेक बक्षिसे मिळवली आहेत. बेलापूर सीबीडी येथे लेदर क्रिकेटमध्ये २०० धावांची खेळी करत त्यांनी विशेष ओळख निर्माण केली होती. वेताळ क्रिकेट चांभार्ली संघातून तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर त्यांची आयएसपीएलमध्ये निवड झाली. मागील सीझनमध्ये 'माझी मुंबई' संघाकडून खेळताना त्यांनी 'बेस्ट बॅट्समन' पुरस्कार पटकावला होता. खेळातील यशासोबतच समाजासाठी योगदान देण्याची भावना रजत मुंढे यांनी जपली आहे.

**पान १ वरून**

## भीषण अपघातात एकाचा मृत्यू

असलेल्या एका वॅगनआर कारलाही धडक दिली. त्यानंतर नियंत्रण सुटलेल्या या कारची एका पादचाऱ्याला धडक बसली, ज्यामध्ये त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून, रिक्षा चालकसुद्धा जखमी झाला आहे. या मयत इसमाचे नाव धर्मेंद्र चौधरी असे आहे. याबाबत पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## कोर्ट रूममध्ये आत्महत्येचा प्रयत्न

तारखेसाठी न्यायालयात गेल्यावर बाटलीतून आणलेले फिनेलसदृश्य द्रव्य कोर्ट रूममध्ये प्राशन केले. त्याला त्रास जाणवू लागल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर त्याला तात्काळ पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## ट्रकने एकाला चिरडले

कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. हा महामार्गाचा भाग अत्यंत अपघातप्रवण ठरत असून, येथे तातडीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर), सूचना फलक आणि वेग नियंत्रणाची व्यवस्था करण्याची गरज आहे. यासंदर्भात समाजसेवक सुभाष गायकवाड यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप केला आहे. प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास उपोषण करण्याचा इशारा सुभाष गायकवाड यांनी दिला आहे.
सतत होणाऱ्या अपघातांमुळे निष्पाप नागरिकांचे बळी जात असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून
मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला असून पुढील तपास सुरू आहे.

## छुपी युती, उघड सौदेबाजी

सत्तेच्या गणितात विचारधारा, नातेसंबंध आणि प्रामाणिक मेहनत सगळेच दुय्यम ठरत असल्याचे हे जिवंत उदाहरण आहे. आज बळी गेले ते कुटुंबीय आणि काही निष्ठावंत कार्यकर्ते असले, तरी उद्या हा फास कुणाच्या गळ्यात बसेल, हे सांगता येत नाही. भाजप-शिंदे गटातील ही छुपी युती आणि उघडी सौदेबाजी येणाऱ्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांचा रोष पेटवेल, की नेते पुन्हा एकदा सत्तेच्या जोरावर सगळे दाबून टाकतील, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

या सत्तासौद्यामध्ये मोठ्या अपेक्षेने शिंदे गटात प्रवेश केलेल्या चेंढरेतील पाटील कुटुंबियांचा आमदारांनी आपल्या राजकीय फायद्यासाठी बळी दिल्याची चर्चा सर्वत्र रंगली आहे. दुसरीकडे, भाजपच्या काही नेत्यांना स्वतःच्या निवडून येण्याबाबत शाश्वती नसल्याने त्यांनी थेट आपल्या भावालाच राजकीय बळी देत राष्ट्रवादीशी अंतर्गत सहकार्याचे गुप्त आश्वासन दिले असल्याचीही चर्चा आहे. सत्तेच्या गणितात नातेसंबंध, निष्ठा आणि कार्यकर्त्यांचे योगदान दुय्यम ठरल्याचे हे ठळक उदाहरण ठरत असून, दोन्ही गटांचा खरा चेहरा जनतेसमोर उघडा पडला आहे.

## सुनेत्रा पवार होणार उपमुख्यमंत्री?

बाकीचे पुढे बघता येईल. पक्षात लोक जे ठरवतील, त्याप्रमाणे होईल, असंही छगन भुजबळांनी म्हटलं. दरम्यान, उद्या विधिमंडळ सदस्यांची बैठक आहे. विधिमंडळ पक्ष नेता ठरवण्याचा निर्णय त्यात होईल. कदाचित एकमत झाले आणि निवड झाली तर उद्याच्या उद्या शपथविधीही होऊ शकतो, अशीही माहिती छगन भुजबळ यांनी दिली आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या रुपाने पहिलीच महिला उपमुख्यमंत्री महाराष्ट्राला मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

## २५ हजारांचा गांजा जप्त

सदर कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या आदेशाने करण्यात आली. या वेळी पोलीस नाईक राजपूत व पोलीस शिपाई बुट्टे यांनी सतर्कतेने काम करत शहरातील अमलीपदार्थ विक्रीविरोधात प्रभावी संदेश दिला आहे. पनवेल शहरात अमलीपदार्थांवर आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून अशाच धडक कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

## प्रशासनाकडून स्वच्छतेचा दिखावा

आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्याचा प्रयत्न जिल्हाधिकारी करतात. तालुका आणि गाव पातळीवर स्वच्छतेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेशही दिले जातात. मात्र, हेच प्रशासन स्वतःच्या कार्यालयाच्या आवारात स्वच्छतेबाबत अपयशी ठरत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याचा ढिगारा साचलेला असून, काही जुनी व खराब झालेली कागदपत्रे, दाखले आणि कार्यालयीन नोंदी यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट न लावता थेट कार्यालयाच्या आवारात टाकून ठेवण्यात आली आहेत. हा कचरा अनेक दिवसांपासून तसाच पडून असल्याने दुर्गंधी पसरली असून, परिसराचे विद्रूपकरण झाले आहे. विशेष म्हणजे, कचऱ्याचा ढिगारा असलेल्या परिसरात भूमीअभिलेख कार्यालयासह बाजूला वन विभागाचे कार्यालय असून, जिल्हा माहिती कार्यालयदेखील याच परिसरात आहे. त्यामुळे हा भाग नेहमीच अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांच्या वर्दळीचा असतो. अशा ठिकाणी कचऱ्याचा ढिगारा साचल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील या कचऱ्याच्या ढिगाऱ्यामध्ये पाल, विंचू तसेच अन्य विषारी प्राण्यांचा वावर वाढल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे नागरिकांसह कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

तथापि, प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या या आश्वासनांची प्रत्यक्षात कितपत अंमलबजावणी होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले असून, स्वच्छतेबाबत प्रशासनाने आधी स्वतः आदर्श निर्माण करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**नुकतीच परिसराची सफाई करण्यात आली होती. काही खराब झालेले कागदपत्रे आणि जुनी नोंदी फेकून देण्याबरोबरच त्यांची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी एकत्रितपणे जमा करण्यात आली आहेत. ही कागदपत्रे लवकरच येथून हटवली जातील.**

**– चंद्रसेन पवार, तहसीलदार**

## लाच घेणे पडले महागात

घेऊन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक धर्मराज सोनके यांनी तात्काळ पडताळणीची प्रक्रिया सुरू केली. पडताळणीदरम्यान लाचेची मागणी झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर विशेष पथकाच्या माध्यमातून सापळा रचण्याचा निर्णय घेण्यात आला.

ठरलेल्या योजनेनुसार नेरुळ येथील रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या हॉटेल नवमी येथे दोन लाख रुपयांची लाच स्वीकारण्यात येणार होती. बुधवारी दुपारी सुमारे अडीच वाजण्याच्या सुमारास तक्रारदाराकडून लाच रक्कम स्वीकारताना प्रभारी सहाय्यक वसाहत अधिकारी शैलेश घरत यांच्या सांगण्यावरून त्यांचा खासगी साथीदार नागेंद्र पांडे लाच घेत असताना नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दोघांनाही रंगेहाथ पकडले. याप्रकरणी प्रभारी सहाय्यक वसाहत अधिकारी शैलेश घरत आणि त्यांचा साथीदार नागेंद्र पांडे यांच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, शासकीय कामासाठी लाच मागणाऱ्यांना हा मोठा इशारा असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

## रायगडात राजकीय वातावरण तापले

दिवशी या मतदारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणावरून गावी आणण्यासाठी वाहतूक व्यवस्था, येण्या-जाण्याची सोय, भोजनाची व्यवस्था तसेच पुन्हा सुरक्षितपणे कामाच्या ठिकाणी पोहोचवण्याचे प्रयोजन केले जात असल्याचे बोलले जात आहे. या सर्व हालचालींमुळे रायगडच्या राजकारणात स्थलांतरित मतदार हे केंद्रस्थानी आले आहेत.

विशेष म्हणजे, रायगड जिल्हा हा आदिवासीबहुल जिल्हा असून, अनेक आदिवासी वाड्या-पाड्यांतील नागरिकही कामानिमित्त जिल्ह्याबाहेर स्थलांतरित झाले आहेत. दिवाळीनंतर मोठ्या प्रमाणात होणारे हे स्थलांतर लक्षात घेऊन सध्या आदिवासी मतदारांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्यांना मतदानासाठी आणण्यासाठी त्यांच्या कामाची, राहण्याची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था करण्याचे नियोजन सुरू असल्याची माहिती आहे. एकूणच, स्थलांतरित मतदारांचा सहभाग किती होतो, यावर रायगड जिल्ह्यातील निवडणुकीचे गणित अवलंबून राहणार असून, त्यामुळेच सर्वच पक्षांकडून या मतदारांसाठी विशेष प्रयत्न केले जात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

**स्थलांतरित मतदारांचा टक्का मोठा आहे. त्यांना मतदानासाठी आणणे आव्हानात्मक असले तरी नियोजन सुरू आहे. प्रत्येक मत महत्त्वाचे आहे.**

**– स्थानिक राजकीय कार्यकर्ता**

**पूर्वी गावातच मतदान होत असे. आता लोक बाहेर गेल्यामुळे निवडणुकीचे स्वरूप बदलले आहे. स्थलांतरित मतदारांचा कौलच निकाल ठरवेल.**

**– ज्येष्ठ नागरिक**

# महात्मा गांधींना कर्जत तालुका काँगेसचे अभिवादन

**। कर्जत । प्रतिनिधी ।**



(छायाचित्र : संजय गायकवाड)

कर्जत तालुका काँग्रेस समितीच्या वतीने आज राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कर्जत आमराई येथील आशीर्वाद सभागृहात महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजलीच्या कार्यक्रमाचे तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. काँग्रेस माजी शहराध्यक्ष विजय हरिश्चंद्रे व सुभाष मदन यांनी प्रतिमांना पुष्पहार अर्पण केले. यावेळी प्रदेश प्रतिनिधी मुकेश सुर्वे, तालुका अध्यक्ष संजय गवळी, शहराध्यक्ष अनंत देवळे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष ॲड. भाऊसाहेब मोरे, संदीप पाटील, ॲड. सूरज पंडित, राजीव पवार, एनएसयुआय जिल्हा सरचिटणीस यश सुर्वे, ऋषीकेश पवार आदी उपस्थित होते. याप्रसंगी मुकेश सुर्वे यांनी अजित पवार कर्जतला आले होते. त्यावेळच्या आठवणींना उजाळा दिला. हरिश्चंद्रे, मदन, गवळी, मोरे आदींनी आदरांजलीपर मनोगते व्यक्त केली.

**श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन**
**रविंद्र नारायण राऊत प्रशासकीय भवन**
**ता. श्रीवर्धन जिल्हा-रायगड**
(I.S.O. 9001:2015 **प्रमाणित**)
**दूरध्वनी क्रमांक :** ०२१४७-२२२३७८ **ई-मेल :** shriwardhan.nagarparishad@gmail.com

**जाहीर नोटीस**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने श्रीवर्धन नगरपरिषदेस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्या प्रकरणा अनुसुची दोन व तीन मधील नोटीसी नुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह श्रीवर्धन नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | अनुसूची दोन/तीन | करनिर्धारण पुस्तकातील क्र. मालमत्ता क्र. | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे, त्यांचे म्हणजे विकरणाऱ्याचे किंवा अभिहस्तांतरण कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांतरण कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | तीन | ६२२<br>झेड १०००७६३<br>श्री ०००००७५६ | टिळक रोड | घर | संदीप दत्तात्रय पोलेकर | अर्चित संदीप पोलेकर |

क्र. श्रीनप/कवि/मालमत्ता हस्तांतरण/२०९४/२०२६
श्रीवर्धन नगरपरिषद, श्रीवर्धन
दिनांक :- ३०-०१-२०२६

सही/-
**मुख्याधिकारी**
**श्रीवर्धन नगरपरिषद**

# आघाडीच्या उमेदवारांना नागावमधून बहुमत मिळणार

## माजी सरपंच नंदकुमार मयेकर यांचा ठाम विश्वास

**| चौल | प्रतिनिधी**

चौल जिल्हा परिषद मतदारसंघात शेतकरी कामगार पक्ष-महाविकास आघाडीने प्रचारात निर्णायक आघाडी घेतली असून, नागाव परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरुवारी दि. २९ रोजी नागाव येथील सिद्धीविनायक मंदिरात जिल्हा परिषदेचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे आणि नागावरेवदंडा पंचायत समितीचे उमेदवार राकेश वसंत म्हात्रे यांच्या प्रचाराचा शुभारंभ गणरायाचे आशीर्वाद घेऊन करण्यात आला. नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर यांच्या हस्ते प्रचाराचा नारळ फोडून प्रचाराचा श्रीगणेशा करण्यात आला.



**सुरेंद्र म्हात्रे व राकेश म्हात्रे यांना भरघोस मताधिक्य देण्याचे मतदारांना आवाहन**

यावेळी बोलताना माजी सरपंच नंदकुमार मयेकर यांनी सांगितले की, नागावमध्ये शेतकरी कामगार पक्ष व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली असून, आजही विकासाचा धडाका सुरू आहे. रस्ते, पाणीपुरवठा, मूलभूत सुविधा आणि ग्रामविकासाच्या कामांमुळे नागावची जनता समाधानी आहे. नागावची जनता कायम शेकापच्या पाठीशी उभी राहिली असून येथील मतदार अत्यंत सुज्ञ आहेत. त्यामुळे या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या दोन्ही उमेदवारांना नागावमधून निश्चितच भरघोस बहुमत मिळेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले की, मतदारांनी विरोधकांच्या कोणत्याही आमिषाला, अफवांना किंवा अपप्रचाराला बळी न पडता महाविकास आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे. सध्या नागावमध्ये विरोधकांकडून जाणीवपूर्वक अपप्रचार सुरू असून, त्याला योग्य उत्तर मतपेटीतूनच द्यावे, असे आवाहन त्यांनी नागावकर मतदारांना केले.

याप्रसंगी शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, शेकाप जिल्हा चिटणीस मंडळाचे सदस्य शरद वरसोलकर, माजी सरपंच नंदकुमार मयेकर, महाविकास आघाडीचे जिल्हा परिषदेचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे, नागावरेवदंडा पंचायत समितीचे उमेदवार राकेश वसंत म्हात्रे, नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच निखिल मयेकर, माजी उपसरपंच संदेश नाईक, राजू मयेकर, मंगेश राणे, ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश खोत, रेवदंडा शहराध्यक्ष निलेश खोत, सोनाली मोरे, प्रमोद नवखारकर, नागाव ग्रामपंचायतीचे सदस्य तसेच महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागावमधील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्र नागलेकर यांनी केले.

यावेळी ''लाल बावटा की जय'', ''शिवसेना जिंदाबाद'', ''महाविकास आघाडीचा विजय असो'' अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणून गेला. त्यानंतर नागावमधील मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रचारपत्रकांचे वाटप करण्यात आले.

सर्वसामान्य नागरिकांकडून दोन्ही उमेदवारांना वाढता आणि उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून आले असून, नागावमध्ये महाविकास आघाडीचा विजय निश्चित मानला जात आहे.

# चौलमळा येथे महाविकास आघाडीचा झंझावात

## ग्रामदेवता आई कृष्णादेवीचे आशीर्वाद घेऊन प्रचाराचा शुभारंभ





**| चौल | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील चौलमळा गावात महाविकास आघाडीच्या प्रचाराने प्रचंड वेग घेतला असून, संपूर्ण परिसरात विजयाचा आत्मविश्वास दिसून येत आहे. ग्रामदैवत आई कृष्णादेवी मातेचे आशीर्वाद घेऊन शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व काँग्रेस महाविकास आघाडीच्यावतीने चौल मतदारसंघातील जिल्हा परिषदेचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे आणि चौल-वरंडे पंचायत समितीच्या उमेदवार अनया अमित फुंडे यांच्या प्रचाराचा दणदणीत शुभारंभ करण्यात आला. यावेळी आई कृष्णादेवी मातेच्या चरणी नारळ अर्पण करून उमेदवारांच्या विजयासाठी साकडे घालण्यात आले.



यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते किशोर घरत, चौलमळा गावचे माजी सरपंच अनंत म्हात्रे, माजी उपसरपंच नंदकुमार म्हात्रे, शेकापचे निष्ठावान कार्यकर्ते व चौलमळा गावचे पंच आर.डी. नाईक, ज्येष्ठ नागरिक शरद नाईक, मोरेश्वर म्हात्रे, किशोर द. घरत, चंद्रकांत मुकादम आदी मान्यवरांच्या हस्ते प्रचाराचा नारळ फोडण्यात आला. सर्वांनी एकमुखाने आई कृष्णादेवीला साकडे घालत आघाडीच्या उमेदवारांच्या विजयासाठी प्रार्थना केली.

याप्रसंगी बोलताना ज्येष्ठ कार्यकर्ते किशोर घरत यांनी, चौलमळा गावात महाविकास आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, दोन्ही उमेदवार निश्चितच भरघोस मतांनी विजयी होतील, असा ठाम विश्वास व्यक्त केला. विकास, प्रामाणिक नेतृत्व आणि जनतेशी असलेली नाळ यामुळे ग्रामस्थांचा विश्वास महाविकास आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमास चौल ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच रुपाली म्हात्रे, माजी उपसरपंच काशिनाथ घरत, माजी सदस्य शशिकांत म्हात्रे, आर. डी. म्हात्रे, विजय ठाकूर, राजेंद्र ठाकूर, निलेश नाईक, चौलमळा गावचे युवा नेते शैलेश नाईक, महेंद्र नाईक, महेश पाटील, शिवसेना उबाठा गटाचे प्रशांत आमरे, मनिष नाईक, प्रमोद घरत यांच्यासह अमित फुंडे, सूरज फुंडे, संस्कार म्हात्रे, पांडुरंग पाटील, प्रशांत वर्तक, आशिष पाटील आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यानंतर चौलमळा गावात घरोघरी फिरून महाविकास आघाडीच्या उमेदवारांची प्रचारपत्रके वाटप करण्यात आली. ग्रामस्थांशी थेट संवाद साधत दोन्ही उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी चौलमळा ग्रामस्थांकडून आघाडीच्या उमेदवारांना मोठा आणि ठाम पाठिंबा मिळत असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. आमचं ठरलंय, आमचं मत महाविकास आघाडीच्याच उमेदवारांना असा निर्धार अनेक ग्रामस्थांनी बोलून दाखवला.

महाविकास आघाडीच्या प्रचाराच्या झंझावाताला दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद मिळत असून, चौलमळा गावात आघाडीचा विजय निश्चित मानला जात आहे. ग्रामस्थांचा विश्वास, कार्यकर्त्यांचा उत्साह आणि विकासाचा अजेंडा यामुळे विजयाचा मार्ग अधिकच सुकर झाल्याची जोरदार चर्चा परिसरात सुरू आहे.

# आक्षीत शेकापच्या उमेदवारांना भरघोस प्रतिसाद



**| अलिबाग | शहर प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील आक्षी येथे शेकाप व महाविकास आघाडीचे चेंढरे मतदार संघातील जिल्हा परिषदेचे उमेदवार प्रविणा घासे व आक्षी पंचायत समितीचे उमेदवार प्रफुल्ल पाटील यांच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला.

काळंबा देवीच्या मंदिरात ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या हस्ते प्रचाराचा शुभारंभ करण्यात आला. या प्रचारादरम्यान आक्षी व साखर परिसरात मतदारांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. यावेळी शेकापचे उमेदवार प्रविणा घासे व प्रफुल्ल पाटील यांच्यासह शेकापचे ज्येष्ठ नेते द्वारकानाथ नाईक, आक्षी सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, माजी सरपंच नंदकुमार वाळंज, सदस्य रश्मी वाळंज, निरजा नाईक, काँग्रेस नेते प्रभाकर राणे, जि.प. माजी सदस्या अश्लेषा नाईक, शेकाप कार्यकर्ते विलास राणे, रवींद्र पाटील, उल्हास भाटे, रश्मीन गुरव, रमण पाटील, विनायक पाटील, शिवनाथ पाटील, सुनील नाईक, अभिजित वाळंज, नितीन सारंग, रमेश केणी, संतोष राऊळ, प्रणित गुरव व महाविकास आघाडीतील पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## शहापूरमध्ये शेकाप-महाविकास आघाडीचा झंझावात



● शहापूर गणातील शेकाप उमेदवार कौशिक पाटील यांचा नारंगी, फोफेरी, चिंचवली भागात जोरदार प्रचार सुरु. (छायाचित्र : समीर मालोदे)

# निवडणुकीची रणधुमाळी; बच्चे कंपनीचा विरंगुळा

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांमुळे राजकीय रंग ग्रामीण भागात चांगलाच चढताना दिसत आहे. प्रत्येक पक्षाचा उमेदवार, त्या व्यक्तीचे नातेवाईक, मित्र परिवार असो किंवा कार्यकर्ते आपल्या माणसाला निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करताना दिसत आहेत. यासाठीच प्रचार फेरी, रॅली, रोड शो यामुळे ग्रामीण भागातील वातावरण राजकीय बनले आहे.प्रचार करण्यासाठी फिरणाऱ्या गाड्या, त्यांच्यामागे ही बच्चे कंपनी फिरताना दिसत आहे.याचा आनंद ग्रामीण भागातील बच्चे कंपनी आनंद लुटताना दिसत आहे.

शनिवार,रविवार त्यातच काही विद्यार्थ्यांना शालेय सुट्टी असल्यामुळे त्यांचा चांगला विरंगुळा होत असला तरी सुद्धा राजकारण्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. मात्र असे असले तरी बच्चे कंपनीला विरुंगळा निर्माण झाला आहे.

# कावीर जिल्हा परिषद मतदार संघात महाविकास आघाडीला वाढता पाठिंबा





**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

कावीर जिल्हा परिषद मतदार संघासह कावीर पंचायत समिती आणि रामराज पंचायत समिती मतदार संघात प्रचाराचा धमाका शेकाप मार्फत गेल्या अनेक दिवसांपासून सुरु आहे. गाव बैठकांसह थेट मतदारांना भेटून खटारा चिन्हासमोरील बटण दाबून मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे.

या मतदार संघात प्रचाराची आघाडी दिसून येत असून मोहन धुमाळसह अनिल पाटील आणि अंजली पाटील यांना मतदारांसह कार्यकर्त्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.गावे,वाड्यावस्त्यांमध्ये आगमन होताच त्यांचे औक्षण करीत ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत केले जात असल्याचे चित्र आहे.

**■ मोहन धुमाळसह अनिल पाटील, अंजली पाटील यांचे जल्लोषात स्वागत**

जिल्हा परिषदेच्या कावीर मतदार संघात शेकाप महाविकास आघाडीकडून मोहन धुमाळ उभे राहिले आहेत. कावीर पंचायत समिती मतदार संघातून अनिल पाटील, आणि रामराज मतदार संघातून अंजली पाटील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. हा परिसर शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या मतदार संघात शेकापमार्फत वेगवेगळी विकास कामे करण्यात आली आहे. तळागाळातील घटकाचा विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आजही या मतदार संघात शेतकरी कामगार पक्षाला मानणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे.कावीर जिल्हा परिषद मतदार संघातील शेकापचे उमेदवार मोहन धुमाळ हे गेल्या अनेक वर्षापासून राजकीय क्षेत्रासह सामाजिक, क्रीडा क्षेत्रात कार्यरत आहेत. सर्वसामान्यांच्या हित साधणारे नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.

कावीर पंचायत समिती मतदार संघातील शेकापचे उमेदवार अनिल पाटील हे राजकीय, सामाजिक क्रीडा, शैक्षणिक आदी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. यापुर्वी त्यांनी पंचायत समितीचे सदस्यपासून सभापती म्हणून धुरा सांभाळली आहे. या परिसराच्या विकासामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सर्व स्तरातील घटकाला सामावून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यामध्ये त्यांचा एक वेगळा हातखंडा आहे. तरुणांचे प्रेरणास्थान म्हणून त्यांना ओळखले जाते. शेतकरी कामगार पक्षाचे आठ वेळा तालुका चिटणीस म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. तालुक्यात पक्षवाढीसाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. विरोधकांनाही आपलेसे करण्याची त्यांची एक वेगळी ख्याती आहे.

रामराज पंचायत समिती मतदार संघातून शेकापच्या अंजली पाटील उभ्या राहिल्या आहेत. गेल्या काही वर्षापासून त्या राजकारणासह समाजकार्यात सक्रीय आहेत. सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अंजली पाटील यांनी देखील सामाजिक, राजकीय क्षेत्रात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सर्वसामान्यांशी बांधिलकी असणारे हे उमेदवार आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून या मतदार संघामध्ये प्रचार सुरु आहे. गावोगावी प्रचाराचा धमाका वेगात सुरु आहे. या प्रचाराच्या दरम्यान शेकाप उमेदवारांना मतदारांसह कार्यकर्त्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे या निवडणुकीत त्यांना घवघवीत यश मिळेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

# एआय युनिव्हर्सिटीच्या सांडपाण्याने शेतजमीन बाधित

**| नेरळ | प्रतिनिधी |**



वदप ग्रामपंचायत हद्दीतील कुशीवली येथील शेतजमिनीवर एआय युनिव्हर्सिटी येथून येणाऱ्या सांडपाण्यामुळे गंभीर समस्या निर्माण झाली आहे. येथील शेतकरी वनिता पंढरीनाथ भोईर यांच्या शेतीवर गेल्या दोन ते तीन वर्षांपासून कॉलेजचे सांडपाणी थेट पसरत आहे.

युनिव्हर्सिटीकडून सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आलेली नसल्याने शेजारील शेतजमीन पूर्णपणे बाधित झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे अवघड झाले असून पीक घेणेही अशक्यप्राय झाले आहे. शेताला लागूनच कालवा असूनही या पाण्याचा वापर करणे शक्य नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सांडपाण्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून शेतकरी, स्थानिक नागरिक तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्यालाही धोका निर्माण झाला आहे.

या गंभीर बाबीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे. महसूल, पोलीस व शिक्षण विभाग यांच्याकडून ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.हे कॉलेज बड्या लोकांचे असल्याने प्रशासन मेहेरबान आहे अशी भावना व्यक्त होत आहे.


एआय युनिव्हर्सिटी ही एमबीए शिक्षण देणारी संस्था असून ती यापूर्वीही विविध कारणांमुळे वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. विद्यार्थ्यांच्या कथित गैरवर्तनाबाबत तसेच नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबत अनेकदा तक्रारी झाल्याचे सांगितले जाते. मात्र, त्यावर ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप आहे. दरम्यान, या शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीबाबत तहसीलदारांकडे पत्रव्यवहार केला जाणार असून, न्याय मिळेल का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. स्थानिक ग्रामस्थ मनोज भोईर यांनी या परिस्थितीबद्दल खेद व्यक्त केला आहे. तर बाधित शेतकरी पुंडलिक भोईर यांनी न्याय न मिळाल्यास आत्महत्येचा इशारा दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. आदित्य भोईर यांनी युनिव्हर्सिटीला ड्रेनेज व्यवस्था नसताना परवानगी नसताना परवानगी कशी मिळाली, असा महत्वपूर्ण मुद्दा उपस्थित केला.

# नियंत्रण कक्षातील फोन बंद ठेवण्याचा प्रताप उघड

**■ अलिबाग एसटी बस आगाराचा अजब कारभार**

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

ठिकठिकाणी कचरा, खड्डे पडलेले अशा अनेक समस्यांच्या गर्तेत अलिबाग एसटी बस स्थानक सापडत आहे. त्यात आणखी एक भर पडली आहे. अलिबाग स्थानकातील वाहतूक नियंत्रक कक्षातील फोनमधील रिसिव्हर काढून ठेवण्याचा प्रताप उघड झाला आहे.



एसटी बस आगारातील हा अजब कारभार समोर आला आहे. त्यामुळे प्रवाशांना स्थानकात बसची माहिती घेण्यास अडथळा निर्माण झाला आहे. या प्रकाराविरोधात प्रवासी वर्गात नाराजी निर्माण झाली असून संबंधित वाहतूक नियंत्रकाविरोधात कारवाईची मागणी होत आहे.

प्रवाशांना एसटीची माहिती मिळावी, म्हणून स्थानकात वाहतूक नियंत्रण कक्ष उभारण्यात आले आहे. या कक्षामध्ये फोन आहे.२२२००६ या क्रमांकाचा फोन नंबर आहे. या फोन नंबरवर संपर्क साधून प्रवासी एसटी बसची माहिती घेतात. परंतु हा फोन अनेक वेळा बंद असल्याच्या तक्रारी वाढत आहेत.

अलिबाग एसटी आगार व्यवस्थापकांचे याकडे अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे बोलले जात आहे. वाहतूक नियंत्रण कक्षात असलेल्या फोनवर कोणीही संपर्क साधू नये म्हणून वाहतूक नियंत्रकाने त्या फोनवरील रिसिव्हर काढून फोन बंद ठेवल्याचा प्रताप उघड झाला आहे.एसटी आगारातील वाहतूक नियंत्रकांच्या या प्रकारामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

# लठ्ठ आणि मठ्ठांची चिंता

दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्पाआधी आर्थिक सर्वेक्षण सादर करण्यात येते. या सर्वेक्षणामध्ये देशाचे वास्तव चित्र समोर यावे अशी अपेक्षा असते व ती बव्हंशी पूर्ण होते. एरवी सरकार कोणाचेही असले व काहीही दावे करीत असले तरी सर्वेक्षण हे आकड्यांवर आधारलेले असल्याने गरिबी, बेकारी, देशातील गुंतवणूक यांची खरी स्थिती काय आहे व आव्हाने कोणती आहेत याचे दिग्दर्शन होत असते. यंदा या सर्वेक्षणात नेहमीच्या आर्थिक घडामोडींसोबतच दोन इतर प्रश्नांचाही उल्लेख आहे. त्यातला एक आहे लोकांना लागलेले मोबाईल व इंटरनेटचे व्यसन आणि त्यामुळे येणारा मठ्ठपणा आणि दुसरा आहे लोकांचा वाढता शारिरीक लठ्ठपणा आजवर भारताच्या संसदेत किंवा विधानसभांमध्ये गरिबांच्या कुपोषणावर चर्चा होत आली. पण आता त्याचे बहुदा मोदी सरकारला अजीर्ण झालेले दिसते. म्हणून यंदा लोकांच्या लठ्ठपणाचा मुद्दा घेण्यात आला आहे. त्यातील आकडेवारीनुसार १५ ते ४९ या वयोगटातील सात टक्के महिला व चार टक्के पुरुष लठ्ठ आहेत. लहान मुलांमध्ये लठ्ठपणा वाढतो आहे याकडेही यात लक्ष वेधण्यात आले आहे. लठ्ठपणामुळे अनेक आजार संभवतात व त्यामुळे याबद्दल चिंता करणे गैर नाही. पण अहवालात ज्या रीतीने त्याला स्थान देण्यात आले आहे ते काहीसे आश्चर्यकारक आहे. भारत आता अतिश्रीमंत देशांच्या गटात पोचणार आहे अशी बतावणी करायला मोदी सरकारला काही ना काही निमित्त हवे असते. ते खोटे असले तरी रेटून बोलले जात असते. त्याचाच एक भाग म्हणून भारताला आता कुपोषणासारखी गरिबांची दुखणी नव्हे तर लठ्ठपणासारखे श्रीमंती आजार होऊ लागले आहेत असे भासवण्याचा हा केविलवाणा प्रयत्न आहे की काय अशी शंका येते. सरकार काहीही सांगत असले तरी आजही कित्येक कोटी लोक गरिबी रेषेच्या खाली राहतात. सुमारे ८० कोटी लोक रेशनच्या धान्यावर अवलंबून आहे. आरोग्य विम्याचा कितीही गवगवा केला तरी या गरिबांना साध्या आजारांवर गावातच उपचार मिळणेही कठीण होत चालले आहे. स्थानिक आरोग्य यंत्रणेची अवस्था बेकार आहे. पण त्यांची चर्चा करण्याऐवजी सरकार लठ्ठांची चिंता वाहते आहे.

## कोसळणारा रुपया

बरे या लठ्ठपणावर उपाय काय तर, संध्याकाळी सहा ते रात्री ११ वाजेपर्यंत जंक फूडच्या जाहिरातींवर बंदी घालावी अशी शिफारस या सर्वेक्षणात करण्यात आली आहे. सध्याची पिढी टीव्ही पाहत नाही हे बहुदा नीती आयोगाच्या लोकांना ठाऊक नाही. ही पिढी मोबाईलवर रील्स पाहत असते. नवनव्या जंक फूडची माहिती त्यांना मोबाईल व सोशल मिडियावरून मिळत असते. त्यामुळे संध्याकाळी जाहिराती बंद केल्याने काही फरक पडणार नाही. हे प्रश्न महत्वाचे असले तरी याहूनही कितीतरी विक्राळ प्रश्न आपल्या देशासमोर आहेत. पण ते लपवण्याचा प्रयत्न चालू आहे. याच सर्वेक्षणात परकीय आणि देशातली गुंतवणूक घटत चालली असल्याबद्दल चिंता आहे. मधल्या काळात कॉर्पोरेट कर घटवल्याने बहुसंख्य कंपन्यांना तुफान नफे झाले. अगदी कोरोना काळातही त्यांचे महसूल वाढतच होते. कॉर्पोरेट कर कमी केल्यामुळे जे नफे होतील त्या पैशांतून या कंपन्या देशांमध्ये नवे कारखाने वा कंपन्या काढतील व रोजगार वाढेल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात ते घडलेले नाही. आपल्या अर्थमंत्री निर्मला सीतारामण व पंतप्रधान मोदी यांनी याबाबत जाहीर नाराजी बोलून दाखवलेली असूनही यात फरक पडलेला नाही. इतके दिवस निदान परकीय गुंतवणूक तरी इथे येत होती. पण आता तेही लोक भारतातून मोठ्या प्रमाणात पैसे काढून घेऊ लागले आहेत. आपला रुपया झपाट्याने घसरण्याचे तेही एक कारण आहे. सध्या एक डॉलरला ९२ रुपये मोजावे लागत आहेत. तेही रिझर्व्ह बँकेने त्याला कसेबसे तगवून ठेवले आहे म्हणून. अन्यथा, हा दरही पेट्रोलप्रमाणे केव्हाच १०० च्या पलिकडे जायला हवा होता. रुपया स्वस्त झाल्यामुळे परदेशात होणारी निर्यात वाढायला हवी होती. कारण पूर्वी एका डॉलरमध्ये ८० रुपयांच्या वस्तू मिळत होत्या त्या आता ९२ रुपयांच्या मूल्याच्या वस्तू मिळू लागल्या आहेत. पण प्रत्यक्षात या स्वस्ताईमुळे निर्यात लक्षणीयरीत्या वाढली आहे असेही घडलेले नाही.

## जागतिक आव्हान


येते वर्ष प्रचंड अनिश्चिततेचे असेल असे या सर्वेक्षणात नमूद आहे. डोनाल्ड ट्रम्पचे डोके कधी व कशामुळे सटकेल आणि भारतावर आणखी किती कर लागू केला जाईल हे सांगता येत नाही. सध्या अमेरिकेने भारतावर जगात सर्वाधिक म्हणजे जवळपास ५० टक्के कर लावले आहेत. भारतातून जाणारी मासळी, दागिने, हिरे, चामड्याच्या वस्तू, कपडे इत्यादी महाग झाले आहेत. अमेरिका हीच आयात आता व्हिएतनाम, मलेशिया किंवा थायलंडमधून करू शकेल. भारत आणि अमेरिका यांच्यातला व्यापार करार त्रिशंकू राजासारखा हवेत लटकलेला आहे. तो कधी मार्गी लागेल सांगता येत नाही. मोदी तर ट्रम्पला भेटायला आणि फोनवरून बोलायलाही टाळत आहेत. याला पर्याय म्हणून आता युरोपीय महासंघाशी करार झाला आहे. त्यानुसार आपल्या बऱ्याच वस्तू युरोपीय देशांमध्ये शून्य कर लागून जाऊ शकतील. त्यांची निर्यात वाढेल. पण अमेरिका आणि युरोपची बाजारपेठ यांची तुलनाच होऊ शकत नाही. शिवाय आपण कागदावर सह्या केल्या असल्या तरी प्रत्यक्ष करार अमलात यायला अजून किमान वर्षभर जाणार आहे. दुसरे म्हणजे चीनने तमाम सर्व प्रकारच्या वस्तूंनी युरोपची बाजारपेठ आधीच व्यापलेली आहे. त्यात शिरकाव करणे सोपे जाणार नाही. शिवाय आपण युरोपशी करार केला म्हणून ट्रम्प चिडले असून ते आपली कोंडी करण्यासाठी आणखी निर्बंध लागू करू शकतात. रशियातून तेल खरेदी करण्यावर त्यांनी बंदी आणली आहेच. त्याचा फटका रिलायन्सच नव्हे तर सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांनाही बसणार आहे. इराणचे छाबहार बंदर आपल्याला बंद करून टाकण्यात आले आहे. इराणसोबतचा व्यापारही कमी झाला आहे. अमेरिकेला आवडत नाही म्हणून रशिया, इराण आणि आणखी अशाच ५-१० देशांसोबत आपण व्यापार करायचा नाही असे ठरवले तर आपले दिवाळे वाजायची वेळ येईल. तिकडे ट्रम्पने युरोपीय महासंघाला भारताशी करार केल्याबद्दल इशारे द्यायला सुरुवात केली आहेच. दुसरीकडे एआय व इतर आव्हानांमुळे सर्व जगात मोठी उलथापालथ सुरू आहे. ब्रिटनमध्ये कधी नव्हे इतकी भाववाढ झाली आहे व नोकऱ्या जात आहेत. फ्रान्स, जर्मनी यांचीही स्थिती बरी नाही. चीनमध्येही मंदीचे सावट आहे. अशा स्थितीचा सामना करण्यासाठी मोदींचा भारत तयार आहे का हा कळीचा प्रश्न आहे. दुर्दैवाने हा भारत हिंदू-मुस्लिम, सनातनचा अपमान, सोमनाथ किंवा अयोध्येतले धार्मिक कार्यक्रम अशांमध्येच अडकून पडलेला आहे.

---

विचार

# 'राईट टू डिस्कनेक्ट' साधणार समतोल

***कार्यकालीन काम आणि वैयक्तिक आयुष्यातील समतोल म्हणजे कामाच्या जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक गरजा, कुटुंब, आरोग्य तसेच सामाजिक जीवन यामध्ये संतुलन राखणे. विशेषतः इंटरनेट, फोन वर्किंग आणि 'वर्क फ्रॉम होम'सारख्या प्रथा पूर्वी फक्त आयटी उद्योगात होत्या. त्या आता इतर उद्योगांमध्येही प्रचलित आहेत. केरळमध्ये समोर आलेल्या 'राईट टू डिस्कनेक्ट' विधेयकाच्या पार्श्वभूमीवर आता या विषयाची नव्याने चर्चा होत आहे.***



**डॉ. दीपक शिकारपूर**

भारतात गेल्या दोन दशकांमध्ये माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा वेगाने विस्तार झाला. लाखो तरुणांना रोजगार उपलब्ध झाला, जागतिक दर्जाचे वेतन, कामाचे उत्तम वातावरण आणि करिअरची उत्कृष्ट संधी मिळाली. परंतु या चमकत्या जगामागे एक वास्तव लपले आहे. कार्यालयीन काम आणि वैयक्तिक जीवन यांचा समतोल साधणे हे आज प्रत्येक भारतीय आयटी कर्मचाऱ्यापुढील अत्यंत महत्त्वाचे आव्हान बनले आहे. जगभरातील क्लायंट्सना सेवा देण्याची गरज, वेळेत प्रोजेक्ट डिलिव्हरीची अपेक्षा, टाईम झोनचा ताण, सतत बदलणारी तंत्रज्ञानाची मागणी आणि कठोर डेडलाईन्स यामुळे या क्षेत्रातील कामाचे स्वरूप पूर्वीपेक्षा खूपच तणावपूर्ण झाले आहे. अनेक कर्मचाऱ्यांचा दिवस ९ तासांऐवजी ११ ते १२ तासांपर्यंत वाढतो. 'वर्क फ्रॉम होम' हा उपक्रम सुरू झाल्यावर प्रवासाच्या तासांची बचत झाली असली तरी काम संपण्याची सीमा अस्पष्ट झाली आणि 'काम नेमके कधी संपते?' हा प्रश्न निर्माण झाला. भारतामध्ये आयटी उद्योगाची रचना विशिष्ट समस्या घेऊन येते. बहुतेक ग्राहक अमेरिकन/युरोपियन असल्याने रात्री बेरात्री कॉल्स, मोठ्या शहरांमधील वाहतुकीचा प्रचंड बोजा, ऑफिसला जाण्या-येण्यामध्ये अनेक तास जाणे, कामगिरी मोजमापाची स्पर्धात्मक पद्धत, कुटुंबीयांची अपेक्षा, अधिक पैसे मिळवण्यासाठी चांगले पद, जास्त तास काम करून 'सेटल' होण्याचा सामाजिक दबाव, तंत्रज्ञानाच्या वेगवान बदलामध्ये सतत शिकण्याची गरज, कोर्सेस/सर्टिफिकेशन्स यासाठी द्यावा लागणारा अतिरिक्त वेळ या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे कामाचा ताण आणि वैयक्तिक आयुष्यातील असंतोष.

या पार्श्वभूमीवर काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये समतोल का आवश्यक आहे, हे समजून घेण्याची गरज आहे. मानसिक आरोग्याची जपणूक, सततची धावपळ, ऑन-कॉल सपोर्ट, मिटींग्जचा मारा यामुळे बर्नआऊट, चिंता, चिडचिड, झोपेच्या समस्या निर्माण होतात. शारीरिक स्वास्थ्य तासनतास स्क्रीनसमोर बसणे, व्यायामाची कमतरता यामुळे पाठदुखी, लठ्ठपणा, डायबेटीस, बिघडता रक्तदाब आदी व्याधी वाढण्याचे प्रमाण वाढते. कौटुंबिक जीवन लग्न, मुले, पालक, समाजकार्य या गोष्टींकडे देण्यासाठी वेळ उरत नाही. घरातील नाती संघर्षमय होऊ लागतात. म्हणूनच काम आणि वैयक्तिक आयुष्य यामध्ये समतोल साधल्यास काम अधिक एकाग्रतेने आणि कमी ताणात होऊ शकते. 'बर्नआऊट'च्या समस्येमुळे अनेकजण नोकरी बदलतात; पण योग्य दैनंदिन जीवनात समतोल ठेवल्यास दीर्घकालीन करिअर घडते. 'कार्यकालीन काम आणि वैयक्तिक आयुष्यातील समतोल म्हणजे कामाच्या जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक गरजा, कुटुंब, आरोग्य तसेच सामाजिक जीवन यामध्ये संतुलन राखणे. कामाचे तास वाढतात आणि विश्रांतीला वेळ मिळत नाही, तेव्हा हा समतोल बिघडतो. विशेषतः इंटरनेट, फोन वर्किंग आणि 'वर्क फ्रॉम होम'सारख्या प्रथा पूर्वी फक्त आयटी उद्योगात होत्या. त्या आता इतर उद्योगांमध्येही प्रचलित आहेत. हा विषय सध्याच्या कॉर्पोरेट जगतात खूप महत्त्वाचा आहे, विशेषतः केरळमध्ये समोर आलेल्या 'राईट टू डिस्कनेक्ट' विधेयकाच्या पार्श्वभूमीवर त्याची विशेष चर्चा झाली.

मुळात कुणी किती काम करायचे, त्याचे मूल्यमापन (पगार) हे जिकिरीचे विषय आहेत. स्मार्टफोन, ईमेल आणि मेसेजिंग ॲप्समुळे कर्मचाऱ्यांनी कामाच्या वेळेनंतरही उपलब्ध राहणे अपेक्षित असते. यामुळे कामकाजाच्या वेळेच्या सीमा अस्पष्ट होतात. अनेक कंपन्यांमध्ये, खास करून खाजगी क्षेत्रात, जास्त तास काम करणे हे समर्पणाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे कर्मचाऱ्यांवर जास्त वेळ काम करण्याचा अघोषित दबाव असतो. ऑक्टोबर २०२३ मध्ये इन्फोसिसचे सहसंस्थापक नारायण मूर्ती यांनी एका पॉडकास्टमध्ये केलेल्या विधानामुळे मोठा वाद निर्माण झाला. त्यांनी भारतीय तरुणांना आठवड्यातून ७० तास काम करण्याचा सल्ला दिला. त्यांनी म्हटले की भारताला चीनसारख्या देशांशी स्पर्धा करून मोठी प्रगती करायची असेल, तर जर्मन आणि जपानी लोकांनी दुसऱ्या महायुद्धानंतर जसे केले, त्याचप्रमाणे उत्पादकता वाढवण्यासाठी भारतीय तरुणांनी खूप कष्ट केले पाहिजेत. त्यांनी स्वतः इन्फोसिसच्या सुरुवातीच्या काळात दर आठवड्याला ७० तासांपेक्षा जास्त काम केल्याचे सांगितले. मूर्ती यांच्या विधानानंतर काही महिन्यांनी 'लार्सन अँड टुब्रो' या कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक एस. एन. सुब्रमण्यन यांच्या एका अंतर्गत बैठकीतील वक्तव्यामुळे आणखी मोठा वाद निर्माण झाला. सुब्रमण्यन यांनी कर्मचाऱ्यांना आठवड्यातून ९० तास काम करण्याची सूचना दिली. त्यांनी म्हटले. 'मला तुम्हाला रविवारी काम करायला लावता येत नाही, याचे मला दुःख आहे. तुम्हाला रविवारी काम करायला लावल्यास मला जास्त आनंद होईल, कारण मी स्वतः रविवारी काम करतो.'

सुब्रमण्यन यांनी नंतर स्पष्ट केले की, त्यांची टिप्पणी अनौपचारिक बैठकीत करण्यात आली होती आणि ते कंपनीचे धोरण नव्हते. एकंदर काय, तर कार्यकालीन काम, ताणतणाव, सुट्टी, कुटुंबाबरोबर घालवलेले क्षण (ज्यामुळे तणाव कमी होतो, मानसिक आरोग्य सुधारते) हे सर्व कळीचे मुद्दे आहेत. बहुराष्ट्रीय उद्योगात ग्राहक परदेशी असतो तिथे वेळेच्या फरकामुळे अनेकदा रात्री बेरात्रीही काम करावे लागते. ही कार्यसंस्कृती आणि कार्यालयाला जायला लागणार वेळ (त्यात ट्रॅफिक जॅम) या बाबींमुळे जास्त पगार असणाऱ्या आयटी मधील नोकऱ्या अनेकांना नकोशा वाटत आहेत. ऑक्टोबर २०२५ मध्ये केरळने 'राईट टू डिस्कनेक्ट' बिल सादर केले. कामाच्या ठिकाणी आरोग्यपूर्ण सीमा जपण्यासाठी ते एक लहान पण महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे विधेयक कर्मचाऱ्यांना कार्यालयाच्या वेळेनंतर कामाशी संबंधित संवादापासून 'स्विच ऑफ' करण्याचा कायदेशीर अधिकार देते. म्हणजेच हे विधेयक खाजगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना डिस्कनेक्ट होण्याचा अधिकार देते. त्यामुळे त्यांना रात्रीच्या जेवणानंतरचे झूम कॉल, उशिरा रात्रीचे ईमेल किंवा फक्त एक छोटी चर्चा अशा संदेशांना नकार देता येतो. हे विधेयक मानवी हक्कांच्या जागतिक जाहीरनाम्याच्या कलम २४ च्या तत्त्वांचे पालन करते, जे विश्रांती आणि निवाऱ्याच्या अधिकाराला मान्यता देते, ज्यात कामाच्या तासांवर वाजवी मर्यादा आणि सशुल्क सुट्ट्यांचा समावेश आहे. कंजिरप्पल्लीचे आमदार डॉ. एन. जयराज यांनी २३ सप्टेंबर २०२५ रोजी खाजगी सदस्य विधेयक म्हणून सादर केलेले हे विधेयक कामाच्या वेळेनंतरच्या संवादाचे नियमन करू इच्छिते.

केरळ विधानसभेत औपचारिकपणे सादर कर्तण्यात आलेले हे बिल विधिमंडळाच्या विचारासाठी सादर करण्यात आले. सध्या, हे विधेयक विधानसभेत तपासणीखाली असून ते समिती पुनरावलोकन, सुधारणा आणि मतदानाच्या अधीन आहे. ते कायद्यात रूपांतरित झाल्यास कामगार विभागाने अधिसूचित केलेल्या विशिष्ट नियमांनुसार लागू होऊ शकते. तसे झाल्यास केरळ हे 'राईट टू डिस्कनेक्ट' लागू करणारे भारतातील पहिले राज्य ठरेल. सध्या आयटी उद्योग प्रामुख्याने बंगलोर, चेन्नई, हेंदराबाद, पुणे, गुरगाव अशा शहरांमध्ये केंद्रित आहे. त्यामुळे इतर राज्यांवरही या घटनेचा प्रभाव पडू शकतो. अर्थात या कायद्याची अंमलबजावणी कशी करणार हा देखील एक मोठा प्रश्न आहे. त्यातच सध्या आयटी क्षेत्रात खूप अनिश्चितता आहे. नोकरी टिकवणे अनेकांना जास्त महत्वाचे वाटत आहे. भारतीय आयटी उद्योगाने तरुणाईला उत्तम कारकिर्दीची संधी दिली असली तरी कामाचा ताण, डेडलाईन्सचा दबाव, तंत्रज्ञानाची शर्यत आणि घरकामाचा गोंधळ यामुळे गमावलेली मनःशांती ही आजची सर्वात मोठी समस्या बनली आहे. त्यामुळे आयुष्यात समतोल साधण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन, व्यायाम, मानसिक शांतता तंत्र, छंद जोपासणे आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर आवश्यक आहे. कंपन्यांनीही लवचिक वेळापत्रक, हायब्रिड मॉडेल, वास्तववादी डेडलाईन्स आणि मानसिक आरोग्य कार्यक्रम देणे गरजेचे आहे. असा समतोल साधणे केवळ कंपनीची जबाबदारी नाही; तर कर्मचारी, कुटुंब, व्यवस्थापन आणि समाज यांच्या सामूहिक प्रयत्नांवर ते अवलंबून आहे.

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

---

चर्चा आजची

# मंत्र्यांचे अकाली जाणे, महाराष्ट्राची हानी!



**राकेश लोहार**

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अनेक चढ-उतार आले, सत्ता बदलल्या, पक्ष फुटले-जोडले; मात्र काही जखमा अशा आहेत; ज्या काळ लोटला तरी भरून निघालेल्या नाहीत. त्या जखमा म्हणजे, राज्याला दिशा देणाऱ्या, जनतेच्या मनात घर केलेल्या आणि प्रशासनावर ठसा उमटवणाऱ्या नेत्यांचे अकाली निधन. अशा नेत्यांच्या जाण्याने केवळ एक व्यक्ती नाही तर अनुभव, दूरदृष्टी, नेतृत्व आणि लोकांचा विश्वास एकाच वेळी हरपला. प्रमोद महाजन, विलासराव देशमुख, गोपीनाथ मुंडे, आर. आर. पाटील, विनायक मेटे आणि राजीव सातव यांच्यासारख्या नेत्यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्राने मोठी किंमत मोजली आहे. असे असताना महाराष्ट्रावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने मोठा आघात झाला आहे. त्यांचे जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही न भरुन येणारी आहे.

अजित पवार यांच्या आधी नेतृत्वगुणसंपन्न नेते गमावले आहेत. त्यामध्ये भाजपाचे प्रभावी नेते आणि केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन यांचे २००६ साली झालेलं दुर्दैवी निधन हे राज्य आणि देशाच्या राजकारणासाठी मोठा धक्का होता. रणनीतीकार, वक्तृत्ववान आणि पक्षातील 'किंगमेकर' म्हणून ओळख असलेल्या महाजन यांची कारकीर्द शिखरावर असतानाच संपली. ते जिवंत असते, तर भाजपाचं राष्ट्रीय राजकारण आणि महाराष्ट्रातील समीकरणं वेगळ्या दिशेने गेली असती, असं आजही राजकीय विश्लेषक मानतात. कारण, माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी, ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्यानंतर प्रमोद महाजन यांचेच नाव घेतले जायचे. यावरुनच त्यांचे महत्त्व अधोरेखित होते. विलासराव देशमुख हे महाराष्ट्राला लाभलेले सौम्य, समन्वयक आणि विकासाभिमुख नेतृत्व होते. दोन वेळा मुख्यमंत्रीपद भूषवणाऱ्या विलासरावांनी राज्याला स्थैर्य दिलं. २०१२ साली त्यांच्या निधनाने काँग्रेस पक्षच नव्हे, तर संपूर्ण राज्यातील मध्यममार्गी आणि समतोल नेतृत्व हरपलं. ग्रामीण महाराष्ट्राशी असलेली त्यांची नाळ आणि सर्व पक्षांशी संवाद साधण्याची क्षमता ही आजही दुर्मिळ मानली जाते.

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांचं २०१४ मध्ये झालेलं अपघाती निधन हे राज्यासाठी मोठं नुकसान ठरलं. ओबीसी समाजाचा बुलंद आवाज, संघर्षातून वर आलेलं नेतृत्व आणि ग्रामीण भागातील जनतेशी असलेला थेट संवाद, यामुळे मुंडेंना प्रचंड जनाधार होता. केंद्रात आणि राज्यात समन्वय साधण्याची त्यांची भूमिका पुढील अनेक वर्षे निर्णायक ठरू शकली असती.

जनतेच्या मनात 'आबा' म्हणून अढळ स्थान निर्माण करणारे आर.आर. पाटील यांचे २०१५ साली झालेलं अकाली निधन ही केवळ एका मंत्र्याची नाही, तर स्वच्छ प्रतिमा असलेल्या राजकारणाची हानी होती. गृहमंत्री असताना त्यांनी पोलीस सुधारणा, दारूबंदी आणि प्रशासनात शिस्त आणण्याचा प्रयत्न केला. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि स्पष्ट भूमिका यामुळे ते आजही लोकांच्या स्मरणात आहेत.

मराठा आरक्षण आंदोलनाचा आक्रमक चेहरा असलेले विनायक मेटे यांचं २०२२ मध्ये झालेलं अपघाती निधन हे सामाजिक चळवळींसाठी मोठं धक्कादायक होतं. मराठा समाजाच्या मागण्यांना राजकीय व्यासपीठ मिळवून देण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांचा आवाज अचानक थांबल्याने आंदोलनात एक पोकळी निर्माण झाली.

तरुण नेतृत्वाचा आश्वासक चेहरा असलेले काँग्रेस नेते राजीव सातव यांचं २०२१ मध्ये कोविड काळात निधन झालं. संयमी, अभ्यासू आणि सर्वांना सोबत घेणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. राष्ट्रीय पातळीवर उंच झेप घेण्याची क्षमता असलेला नेता महाराष्ट्राने फार लवकर गमावला.

आज अजित पवार यांच्या अकाली जाण्याने महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे. कणखर, दूरदृष्टी आणि तळागाळापर्यंत जनतेशी नाळ जोडणारे नेते म्हणून अजित पवारांचे नाव होते. स्पष्टवक्तेपणा, प्रशासनावर पकड असणारा नेता म्हणून त्यांची खरी ओळख होती. परंतु, आज त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकाणारातील झंझावात थांबल्याची भावना जनमानसात आहे.

या सर्व नेत्यांच्या अकाली निधनाचा समान धागा म्हणजे, महाराष्ट्राने अनुभवी, लोकांशी जोडलेलं आणि दीर्घकालीन दृष्टी असलेलं नेतृत्व गमावलं. आज राज्याच्या राजकारणात दिसणारी अस्थिरता, नेतृत्वाचा अभाव आणि विश्वासाचं संकट यामागे ही पोकळी स्पष्टपणे जाणवते. इतिहास बदलता येत नाही, पण या नुकसानाची जाणीव ठेवून नव्या नेतृत्वाने अधिक जबाबदारीने, प्रामाणिकपणे आणि दूरदृष्टीने काम करणं, हीच या नेत्यांना खरी आदरांजली ठरेल.

---

लोकसंसद

## 'लिव्ह -इन रिलेशनशिप' एक अयोग्य, घातक विचारसरणी




भारतीय हिंदु संस्कृतीत मानवी जीवन सुफल व्हावे, समृद्ध व्हावे ,मनुष्य जन्माचे सार्थक व्हावे यासाठी काही संस्कार सांगितले आहेत. 'विवाह संस्कार' हा त्यापैकी एक महत्त्वाचा संस्कार आहे. विवाह संस्कारामुळे सभ्य आणि कर्तव्याची जाणीव असलेली कुटुंब व्यवस्था निर्माण होते. समाज स्वास्थ टिकून राहण्यासाठी आदर्श कुटुंब व्यवस्था असणे अगत्याचे असते. कुटुंबसंस्थेचा पाया विवाह संस्कार हा आहे.सात पावले एकत्र चालल्याने मैत्री होतेअसे शास्त्र वचन आहे. म्हणून विवाह संस्कारात सप्तपदीला फार महत्त्व आहे. सप्तपदी म्हणजे वधु- वरांनी एकमेकांचे हात हातात घालून अग्नीभोवती सात प्रदक्षिणा घालणे. लग्न म्हणजे जुळणी किंवा ऐक्य. लग्ना नंतर मुलगी जेव्हा सासरी जाते तेव्हा तिला सासरच्या चालीरीती,परंपरा, कुटुंबातील व्यक्तींचे स्वभाव यांच्याशी जुळवून घ्यावे लागते. विवाहा नंतर स्त्रीचे नावही बदलले जात असे,पूर्वी अशी पद्धत होती. एक प्रकारे तिचा हा पुनर्जन्म असतो. नैतिकता,मानसीकता आणि अध्यात्मिक दृष्टिकोन हा विवाह संस्काराचा पाया आहे. विवाहामुळे पत्नीला धार्मिक कार्याच्या वेळी पतिच्याबरोबर बसण्याचाअधिकार प्राप्त होतो. धर्म, अर्थ काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ पती-पत्नीने एकमेकांच्या सहकार्याने संपादन करायचे असतात. विवाहमुळे स्त्री-पुरुषांच्या समाजविघातक उच्छृंखलपणाला आळा बसतो. स्वैराचाराला नियंत्रित केले जाते. समाज स्वास्थ टिकून राहाण्यासाठी मदत होते.नुकत्याच घडलेल्या एका घटनेत एका युवकाने एका तरुणीला विवाहचे आमीष दाखवून पळवून नेले आणि तिच्याशी शरीर संबंध ठेवले परंतु ती गर्भवती झाल्यावर तिला घराबाहेर काढले. अशा घटना वारंवार समोर येत आहेत या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याची ताकद प्रचलित कायद्यांमध्ये नाही. न्यायसंस्थेनेही या समस्येचा गांभीर्याने विचार करायला हवा असे वाटते. 'यूज अँन्ड थ्रो' असे लव-इन रीलेशनशीपचे स्वरूप आहे. यामुळे स्वैराचाराला प्रोत्साहन मिळते आहे, समाज स्वास्थ्य बिघडते आहे. यामुळे धर्मशिक्षण, धर्मपालन आणि धर्मरक्षण यांची नितांत आवश्यकता आहे असे लक्षात येते.

**– श्रीमती संध्या काटदरे, माणगाव**

---

दिनविशेष

# चतुरस्त्र लेखक गंगाधर महांबरे



गंगाधर महांबरे हे चतुरस्त्र लेखक, कवी व गीतकार होते. त्यांचा जन्म ३१ जानेवारी १९३१ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मालवण येथे झाले. १९४८ मध्ये शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यांनी पुढे १९५६ मध्ये पुणे विद्यापीठातून बीएची पदवी मिळवली. नोकरी करीत असतानाच त्यांनी मुक्त पत्रकारिता आणि लेखन सुरू केले होते. १९५४ पासून केलेल्या गीतांमधील ध्वनिमुद्रित झालेली त्यांची अनेक भावगीते आजही लोकप्रिय आहेत. वृत्तपत्रे, मासिके, नभोवाणी, दूरदर्शन, चित्रपट, रंगभूमी कॅसेट्स इत्यादींसाठी त्यांनी विविध प्रकारचे लेखन केले. त्यांचे साहित्य नाटिका, बालसाहित्य, चरित्रे, गाण्यांचे संपादन आणि गीतसंग्रह अशा विविध प्रकारात आहे. 'दिलजमाई', 'रंगपंचमी', 'सिंधुदुर्ग', 'कोल्हा आणि द्राक्षे' अशा अनेक नाटिका. 'देवदूत', 'संतांची कृपा', 'नजराणा' ही नाटके. 'गौतमबुद्ध', 'जादूचा वेल', 'जादूची नगरी', 'बेनहर', 'शुभम् करोती', 'किशोरनामा', 'मॉरिशसच्या लोककथा' इत्यादी बालसाहित्याची पुस्तके. 'वॉल्ट डिस्ने', 'चार्ली चॅप्लिन', 'भावगीतकार ज्ञानेश्वर', अशी उपयुक्त पुस्तकेही त्यांनी लिहिली. या गद्यलेखनाबरोबर 'आपली आवड', 'उष:काल', 'रसिका तुझ्याचसाठी', 'मराठी गझल', 'आनंदाचे डोही' इत्यादी गीतसंग्रह त्यांच्या नावावर आहेत. त्यांची गद्यलेखन शैली साधी, सरळ, प्रासादिक आहे आणि गीतांमध्ये सोपी रचना व शब्दांची अचूक निवड हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या 'मौलिक मराठी चित्रगीते' या पुस्तकाला २००१ साली राष्ट्रपतींनी सुवर्णकमल देऊन राष्ट्रीय सन्मान केला आणि 'ग्रामीण उद्योगाच्या यशस्वी वाटा' ह्या पुस्तकाला २००८ सालचा महाराष्ट्र शासनाचा वसंतराव नाईक पुरस्कार मिळाला. तिन्ही सांजा सखे मिळाल्या, नववधू प्रिया मी बावरते, मधू मागशी माझ्या सख्यापरी, जन पळभर म्हणतील हाय हाय, 'मावळत्या दिनकरा' इत्यादी कित्येक गीते आज आकाशवाणी, टीव्ही, सी.डी. या माध्यमातून लोकप्रिय झालेली आहेत. भक्तिगीते, भावगीते लिहिणाऱ्या महांबरे यांनी करिअर आणि उद्योगाच्या वाटा या विषयावर तितक्याच ताकदीने विपुल लेखन केले. अशा या चतुरस्त्र लेखकाचे २३ डिसेंबर २००८ रोजी निधन झाले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

३१ जानेवारी

१)श्रीम.प्रज्ञा दिलीप जोशी
ब्राम्हणआळी, अलिबाग
३१-१-१९५०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**स्व. वामन दामोदर पाटील स्मरणार्थ विद्यानगर अलिबाग**

## टेम्पो ट्रॅव्हलर उलटून अपघात

**रत्नागिरी :** किल्ले रायगडचे दर्शन घेऊन परतणाऱ्या शिवभक्तांच्या वाहनाला पुनाडे घाटात भीषण अपघात झाला. ब्रेक फेल झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि टेम्पो ट्रॅव्हलर उलटली. या अपघातात पाच जण जखमी झाले असून यातील तीन जणांची प्रकृती गंभीर आहे. अहिल्यानगर येथील १८ शिवभक्त टेम्पो ट्रॅव्हलरने रायगड दर्शनासाठी आले होते. सायंकाळी दर्शन आटोपून माणगाव मार्गे पुण्याकडे परतत असताना रायगड-माणगाव रस्त्यावरील पुनाडे घाटात एका धोकादायक वळणावर वाहनाचे ब्रेक अचानक फेल झाले. यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून टेम्पो रस्त्यावरच उलटला. यात पाच जण जखमी झाले असून तिघांना गंभीर दुखापत झाली. त्यांना पुढील उपचारांसाठी माणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

## सुमारगडावर श्रमदान मोहिमेचे आयोजन

**रत्नागिरी :** किल्ले सुमारगडवरील कोसळली लोखंडी शिडी पुन्हा बसविण्यासाठी गडकिल्ले संवर्धन प्रतिष्ठानच्या रत्नागिरी विभागामार्फत १ फेब्रुवारी रोजी श्रमदान मोहीम राबविली जाणार आहे. या मोहिमेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी ३१ जानेवारी रोजी संध्याकाळी ७ वाजेपर्यंत किल्ले महिपतगड (वाडी बेलदार) पायथा येथे एकत्र जमायचे आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.१ फेब्रुवारी रोजी सकाळी ६ वाजता आवश्यक सर्व साहित्य घेऊन चढाईस सुरुवात होईल. साधारण सकाळी ९ वाजता शिडी बसविण्याच्या कामाला सुरुवात होईल.

# नेरळ खांडा येथील पूल दुर्लक्षित

## • सार्वजनिक बांधकाम खात्याचा निष्काळजीपणा; वाहतूक कोंडीमुळे स्थानिक त्रस्त




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावातून जाणाऱ्या कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील नेरळ खांडा गावाच्या हद्दीत असलेला लहान पूल वाहतुकीस बंद आहे. जून २०२५ पासून हा पूल वाहतुकीस बंद असल्याने तेथे वाहनांची कोंडी होत असून मागील सात महिन्यात सार्वजनिक बांधकाम खात्याने कोणत्याही प्रकारची दुरुस्ती अथवा नवीन पूल बांधण्याची कार्यवाही केलेली नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या निष्काळजीपणामुळे नेरळ गावात खांडा पुलाच्या परिसरात स्थानिकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. दरम्यान हा पूल जून २०२५ पासून बंद असून देखील बांधकाम खात्याला किंवा स्थानिक लोकप्रतिनिधी यांना कोणत्याही प्रकारचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येत आहे.

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ गावातील खांडा येथे माथेरान डोंगरातून वाहून येणारे पाणी जाणाऱ्या नाल्यावर पूल बांधण्यात आला आहे. हा पूल किमान ४० ते ५० वर्षे जुना असून, या पुलावरून होणारी वाहतूक ही अनेक वर्षे सुरू आहे. त्यानंतर मागील १० वर्षे आधी कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्याचे रुंदीकरण झाल्यानंतर या लहान पुलाच्या बाजूला नवीन पूल बांधण्यात आला. २७ जून २०२५ रोजी सायंकाळच्या वेळी या पुलाचा पाया खचला असल्याचे आणि कोणत्याहीक्षणी अपघात होण्याची शक्यता लक्षात घेतल्यावर स्थानिक लोकांनी पूल वाहतुकीस बंद केला. त्यानंतर जवळच असलेल्या नेरळ पोलीस ठाण्याचे पोलिसांनी पुलाची पाहणी करून पूल वाहतुकीस तात्काळ बंद करण्यात आला. २८ जून रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी उरण येथून कर्जत-नेरळ भागात येऊन पुलाची पाहणी केली. अधिकाऱ्यांनी पुलाची स्थिती लक्षात घेऊन पूल वाहतुकीस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी त्या पुलावरून कोणतेही वाहन ये-जा करू नये यासाठी लोखंडी पाईप लावून पूल वाहतुकीस बंद केला.

जून २०२५ पासून जानेवारी २०२६ पर्यंत यापुलावरील वाहतूक बंद आहे. पावसाळा संपून तीन महिने लोटले आहेत; तरी देखील जुन्या बंद ठेवलेल्या पुलाच्या जागी नवीन पूल बांधला गेलेला नाही आणि बांधकाम देखील सुरु झालेले नाही. पुलाचे बांधकाम त्या पुलाची लांबी लक्षत घेता दोन महिन्यात पूर्ण होऊ शकले असते. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने पुलाचे बांधकाम सुरूच केले नसल्याने पूल तेथे रस्ता वाहतुकीस बंद आहे. माथेरानसारख्या पर्यटनस्थळाकडे जाणारी प्रवासी वाहने याच रस्त्याने ये-जा करीत असतात. असे असताना पूल वाहतुकीस बंद ठेवण्यात आल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीला सर्वांना सामोरे जावे लागत आहे.

### एकदाही स्ट्रक्चरल ऑडिट केले नाही

रस्त्याची देखभाल दुरुस्ती खारपाटील कंपनीकडे आहे. त्यांनी या रस्त्याचे मागील दहा वर्षांत एकदाही स्ट्रक्चरल ऑडिट केले गेलेले नाही. त्याचवेळी पूल वाहतुकीस बंद होऊन सात महिने लोटले तरी बांधकाम विभाग नवीन पुलाचे काम सुरु करीत नसल्याने बांधकाम खात्याच्या अशा कारभाराबद्दल संताप व्यक्त होत आहे.

## एसटी बसेसचे फलक अस्पष्ट

**रत्नागिरी :** रत्नगिरी विभागातून पहाटेपासून एसटी बसेस विविध मार्गावर धावतात. शहरी बसेस रत्नागिरी ते हातखंबा, रेल्वेस्टेशन व विविध गावात धावते. या बसेसवरील गावाच्या नावाचे फलक धुसर, अक्षर फिकट झाले आहे. त्यामुळे विद्यार्थी, सामान्य प्रवाशांना वाचता येत नाही. तर दुसरीकडे जिल्ह्यांतर्गत राजापूर, लांजा, चिपळूण, रत्नागिरी, गुहागर, देवरूख, संगमेश्वर, दापोली, खेड तालुक्यात एसटी बसेस धावतात.

काही बसेसवरील नावाचे फलक चांगल्या पध्दतीने दिसते तर काही बसेसवर धुसर दिसत आहे. काही वाहक तोंडाने गावाचे, तालुक्याचे नाव घेत आहेत. त्यामुळे कित्येक वेळा गाडी चुकते. लांबपल्याच्या एसटी बसेसमध्ये लाल रंगाच्या अक्षरात ठळक नावे दिसते, परंतु काही बसेवरील फलकावरील नावे दिसत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे शहर, ग्रामीण भागातील जिल्हांतर्गत बसेसवरील गाव, शहराच्या नावांची फलक ठळक पद्धतीने नवीन बसवावे, अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.

## संविधान जीवनमूल्यांचा मार्गदर्शक ग्रंथ : रेश्मा धुमाळ

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

भारतीय संविधान हे कायद्याचे संकलन नसून ते प्रत्येक भारतीय नागरिकासाठी जीवन मूल्यांचा मार्गदर्शक ग्रंथ आहे. भारतीय संविधानातील मूल्य व्यक्तीला स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधूता यांची शिकवण देतात. त्यातून व्यक्ती माणूसपण शिकून जीवन जगायला शिकतो, असे प्रतिपादन आदर्श शाळा मजगावमध्ये प्रजासत्ताक दिनी आयोजित कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ यांनी केले.



ध्वजारोहणानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका धुमाळ यांनी संविधान निर्मितीमागील ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. तसेच या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर लेझीम व सामुहिक कवायत, भाषणे व नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## माणगाव येथे रस्ता सुरक्षा अभियान

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी माधव सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात ठिकठिकाणी रस्ता सुरक्षा अभियानाद्वारे वाहनचालक मालकांना मोलाचे मार्गदर्शनासाठी शिबीर घेण्यात आली आहेत. असेच एक शिबीर माणगाव शहरात गुरुवारी (दि.२९) घेण्यात आले. याप्रसंगी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार-वाहन निरीक्षक सूर्यकांत गंभीर यांनी वाहन चालक-मालक यांना मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, रस्ता सुरक्षा अभियान म्हणजे समाजाच्या सुरक्षेचे अभियान असून वाहन चालविताना प्रत्येक वाहन चालकांनी चालकाने स्वतःची तसेच रस्त्यावरून चालणाऱ्या पादचाऱ्यांच्या जीवाची काळजी घेतली पाहिजे. प्रत्येकाने वाहनांच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केल्यास अपघातास आळा बसू शकतो.

तसेच, प्रत्येक वाहन चालकाने आपल्या वाहनांची कागदपत्रे तसेच आपले वाहन सुस्थितीत आहे की नाही, याची खात्री करूनच वाहन चालविले पाहिजे. मोटारसायकलस्वारांनी डोक्यात हेल्मेट घालूनच वाहन चालविले पाहिजे. चार चाकी वाहन चालकांनी सीट बेल्ट लावूनच वाहन चालविणे. प्रत्येक वाहन चालकांनी वाहन चालविण्याचा परवाना काढला पाहिजे. तसेच वेगावर नियंत्रण ठेऊन जादा भार टाळले पाहिजे. वाहन चालविताना प्रत्येकाने योग्य काळजी घेतली तर अपघातांचे प्रमाण कमी होऊन अनेकांचे जीव वाचतील, असे सूर्यकांत गंभीर यांनी सांगितले.

माणगावमध्ये झालेल्या रस्ता सुरक्षा अभियान शिबिरात माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. श्रेयश कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांनी ९६ वाहन चालकांची नेत्र तपासणी तसेच ९६ वाहन चालकांची आरोग्य तपासणी केली.

## वीज चोरांना महावितरणचा दणका

**। कल्याण । प्रतिनिधी ।**



महावितरणकडून वारंवार आवाहन करूनही आकडे टाकून अथवा वीज मीटरमध्ये छेडछाड करणाऱ्या कोनगाव परिसरातील आठ वीज ग्राहकांना महावितरणने दणका दिला आहे. या वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डिसेंबर २०२५ मध्ये महावितरणच्या टिटवाळा उपविभाग अंतर्गत कोनगाव शाखा अंतर्गत ग्राहक तपासणी मोहीम राबविण्यात आली. यात एकूण विजचोरीचे ८ प्रकरणे उघडकीस आली असून २७३९९ युनिट्सची विजचोरी व सुमारे ६ लाख ६१ हजार इतक्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली.

विजचोरी प्रकरणी ग्राहकांवर सहाय्यक अभियंता धनंजय पाटील यांनी दिलेल्या लेखी तक्रारीनंतर शांतीनगर पोलीस स्टेशन भिवंडी येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महावितरण कल्याण परिमंडळ मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, मंडळ अधीक्षक अभियंता विजय फुंदे, कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली विजचोरीला आळा घालण्यासाठी व विजहानी कमी करण्यासाठी टिटवाळा उपविभाग अंतर्गत कोन शाखा येथे ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत कोन शाखा अंतर्गत वॉटर सप्लाय रोड, पाचमार नगर, तरीपार या परिसरातील ८ विजग्राहकांवर विजचोरी बिल न भरल्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## मराठी भाषा शिक्षणाचा आत्मा: सुदर्शन खांबल

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा येथील द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय आणि जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स यांच्यातील सामंजस्य करार अंतर्गत ग्रंथालय विभाग व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६ साजरा करण्यात आला. या पंधरवड्यानिमित्त मंगळवारी (दि.२७) सायंकाळी ७ वाजता शिक्षणातील मराठी भाषेचे महत्त्व या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या व्याख्यानासाठी मार्गदर्शक म्हणून सुदर्शन बाळाराम खांबल उपस्थित होते. मार्गदर्शन करताना सुदर्शन खांबल यांनी सांगितले की, मराठी ही भारतातील एक प्राचीन, समृद्ध आणि अभिजात परंपरा असलेली भाषा आहे. ही भाषा इंडो-आर्यन भाषा कुटुंबातील असून प्रामुख्याने महाराष्ट्र राज्याची राजभाषा आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, एकनाथ, समर्थ रामदास यांनी मराठी भाषेला वैचारिक आणि साहित्यिक उंची प्राप्त करून दिली. शिक्षण प्रक्रियेत मातृभाषेचे महत्त्व, ज्ञानसंपादनातील मराठी भाषेची भूमिका आणि विद्यार्थ्यांनी मराठीचा अभिमान बाळगण्याची गरज यावर सविस्तर विवेचन केले. तसेच, जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजीचे महत्त्व वाढले असले तरी मराठी भाषेचे संवर्धन, जतन आणि प्रसार करणे ही आपली सामाजिक व सांस्कृतिक जबाबदारी असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. साक्षी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मराठी विभाग प्रमुख विजय चव्हाण यांनी प्रास्ताविकातून मराठी भाषेचे शैक्षणिक व सामाजिक जीवनातील स्थान अधोरेखित केले. यानंतर जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील प्राचार्य डॉ. सचिन व्ही. बंगाळे यांनी मनोगत व्यक्त करत मराठी भाषा संवर्धनासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा येथील प्राचार्य डॉ. एन. एस. यादव उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी मराठी भाषेचा वापर शिक्षण, संशोधन व दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वाढवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील ग्रंथपाल प्रा. धवन एस. के. यांनी आभार मानले.


**अनंत रेवाळे कुटूंबाचा पुढाकार** | **समाजासाठी एक नवा आदर्श**

# अवयवदानातून तीन रुग्णांना मिळाली नवसंजीवनी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

'मरावे परी कीर्तीरूपे उरावे' या उक्तीला खऱ्या अर्थाने साकार करणारा एक प्रेरणादायी प्रसंग महाड तालुक्यातील खैरे गावातून समोर आला आहे. खैरे गावचे भूमिपुत्र तसेच वलंग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष स्वर्गीय अनंत रेवाळे यांचे मंगळवारी (दि.२०) वाशी येथील फोर्टिस हिरानंदानी रुग्णालयात वयाच्या ६४ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर कुटुंबीयांच्या संमतीने यकृत व दोन्ही मूत्रपिंडांचे अवयवदान करण्यात आले.

या धाडसी व मानवतावादी निर्णयामुळे तीन रुग्णांना नवसंजीवनी मिळाली असून, ग्रामीण भागातून अवयवदानाच्या चळवळीत एक नवा आदर्श निर्माण झाला आहे. अनंत रेवाळे यांच्या कुटुंबीयांनी घेतलेल्या या निर्णयामुळे समाजात अवयवदानाबाबत सकारात्मक संदेश पोहोचला आहे.



डॉक्टरांच्या मते, भारतात अवयवदानाचे प्रमाण अजूनही अत्यंत कमी आहे. धार्मिक गैरसमज, भीती आणि जनजागृतीच्या अभावामुळे अनेकवेळा मृत्यूनंतरही अवयवदान केले जात नाही. परिणामी योग्य वेळी अवयव न मिळाल्याने अनेक रुग्णांना आपले प्राण गमवावे लागतात. मात्र परदेशात अवयवदानाचे प्रमाण तुलनेने खूप जास्त आहे. आधुनिक वैद्यकीय शास्त्रामुळे आज अवयवदानाच्या माध्यमातून अनेकांना नवे जीवन देणे शक्य झाले आहे. मंगळवारी बंगळुरू ते नवी मुंबई दरम्यान उभारण्यात आलेल्या ग्रीन कॉरिडॉरमुळे अवयवांची वाहतूक अत्यंत वेगाने व सुरक्षितरीत्या पूर्ण करण्यात आली.

> “झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेंटर, मुंबईच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अवयवांचे वितरण करण्यात आले आहे. या अवयवदानामुळे तीन रुग्णांना नवजीवन मिळाले.”
>
> - संगीता देसाई, प्रशासकीय अधिकारी व ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेटर

स्वर्गीय अनंत रेवाळे हे महाड तालुक्यातील खैरे गावचे रहिवासी होते. ते वलंग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तसेच न्यू इंग्लिश स्कूलचे माजी विद्यार्थी होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई आणि नातवंड असा मोठा परिवार आहे. मृत्यूनंतर अवयवदानामुळे साधारणपणे ८ लोकांचे प्राण वाचू शकतात. हे एक सर्वोच्च दान मानले जाते. त्यामुळ रेवाळे कुटुंबाने घेतलेला हा निर्णय अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. मृत्यूनंतर अवयवदानाबाबत समाजात व्यापक जनजागृती होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### ग्रीन कॉरिडॉरमुळे जीवनदायी मोहिमांना गती

ग्रीन कॉरिडॉरसारख्या व्यवस्थेमुळे वेळेत जीवनदायी मोहिमांना गती मिळते. एखादी व्यक्ती 'ब्रेन डेड' घोषित झाल्यानंतर हृदय, मूत्रपिंड, फुफ्फुसे, यकृत, स्वादुपिंड, आतडे तसेच त्वचा, डोळे (कॉर्निया) आणि विविध ऊती दान करता येतात. अशा अवयवदानामुळे अनेक रुग्णांसाठी आशेचा नवा किरण निर्माण होतो.

# निवडक

## पार्क केलेल्या दुचाकीची चोरी




**नेरळ :** भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात पार्किंग केलेली दुचाकी चोरी झाल्याची घटना घडली आहे. गणेश उघडे या आदिवासी तरुणाच्या दुचाकीची चोरी झाली असून याबाबत नेरळ पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे. कर्जत तालुक्यातील असल ग्रामपंचायतमधील चिंचवाडी येथे राहणारा गणेश शिवाजी उघडे गेली दोन वर्षे भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात आपली दुचाकी पार्किंग करतो. एन एस १६०या कंपनीची एम एच ४६ सी पी २३६१ या क्रमांकाची दुचाकी पार्क करून तो नेहमीप्रमाणे दादर या ठिकाणी खासगी कंपनीमध्ये नोकरीसाठी गेला होता. दिवसभरामध्ये आपले काम करून नेहमीप्रमाणे लोकल पकडून हा आपल्या परतीच्या प्रवास करून भिवपुरी स्टेशन येथे संध्याकाळी साडेपाच वाजता भिवपुरी रोड येथे पोहचला. मात्र नेहमीच्या जागेवर त्यांची दुचाकी आढळून आली नाही. त्यानंतर त्याने परिसरात दुचाकीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, कुठेही दुचाकी आढळून आली नाही. त्या भागातील सीसीटीव्ही फुटेज तपासून शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र दुचाकी आढळून आली नाही. त्यानंतर गणेश उघडे या तरुणाने नेरळ पोलीस ठाणे येथे जाऊन आपली दुचाकी हरवल्याची तक्रार नोंदवली.




## चिल्हे विद्यालयात सिकलसेल अभियान

**खांब :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे गुरुवारी (दि.२९) सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासनाच्या वतीने सिकलसेल विशेष अभियान राबविण्यात आले. शासनाच्या वतीने सिकलसेल विशेष अभियान अंतर्गत दि.१५ जानेवारी ते ७ फेब्रुवारीपर्यंत सर्वच ठिकाणी या अभियानास प्रारंभ करण्यात आला आहे. या अभियानात तपासणी, निदान व उपचार तसेच समुपदेशन व जनजागृती आदीबाबत प्रबोधन केले जात आहे. श्रमिक विद्यालय चिल्हे येथे राबविण्यात आलेल्या या अभियानप्रसंगी आरोग्य विभागाचे कांचन तेलंगे, प्रतिभा पोटफोडे, आशिष दसरे, तृप्ती महाडिक, सायली मरवडे, भारती वरखले, मुख्याध्यापक दिपक जगताप आदी उपस्थित होते. तर या अभियानात विद्यालयातील सुमारे २५० विद्यार्थी वर्गाची तपासणी करुन समुपदेशन करण्यात आले.



## विठ्ठल-रखुमाई मंदिराचा वर्धापन दिन

**खांब :** रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र नडवली येथे श्री विठ्ठल-रखुमाई व हनुमान मंदिराचा द्वितीय वर्धापन दिन सोहळा बुधवारी (दि.२८) मोठ्या भक्तीभावाने साजरा करण्यात आला. या वर्धापन दिन सोहळ्याप्रसंगी सकाळी देवतांना अभिषेक, दुपारी श्री सत्यनारायणाची महापूजा, सायंकाळी हभप कृष्णाराम धनवी यांची प्रवचन सेवा तद्नंतर सामुदायिक हरिपाठ व ७ ते ९ रायगड भूषण हभप डॉ. मारूती महाराज कोलाटकर यांची हरिकितर्नरुपी सेवा करण्यात आली. त्यानंतर महाप्रसाद व जागर भजन आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम पार पडले. या वर्धापन दिन सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ नडवली व तरूण मंडळाचे कार्यकर्ते यांनी मोलाचे सहकार्य केले.

## उरण महाविद्यालयात हुतात्मा दिन साजरा



**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने महाविद्यालयात हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. ३० जानेवारी हा भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा स्मृतिदिन असून हा दिवस हुतात्मा दिन म्हणून सबंध देशात पाळला जातो. या दिवशी देशासाठी शहीद झालेल्या क्रांतिवीरांना अभिवादन केले जाते. या पार्श्वभूमीवर महाविद्यालयात महात्मा गांधी स्मृतिदिन व हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन केले. यावेळी त्यांनी गांधीजींचे अहिंसा हे तत्व जगात प्रभावशाली ठरले आणि त्यामुळेच देशाला स्वातंत्र्य मिळाले, असे प्रतिपादन केले. इतिहास विभाग प्रमुख डॉ. ए.जी. लोणे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करताना गांधीजींच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले.

## पतसंस्थेच्या वर्धापन दिनाचे आयोजन




**माणगाव :** माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी सहकारी पतसंस्था मर्यादित उतेखोल ता. माणगांव या संस्थेचा २७ वा वर्धापनदिन सोहळा रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात येणार आहे. या वर्धापन दिनानिमित्त श्री सत्यनारायणाची महापूजा व महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम संस्था कार्यालय चौधरी कॉम्पलेक्स निजामपूर रोड माणगांव या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्वांनी सहकुटूंब, सहपरिवार, आतेष्ट व मित्रमंडळीसह उपस्थित राहून सायंकाळी ५ ते रात्री ९ यावेळेत तिर्थ प्रसादाचा लाभ घ्यावा, तसेच महिलांनी मोठ्या संख्येने हळदी-कुंकू समारंभास उपस्थित राहावे, अशी विनंती संस्थेचे संस्थापक ॲड. राजीव साबळे, चेअरमन माणगावचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक आनंद यादव, व्हा. चेअरमन मदनलाल जैन, सर्व संचालक, व्यवस्थापक, कर्मचारी वृंद व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी केली आहे.

# महाविस्तार ॲपद्वारे स्मार्ट शेतीकडे वाटचाल

## • सुधागड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी नवी संधी

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाच्या कृषी विभागाने नुकतेच 'महाविस्तार ॲप' विकसित केले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याला डिजिटल सेवेच्या माध्यमातून शास्त्रशुद्ध आणि रिअल-टाइम कृषिविषयक सल्ला देऊन त्यांचे सक्षमीकरण करणे हा या ॲपचा उद्देश आहे.

या ॲपवर हवामान, माती, कृषी सल्ला, खाद-बियाणे, किड-रोग नियोजन, बाजारभाव, बाजारपेठ तसेच विविध शासकीय योजनांची माहिती एकत्रितपणे उपलब्ध आहे. मराठी आणि इंग्रजी भाषेतील चॅटबॉटच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्थानिक व त्यांच्या गरजेनुसार सल्ला सहज मिळू शकतो. क्लिष्ट माहिती आणि शेतीतील व्यवहार्य निर्णय यातील दरी दूर करण्याचे काम महाविस्तार करते. शाश्वत शेती, डिजिटल सक्षमीकरण आणि समृद्ध गावे या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

या ॲपचा वापर करून उत्पादन खर्चात कपात होऊन उत्पन्नात वाढ कशी साधता येईल, यासंदर्भात शास्त्रशुद्ध माहिती देण्यात आली. तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲप इंस्टॉल करून आपल्या शेतीमध्ये त्याचा वापर करावा. ॲपमधील विविध मेनूंचा प्रत्यक्ष वापर करून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतून अधिक लाभ मिळवता येईल, असे त्यांनी सांगितले.



## आदिवासी वाड्यांमध्ये हरिपाठ ग्रंथ वाटप

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

विश्व हिंदू परिषद शिवकल्याण केंद्र सायन मुंबई यांच्या माध्यमातून पेण, खालापूर, पाली आणि रोहा या चार तालुक्यातील १३५ आदिवासी गावांमध्ये घरोघरी हरिपाठ ग्रंथ आणि त्यासोबत गरजेनुसार १०८ मण्यांची जपमाळ यांचे वितरणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ एकादशी निमित्ताने गुरुवारी (दि.२९) हेटवणे आदिवासी वाडीवर करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी अमित महाराज म्हात्रे (बलवळी), कृष्णा वाघमारे महाराज (सावरसई), दशरथ भोपतराव महाराज (पेण), चंदन महाराज (रावे) आणि रसाळ महाराज पेण, ढेणे महाराज (आंबेघर) तसेच जयराम महाराज आणि विशाल महाराज हेटवणेवाडी या सर्व कीर्तनकारांनी कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन कार्यक्रम भव्य स्वरूपात पूर्ण करण्यासाठी सहकार्य केले.

हा कार्यक्रम उत्तम प्रकारे पूर्ण करण्यासाठी विश्व हिंदू परिषदेचे पेण प्रखंड अध्यक्ष वर्दीसिंग, सहमंत्री निलेश सुतार आणि उदय पाटील, तालुका धर्मप्रसार विभागाचे प्रमुख जयंतीलाल मालवीय तसेच वाय.के. पाटील आणि रुपेश चव्हाण, गणेश ढेणे आणि उत्तम नियोजक प्रभुदास घरत यांनी सहकार्य केले.

१३५ आदिवासी गाव वाड्यांमध्ये यापुढे तीन महिने कार्यक्रम चालू राहणार आहे. या कार्यक्रमांमध्ये वरील सर्व कीर्तनकार ग्रंथ वाटपासाठी सहकार्य करणार आहेत. अशी माहिती विश्व हिंदू परिषदेचे उत्तम समन्वयक व नियोजक प्रभुदास घरत यांनी दिली.

## विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी पाताळगंगासह तळवली परिसरात नेहमी सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे, सर्वसामान्यांच्या हाकेला धावणारे भानूदास माळकर यांच्या पुण्यस्मरणार्थ त्याचे लहान भाऊ मनोहर माळकर यांनी आपल्या जन्मदिनाचे औचित्य साधून तळवली रायगड जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना दर्जेदार दप्तरांचे वाटप केले. विद्यार्थ्यांना दप्तर मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसून आले. यावेळी शाळेतील शिक्षक मांडे, अतुल माळकर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## रथसप्तमीनिमित्त हळदीकुंकू समारंभ

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रविवारी (दि.२५) पनवेल येथील नवी मुंबई सुवर्णकार विकास मंडळ नवीन पनवेल संचलित नवी मुंबई महिला मंडळ सुवर्णसखी वतीने रथसप्तमीचे औचित्य साधून महिला हळदीकुंकू व तिळगूळ समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. हा पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रम नवी मुंबई सुवर्णकार महिला मंडळाच्या कार्यालयातसेक्टर वन/एस, प्लॉट नं. १३६/बी, शबरी हॉटेलजवळ, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आला होता.



हळदीकुंकू हा सौभाग्य, समृद्धी आणि स्त्रीशक्तीचे प्रतीक मानला जातो. महिलांमधील स्नेह, आपुलकी व सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करणारा हा पारंपरिक सोहळा असल्याने सुवर्णकार समाजातील महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. संक्रांती व रथसप्तमीच्या निमित्ताने सुवासिनींना तीळगूळ व वाण देण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान महिलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, विविध खेळ, तसेच महिलांनी थाटलेले स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल्स यामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय व उत्साही झाले होते. सर्व उपस्थित महिलांनी याचा मनमुराद आनंद लुटला. याप्रसंगी सुवर्णकार समाजातील महिला भगिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष सी. डी. मोरे तसेच कार्याध्यक्ष धनराज विसपुते यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना या कार्यक्रमात नवीन सुरू केलेल्या नवी मुंबईतील सुवर्णकार मंडळाच्या महिलांनी खाद्य पदार्थांचे स्टॉल्स लावून एक वेगळाच प्रयत्न केल्याबद्दल महिला मंडळाची स्तुती करून शुभेच्छा दिल्या.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड येथील गट नं.७६/२/ब, क्षेत्र ०-६६-०० हे.आर., पो.ख. ०-०५-९० हे.आर. एकूण क्षेत्र ०-७१-९० हे.आर., आकार १५.८३ रू.पै. या मिळकतीपैकी क्षेत्र ०-२०-५० हे.आर., आकार ४.९२ रू.पैसे या मिळकतीतील प्रतिक श्रीयाळ म्हात्रे रा मु.वालवडे, पो. पोयानाड, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे मालकीचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ३०/०१/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप.हौ.सो., ए विंग,
रूम नं.५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळिवण्यात येते की, आमच्या अशिल रोशनी वसंत उद्यावर या मौजे झिराडपाडा, गट नं. १३/१ क्षेत्र १ हेक्टर २७.३० आर, पोटखराबा ० हे. ७.९० आर, एकूण क्षेत्र १ हे. ३५.२० आर, आकार ८ रूपये ६४ पैसे या वर्णनाच्या जमिन मिळकतीच्या मालक व भोगवटादार आहेत.

वर नमूद मिळकतीसंदर्भातील खाली नमूद केलेले मुळ दस्तऐवज हे हरवले आहेत किंवा गहाळ झालेले आहेत व त्यांचा शोध लागत नाहीः

(अ) १) श्री. यशवंत नरसु चिंबुलकर, २) श्री. नारायण नरसु चिंबुलकर, ३) सुंदर नरसु चिंबुलकर यांनी श्री.दुर्गाप्रसाद रामरीखदास परसरामपुरिया यांचे लाभात स्वाक्षरीत केलेले दिनांक १४/८/२००१ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. अलज १४३७/२००१ कडे नोंदविण्यात आलेले मौजे झिराड गट नं.२१८ क्षेत्र १ हेक्टर ४७.२० आर, आकार ९ रूपये ४५ पैसे या मिळकतीचे खरेदीखत.

(ब) श्री.दुर्गाप्रसाद रामरीखदास परसरामपुरिया यांनी रोशनी वसंत उद्यावर यांचे लाभात स्वाक्षरीत केलेले दिनांक २६/११/२००२ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. अलज २०००/२००२ ता. २७/११/२००२ कडे नोंदविण्यात आलेले मौजे झिराड गट नं.२१५ क्षेत्र ० हेक्टर २९.८० आर, आकार ३ रूपये ७५ पैसे आणि मौजे झिराड गट नं. २१८ क्षेत्र १ हेक्टर ४७.२० आर, आकार ९ रुपये ४५ पैसे या मिळकतींचे खरेदीखत.

या नोटीसीद्वारे अशी विनंती करिते की, सदर मिळकती संदर्भातील मुळ दस्तऐवज ज्या व्यक्तींना सापडले असतील त्यांनी खाली दिलेल्या पत्त्यावर सदर कागदपत्रे आणून द्यावीत. ज्या व्यक्तींचा सदर दस्तऐवजांच्या अनुषंगाने कोणताही हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी सदरचे दस्तऐवज या नोटीसीच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसात ज्या दस्तऐवजांच्या आधारे ते असा हक्क सांगू इच्छित आहेत त्या संबंधीत मुळ दस्तऐवजांच्या प्रतींसह खाली नमूद केलेल्या आमच्या पत्त्यावर लेखी कळवावे, मुदतीत कुणाकडूनही तसे कळिवण्यात न आल्यास कुणाच्याही ताब्यात सदरचे मुळ दस्तऐवज नाहीत व कुणाचाही, कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे, असे गृहित धरण्यात येईल.

अलिबाग
तारीख : ३१/१/२०२६

सही/-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर**
'सी-३०१ 'क्लिफ हेवन' को. ऑप.
हा. सोसायटी, स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
मयुर बेकरी समोर, कोर्ट रोड, अलिबाग,
रायगड, ४०१ २०१.

### MAHAVITARAN — TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

Following Tender is invited from Eligible Bidders for Pen Circle, Raigad District. The Details are as given below-

| Tender No. | Particulars | Sale Opening, Sale Closing Dates & Bid Submission |
|---|---|---|
| SE/PC/T/ BM Substation / T-07/ 2025-26 | Empanelment of Agencies for Breakdown Maintenance of Substation in Pen Circle Bhandup Zone | Sale Date;- Dt.30/01/2026 To Dt.09/02/2026 up to 17.00 Hrs. Bid Submission Dt. 09/02/2026 upto 22:00 Hrs. |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://works.mahadiscom.in/eTender/etender.

PRO NO - 011
Sd/-
SUPERINTENDING ENGINEER (PC), PEN

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळिवण्यात येते की, आमचे अशिल श्री. सुभाष दिगंबर काळे, श्री. प्रकाश भास्कर पेडणेकर व श्री. सुनिल सदाशिव कोथमिरे यांनी मौजे उसर, ता.अलिबाग, जि.रायगड येथिल खालील नमुद शेतजमिन मिळकत सदर मिळकतीचे मालक श्रीमती सुजाता भालचंद्र शिंदे, सौ.काजल जिवेश कार्लेकर व कु.मोहित भालचंद्र शिंदे यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांच्या संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे उसर, ता.अलिबाग, जि.रायगड भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. २०/२/२ जिरायत क्षेत्र ०-१६-२० पो. ख. ०-००-८० हे.आर.चौ.मी एकूण क्षेत्र ०-१७-०० हे.आर.चौ.मी. आकार ४.१९ रू.पैसे ही शेत जमिन मिळकत.

अलिबाग
दिनांक

**ॲड. प्रसाद विजय वर्तक**
१०२, बी विंग, पहिला मजला, हर्षनिती को. ऑप
हौसिंग सोसायटी मर्यादीत,
बिरमोळे हॉस्पिटलजवळ, ठाणा नाका
रोड. पनवेल, ४१०२०६. मो.नं.९२७१५९३४७१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे पाचघर, ता. तळा, जि. रायगड येथिल .....**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु.पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री.ऋषिकेश मेघनाथ किल्लेकर<br>श्री.विशाल मोहन साबळे | १५/६/अ | वरकस ००-७५-००<br>पो.ख. ००-१४-००<br>एकुण ००-८९-०० | ०.३१ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (७) सात दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. ०१/०२/२०२६

सही/-
**ॲड.पी.जी.दाभाडे**
रा.फ्लॅट नं.४०२, बी-बींग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे डॉस्पिटल जवळ, ता.रोहा,
जि.रायगड पिन नं. ४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

### जाहिरात क्रमांक. ८/२०२६

भारत सरकार
सार्वजनिक उपक्रम निवड मंडळ
**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड मध्ये संचालक (वित्त)**
पदासाठी अर्ज मागवत आहे.
अर्जदारांसाठी अर्ज करण्याची शेवटची
**तारीख ०६/०२/२०२६ १५:०० वाजे पर्यंत) आहे.**
नोडल अधिकाऱ्यांसाठी
सार्वजनिक उपक्रम निवड मंडळाकडे अर्ज पाठवण्याची शेवटची
**तारीख १६/०२/२०२६ (१७:०० वाजे पर्यंत) आहे.**
तपशीलांसाठी, कृपया वेबसाइटवर
https://pesb.gov.in लॉग इन करा.

### सिडको — शहरांचे शिल्पकार

### जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र/करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. / हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ता.पनवेल, जि.रायगड | | | | |
| १ | उलवे २६९ | गव्हाण ८४२ | ४०६/१(१)<br>४०८/१(१)<br>४०७/१(१)<br>४०५/१(१)<br>४१०/१(१) | ०-२९-०<br>१-४९-०<br>२-९४-०<br>०-७०-०<br>०-४८-० | एकुण ६५०० चौ.मी. पैकी दावा क्र. १००/२००१ मधील मा. न्यायालयीन आदेशानुसार शिल्लक १०० चौ.मी. प्रस्तावित | उलवे नोड येथील भूखंड क्र. १५, सेक्टर-१५A, क्षेत्र-९३.२० चौ.मी. | श्री. लक्ष्मण हनुमंत सुर्यराव व श्रीमती सविता रविंद्र बागराव यांच्यावतीने कोर्ट कमिशनर ॲड. किशोर कान्हा पाटील | स्पे. दरखास्त क्र.६२/२०२२ |
| | | गव्हाण ८३१ | १५२(५) | ०-५३-० | | | | |
| २ | उलवे १२७० | बंबावी १६C | ४६/३+४अ | ०-४०-८ | १९५० चौ.मी. पैकी २०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. १K, सेक्टर-८C, क्षेत्र-२०० चौ.मी. | श्री. जनार्दन विठ्ठल पाटील | -- |
| | | बंबावी २३अ | ३८/२<br>४१/०<br>४२/२<br>४३/४<br>४३/१३<br>४४/० | ०-२४-८<br>०-३७-०<br>०-६९-३<br>०-२७-६<br>०-४-३<br>०-१६-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करावयाचे ठिकाण : मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,
तळ मजला, सिडको भवन, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४७९/२०२५-२६

### कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग
### ता.अलिबाग, जि. रायगड
### जाहीर नोटीस

मो.नं.७२७६२५११०७/८८८८१०७२१९

कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग या समितीचे आर्थिक वर्ष दि. ०१/०४/२०२६ पासून सुरु होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण अलिबाग तालुका व उरण तालुका (३३ गावे) आहेत. बाजार समितीने नियमित केलेले भात, तांदुळ, ज्वारी, बाजरी, गहु, मका, सोयाबीन, वरी, बावटे, (नाचणी), जव, बंटी, सर्व प्रकारचे कडधान्ये, सरकी, सुके खोबरे, सरसव (आळशी), साबुदाणा, राजगिरा, नारळ, सुपारी, भुईमुग, जवस, तीळ, करडई, सरकी, करळे तीळ, ओवा, शेपा, धने, मेथी, तंबाखू, मैदा, गव्हाचे पीठ, चहा, साखर, ऊस, गुळ, ड्रायफ्रुटस्, खाद्यतेल (सर्व प्रकार) तुप, सर्व प्रकारची फळे, सर्व प्रकारची फुले, सर्व प्रकारचा भाजीपाला, कांदे,बटाटे, लसूण, आले, मिरची पावडर, वेलची, मिरी, बडीशेप, कोकम, जायफळ, विडीची पाने, काजू, जिरे, राई (मोहरी), डिंक (गोंद), चिंच, लवंग, दालचिनी, नागकेशर, अंडी, कोंबड्या, गुरेढोरे, शेळ्या-मेंढ्या, मासळी (ओली व सुकी), बांबू व जळावू लाकूड. यासारख्या शेतीमालाच्या खरेदी विक्रीच्या व्यवहार करणारे व्यापारी, कमिशन एजंट, प्रक्रिया करणारे, शेती मालाची साठवण करणारे स्टोरेज सुपरीटेन्डट, हमाल, तोलाई, दलाल व त्यांचे मदतनीस वगैरे संबंधित इसमांनी सन २०२६-२०२७ सालाकरिता ५ (अ) अन्वये अनुज्ञप्तीच्या (लायसेन्स) नुतनीकरणासाठी दि. ०१/०२/२०२६ ते २८/०२/२०२६ पर्यंत अनुज्ञप्ती नुतनीकरण फी कार्यालयीन वेळेमध्ये भरुन अनुज्ञप्ती नुतनीकरण करुन घ्यावे.

दि.०१/०२/२०२६ ते दि. २८/०२/२०२६ या मुदतीत अनुज्ञप्तीचे नुतनीकरण न केल्यास तद्नंतर विलंब आकारासह (प्रतिदिन रु. २०/-) प्रमाणे दंड आकारणी करुन नुतनीकरण करुन देण्यात येईल. तरी वर नमुद केल्याप्रमाणे समितीच्या कार्यक्षेत्रातील विविध शेतमालाचे खरेदी विक्रीच्या व्यवहार करणारे, स्वस्त धान्य दुकानदार व संबंधित अधिकारी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह अधिकारी व सब एजंटस् हे बाजार समितीचे लायसेन्स घेणे पात्र ठरतील.

समितीने नियमित केलेल्या शेतमालाच्या खरेदी विक्रीचा व्यवहार विना अनुज्ञप्तीने (विना लायसेन्स) अलिबाग बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात करीत असतील त्यांच्यावर महाराष्ट्र कृषी उत्पन्न विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ नुसार योग्य ती पुढील कारवाई करणेत येईल व होणारे सर्व परिणामांची व खर्चाची जबाबदारी त्यांचेवर राहील. अनुज्ञप्ती न घेणारे इसम गुन्ह्यास पात्र ठरतील.

अनुज्ञप्ती नुतनीकरणासाठी करावयाचे अर्ज व इतर माहिती कार्यालयीन वेळेत समितीचे कार्यालयात मिळू शकतील.

**श्री. मंगेश रा.राऊत — सहा.सचिव**
**श्री.आर.डी.मोरे — प्र.सचिव**
**श्री. कमळाकर गो.साखळे — सभापती**
**कृषी उत्पन्न बाजार समिती, अलिबाग, जि.रायगड**

टिप- सर्व अनुज्ञप्ती (लायसेन्स) धारकांनी आपल्याकडील खरेदीचे सन २०२५-२०२६ चे खरेदीचे अहवाल सादर करुन येणे असलेली बाजार फी व सुपरव्हीजन फी च्या रक्कमा कार्यालयात भरणा कराव्यात. अन्यथा त्यांचे लायसेन्स नुतनीकरण केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

कार्यालय - फ्लॅट नं. ८, पहिला मजला, बिल्डींग नं.२,
सी.विंग,पी.एन.पी. नगर, अलिबाग

### क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **बागायती वाडी विक्री** -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३

● **पाहिजे :** अलिबागमधील वृद्ध जोडप्यास भाजीबाजार आणून देण्यासाठी रोजच्या रोज दोन तासासाठी व्यक्ती, विद्यार्थ्यांस पसंती. पगार पाच हजार. संपर्क :८५३०३०९७६५

● We are inviting for internship to graduate candidates for share market trading.Stipend will be paid. For interview call 9923750549

● **पाहिजेत :** अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब्स करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी १५०००, २००००, २५००० + सुपर इन्सेंटीव्ह E Disha infotech या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counselors/sales Executive-10 franchise-10 telecaller-2 Contact- 9082697644, 9372071769

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


### ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**




## राशीभविष्य

- **मेष** : ग्रहमानाची प्रतिकूलता राहील. महत्त्वाचे करार तुर्तास नको. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील.
- **वृषभ** : कौटुंबिक प्रश्नात दिलासा मिळेल. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. अचानक धनलाभ संभवतो.
- **मिथुन** : व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील. मनाजोग्या घटना घडतील. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **कर्क** : छोट्या व्यावसायिकांना दिलासा मिळेल. अनावश्यक खर्च टाळावा. कौटुंबिक स्वास्थ्य लाभेल.
- **सिंह** : उपजत कला-गुणांचा विकास होईल. सरकारी कामं मार्गी लागतील. प्रकृतीच्या तक्रारी उद्‌भवतील.
- **कन्या** : अपेक्षित वार्ता कानी येईल. बेरोजगारांना उत्तम संधी लाभतील. इतरांवर फार विसंबून राहू नका.
- **तूळ** : नव्या जबाबदाऱ्या विचारानं घ्याव्या. कार्यक्षमतेत वाढ होईल. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **वृश्चिक** : कामातील अडचणी दूर होतील. उत्साह वाढीस लागेल. स्थावर प्रश्नात तडजोड गरजेची ठरेल.
- **धनु** : किंमती वस्तुंची काळजी घ्यावी. प्रेम प्रकरणात विचारानं रहावं. दुखणी पुन्हा उद्‌भवू शकतात.
- **मकर** : येणे वसुलीचे प्रयत्न यशस्वी होतील. व्यवसायात उत्कर्ष होईल. स्पर्धांमध्ये यश प्राप्त होईल.
- **कुंभ** : वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल. यांत्रिक क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मीन** : कलाकारांचा उत्साह वाढेल. ज्येष्ठांचं मार्गदर्शन कामी येईल. प्रवासात विशेष काळजी घ्यावी.

## ३१ जानेवारी

दिनविशेष

- १९२०: डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मुकनायक' या पाक्षिकाची सुरूवात.
- १९३१: कवी आणि साहित्यिक गंगाधर महांबरे यांचा जन्म.
- २००४: प्रख्यात व्हायोलिनवादक व्ही.जी.जोग यांचं निधन.
- २०१३: 'पूर्ती' समूहातील संशयास्पद गुंतवणुकीसंदर्भात नितीन गडकरी यांची प्राप्तिकर अधिकाऱ्यांकडून चौकशी.
- २०१४: खलिस्तानवादी दहशतवादी देविंदरसिंग भुल्लर याच्या फाशीला स्थगिती.

## आरोग्यमंत्र — वजन कमी करायचंय?

लठ्ठपणा एक आजार असून यामुळे केवळ व्यक्तिमत्त्वच सदोष होत नाही तर हा आजार इतर आजारांनाही आमंत्रण देतो. लठ्ठपणा वाढल्यास हाय ब्लडप्रेशर, कंबरदुखी, हृदयाचे आजार, गुडघेदुखी यासारखे आजार होण्याचा धोका वाढतो. यामुळेच वजन कमी करण्यासाठी लोक डायटिंग करतात किंवा दिवसातील बराच काळ जिममध्ये घाम गाळतात. परंतु तरीही अनेकांचं वजन कमी होत नाही, कारण त्यांचा डाइट चार्ट योग्य नसतो. मात्र आहाराकडे योग्य लक्ष देल्याने आणि थोडासा व्यायाम केल्याने वजन लवकर कमी करणे शक्य आहे. अशा अवघ्या २१ दिवसांच्या डायट प्लानन‍ेही वाढलेले वजन लवकर कमी होते. खेरीज याचे कोणतेही साईड इफेक्ट बघायला मिळत नाहीत. यामुळे कोणतेही आजार होत नाहीत. उलटपक्षी असतील तर तेही जातात. अशा उपकारक डाएटविषयी जाणून घेऊ या.



* वजन कमी करण्यासाठी पपईचे नियमित सेवन करावे. हे फळ प्रत्येक ऋतूमध्ये मिळते. पपईचे सेवन केल्याने शरीरावरील अतिरिक्त चरबी कमी होते.
* दह्याचे सेवन केल्याने चरबी कमी होण्यास मदत होते. त्यामुळे दिवसातून दोन-तीन वेळेस दही खावे वा हवे तेवढे ताक प्यावे.
* पिंपळाच्या सालीचे चूर्ण भाजून घ्या. दररोज तीन ग्रॅम या प्रमाणात हे चूर्ण ताकामध्ये टाकून घेतल्यास पोट कमी होईल.

## व्हॉट्स न्यू? — शुद्ध पाणी देणारं सोलर पॅनल

अमेरिकेतल्या लास वेगासमधल्या 'झीरो मास वॉटर' नावाच्या कंपनीने एक सोलर पॅनल तयार केलं आहे. हे पॅनल हवेतलं बाष्प शोषून पिण्याचं शुद्ध पाणी देतं. लास वेगासमध्ये झालेल्या 'कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक शो'मध्ये कंपनीने या पॅनलसाठी एक सेन्सर सादर केला. यामुळे पाण्याचा दर्जाही तपासता येणार आहे. यासाठी कंपनीने 'झीरो मास वॉटर' ॲपही तयार केलं असून त्यावर पाण्याचा दर्जा तपासता येईल. मायक्रोसॉफ्टचे संस्थापक बिल गेट्स आणि जगातली सर्वात श्रीमंत व्यक्ती जेफ बेजोससह बऱ्याच व्यावसायिकांनी सोलर पॅनल तयार करणाऱ्या कंपनीत जवळपास सात हजार कोटी रुपये गुंतवले आहेत. हे पॅनल बसवण्यासाठी साधारण एक लाख चार हजार रुपये खर्च येतो. यातून तुम्हाला दिवसभरात पिण्याचं पाच लीटर शुद्ध पाणी मिळू शकतं. तर असं हे पॅनल भविष्यात खूप उपयोगी पडू शकतं. जगातल्या बऱ्याच लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळत नाही. अशा परिस्थितीत सौर ऊर्जेवर चालणारं पॅनल वीज नसलेल्या ठिकाणीही शुद्ध पाणी देईल.

## स्टाईल स्टेटमेंट — लेअरिंग करा, ग्लॅमरस दिसा

जीन्स असो वा लेहंगा, प्रत्येक पेहराव इंडो-वेस्टर्न पद्धतीने कॅरी करण्याचा ट्रेंड सध्या बराच लोकप्रिय ठरतो आहे. यासाठी लेअरिंगचा फंडा वापरला जातो.

* अंकिता लोखंडेने मध्यंतरी फॅशन डिझायनर कनिका कपूरने डिझाइन केलेला चिकनकारी कलेक्शनमधला पिवळ्या रंगाचा केप घातला होता. तिने व्हाईट टॉप आणि ब्लू जीन्सवर लेअरिंग म्हणून हा केप कॅरी केला.
* सोहा अली खानने अनामिका खन्नाने डिझाईन केलेला श्रग लुंगी स्टाईल स्कर्ट आणि लाँग स्लीव्ह जॅकेटवर कॅरी केला. यामुळे ती अजूनच स्टायलिश दिसली. तुम्ही स्कर्ट आणि जॅकेट अशा लूकवर ट्रेंडी श्रग घालू शकता.
* करिश्मा तन्नाने साईड प्लेट लुंगी स्कर्टवर क्रॉप टॉप आणि पायघोळ श्रग घातला. या एका श्रगमुळे तिच्या लूकला चार चाँद लागले. असा श्रग तुम्ही कशावरही घालू शकता.

## पंचांग

**शनिवार, ३१ जानेवारी २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, माघ शु. १३/१४, चंद्रराशी : मिथुन, नक्षत्र : पुनर्वसु, योग : विष्कंभ, सूर्योदय ७.१५, सूर्यास्त ६.२९

## फॉरवर्डस

**अपनें राज़ अपनें तक़ हीं ऱखा करों...**

**यहाँ दोस्तों क़े भीं दोस्त होतें हैं...!**

## फॅशन पॅशन

* दर्जेदार स्लीम फिट ट्रॅक पँट विकत घ्या. पँट खूप लांब किंवा ढगळ नसावी. अत्यंत आरामदायी आणि सहज हालचाल करता येईल अशी पँट निवडा.
* शूज ही जीमसाठीची अत्यंत महत्त्वाची ॲक्सेसरी. फॅशन म्हणून नाही तर फिटनेसच्या दृष्टीनेही योग्य शूज विकत घ्या. स्नीकर्स, जॉर्डन्स आणि फ्लिट शूजना जीममध्ये थारा नाही हे लक्षात ठेवा.
* उन्हाळ्यात शॉर्टस घातल्या जातात. ही पँट किमान गुडघ्यापर्यंत असायला हवी. हवेशीर आणि ट्रेंडी शॉर्टस घ्या. **(क्रमश:)**

## लाईफस्टाईल — जीवनशैली सुधारा

सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीत स्पर्धेत टिकून रहायचं तर फिटनेस जपण्यास प्राधान्य द्यायला हवं. या हेतूने आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब करण्याशिवाय पर्याय नाही. फिटनेस हा एक प्रवास आहे जो सातत्यपूर्ण पद्धतीने सुरू व्हायला हवा. हा प्रवास सुकर होण्यासाठी...



* आयुष्याला अचानक शिस्त लागत नाही. त्यामुळे एक एक पाऊल पुढे टाका. जंक फूड, अनारोग्यदायी पदार्थ पूर्णपणे बंद करण्यापेक्षा त्यांचं प्रमाण कमी करा. सुरूवातीला जीवनशैलीत छोटे छोटे बदल करा. त्यांची सवय करून घ्या. मगच पुढे जा. * व्यायाम आणि आहार यावर लक्ष केंद्रित करा. आपण किती खाल्लं, कोणता व्यायाम केला याची नोंद करत राहिल्याने तुम्ही जबाबदार व्हाल. वजन कमी करण्यासाठी नेमकं काय करायला हवं याचा अंदाज येईल. * प्रेरणादायी व्हिडिओ बघून किंवा गाणी ऐकून काही होणार नाही. तुमच्या मनात फिटनेस राखण्याची इच्छा जागृत व्हायला हवी. तरच ध्येय गाठू शकाल. * कुठेतरी काहीतरी वाचलं म्हणून ते लगेच अंमलात आणू नका. जमतील तेवढ्याच गोष्टी करा. वेगवेगळी डाएट फॅड्स आहेत. त्यांच्या मागे लागू नका. सरळ, साधे, सोपे फंडे अंगिकारा.

## खेचाखेची — एक पण

मराठी भाषेची कमाल आणि धमाल. 'पण' हा एकच शब्द वाक्यातली जागा बदलली, तर अर्थ किती बदलतो बघा...

**पण** तो तिच्यावर प्रेम करतो..
तो **पण** तिच्यावर प्रेम करतो
तो तिच्यावर **पण** प्रेम करतो
तो तिच्यावर प्रेम **पण** करतो
तो तिच्यावर प्रेम करतो, **पण**...

## वेगळं काही

बेल्जियमच्या जेफ पीटर्स या इंजिनिअरने सर्वात जड सायकल तयार करण्याचा जागतिक विक्रम केला असून त्याचं नाव गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डसमध्ये नोंदवण्यात आलं आहे. त्याने तब्बल ८६० किलो वजनाची सायकल बनवली. या सायकलची उंची ७.४ फूट आणि लांबी १६.५ फूट आहे. ती चालवलीसुद्धा. आधीचा विक्रम मोडण्यासाठी जेफला या सायकलवरून किमान १०० मीटर अंतर कापणं गरजेचं होतं. ते त्याने करूनही दाखवलं. सपाट पृष्ठभागावरून त्याची ही सायकल अगदी दिमाखात चालू शकते. या भल्या मोठ्या सायकलला त्याने ट्रॅक्टरची चाकं बसवली. तर वापरात नसलेले धातू रिसायकल करून इतर भाग तयार केले.

## मनतरंग — रागावर नियंत्रण मिळवताना...

राग येणं ही सामान्य बाब असली तरी रागाचा उद्रेक होणं, रागाच्या भरात भावनांवरील नियंत्रण हरपणं हे धोक्याचे संकेत आहेत. अनेकदा अतिभावनिकतेमुळे एंड्रेनॅलिन संप्रेरक मोठ्या प्रमाणात स्त्रवू लागतं. परिणामी राग अनावर होतो. तुम्हीही याचे साक्षीदार असाल तर लवकरात लवकर राग नियंत्रणाचं कौशल्य आत्मसात करा. अँगर मॅनेजमेंटच्या या काही टिप्स.



* आपल्याला राग येतो आणि चुकीच्या प्रकारे व्यक्तही केला जातो. राग शांत झाल्यावर कृतीबद्दल पश्चाताप होऊ लागतो. हे टाळायचं असेल तर राग येण्यापूर्वीची परिस्थिती योग्य प्रकारे हाताळायला शिका. रागाचा पारा चढताना शरीरातही बदल होत असतात. हे बदल ध्यानात घ्या. * रागाचा पारा चढण्यास विशिष्ट परिस्थिती किंवा विशिष्ट लोक कारणीभूत असतात. अशा वेळी काही वेळेसाठी त्या ठिकाणापासून लांब रहा. * व्यायामाची मदत- क्रोध ही अतिरिक्त ऊर्जेचा निचरा होण्यासाठी केलेली व्यवस्था आहे. हीच उर्जा व्यायाम किंवा खेळासारख्या माध्यमातून बाहेर पडत असेल तर राग अनावर होत नाही. त्यामुळे एखाद्या खेळाची मदत घेऊ शकता. मेडिटेशनमुळेही भावना नियंत्रणात राहतील.

## सुडोकू ६०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | | २ | १ | | | | |
| | | | | | | | | ३ |
| | | ८ | ६ | ३ | | १ | ५ | ९ |
| ९ | | ३ | १ | | २ | ७ | ४ | ५ |
| | ६ | | | ९ | | | ३ | |
| ७ | १ | २ | ४ | | ३ | ९ | | ८ |
| ३ | २ | ६ | | ८ | ५ | ४ | | |
| ८ | | | | | | | | |
| | | | | ४ | ६ | | | २ |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ५९ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ५ | १ | ९ | ६ | ४ | २ | ७ | ३ |
| ९ | ४ | ३ | ८ | २ | ७ | ६ | ५ | १ |
| ७ | ६ | २ | १ | ५ | ३ | ४ | ८ | ९ |
| १ | ९ | ४ | ५ | ३ | ८ | ७ | ६ | २ |
| ६ | ८ | ५ | ७ | ९ | २ | ३ | १ | ४ |
| २ | ३ | ७ | ६ | ४ | १ | ५ | ९ | ८ |
| ४ | ७ | ८ | २ | १ | ५ | ९ | ३ | ६ |
| ५ | २ | ६ | ३ | ८ | ९ | १ | ४ | ७ |
| ३ | १ | ९ | ४ | ७ | ६ | ८ | २ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक ६०

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ■ | ४ | ■ | ५ | | ६ | ७ | | ■ |
| ■ | ८ | | ■ | ९ | | | | | ■ | १० | | ■ | ११ |
| १२ | | ■ | १३ | | ■ | | ■ | १४ | | | ■ | १५ | |
| १६ | | | | ■ | १७ | | ■ | | ■ | १ | | | ■ |
| १९ | | ■ | २० | | | ■ | २१ | | | | ■ | २२ | २३ |
| | ■ | २४ | | ■ | २५ | | ■ | | ■ | ■ | २६ | | |
| ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | | ३० | ■ | ३१ | |
| ३२ | | | | | ■ | ३३ | | | ■ | ३४ | ३५ | | ■ |
| ■ | ३६ | | ■ | ३७ | ३८ | | ■ | ३९ | | ■ | | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ४४ | | ■ | ४५ | | ४६ | |
| ४७ | | ४८ | | ४९ | | ■ | ५० | | | | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ५१ | ■ | | ■ | ५२ | | | ५३ |
| ५४ | ५५ | | ■ | ५६ | ५७ | | ५८ | ■ | ५९ | | ■ | ६० | |
| ■ | | ■ | ६१ | | | ■ | ६२ | | | ■ | ६३ | | ■ |

**आडवे शब्द :-**
१) श्रीविष्णूचे शंखवाद्य
५) जमीनजुमला
८) दारूचा एक प्रकार
९) पक्ष, दोन आठवडे
१०) विटी कोलण्याचा बारीक खड्डा
१२) कपाटातील कप्पा
१३) अग्र
१४)हत्तीचे ओरडणे
१५) एक मिश्रधातू
१६) वाघ-सिंहाची गर्जना
१७) अभिप्राय
१८) पवित्र
१९)दालचिनी
२०) तरुण मुलगा
२१) चलनवलन
२२) हत्ती
२४) बांधलेला
२५) लाकूड गुळगुळीत करण्याचे एक हत्यार
२६) दावानल
२७) बोजा, वजन
२८) भांडण
२९) पूर्वज
३१) अंत:करण
३२) नवाकोरा
३३) उंदरांना अडकविण्याचा पिंजरा
३४) वस्त्र, कापड
३६)समईतील कापसाची गुंडाळी
३७) वाळवी, उणीव
३९) पायाचा प्रहार
४१) शरीर
४३) जिनसांची यादी
४५) ज्याच्या नावाने वर्षगणना चालू होते असा
४७) वेडावाकडा
५०) गाजावाजा
५२) एक प्रकारचे लोकरीचे कापड
५४) मुसलमान
५६) धुळधाण, नासाडी
५९) दाट, ढग
६०) कशा प्रकारचा
६१) लेखणी
६२) जाड, मोठी सुई
६३) झाडाभोवतीचा कट्टा.

**उभे शब्द :-**
२) पायधूळ
३) बस्तान
४) लाकूड कापण्याचे हत्यार
५) भलताच संबंध जोडणे (वा.प्र.)
६) पोलिस
७) एक द्विदल धान्य
९) चिखल
११) योग्य, उचित
१२) कष्टप्रद
१३) दोन टोळ्यांमधील चकमक
१५) आपले राष्ट्रगीत
१७) पुष्परस
२३) भारतीय सैनिक
२४) भरभराट
२७) हमाल
२८) खिडकी
२९) वडील
३०) परमेश्वर
३३) सरकविणारे, पाचक
३५)बेचव
३८) रंग बदलणारा प्राणी
४०) बातमी
४१) मंदिर
४२) पुष्कळ
४४) कापड विणून तयार करण्याचे साधन
४५) योगासनातील एक
४६) कमळाचे तळे
४८) मोठी टोपली
४९) हाताचा तळवा
५१) अवधान, चित्त
५३) त्या प्रकाराचा
५५) अरण्य
५७) सारखा
५८) सदोदित, नेहमी
५९) मोठा, जाड हातोडा.

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दु | गें | दु | र्घ | ट | भा | री | तु | ज | वि | ण | सं | सा | री |
| र्ग | ■ | श्म | ■ | क | र | ■ | मा | न | व | ■ | क | प | ■ |
| म | हा | न | ता | ■ | त | हा | न | ■ | र | पे | ट | ■ | क |
| ■ | ल | ■ | र | क्षा | ■ | हा: | ■ | म | ण | का | ■ | म | स |
| अ | चा | न | क | ■ | मु | का | द | म | ■ | ट | क | म | क |
| सा | ल | स | ■ | बे | का | र | ■ | ता | प | ■ | ल | ■ | स |
| धा | ■ | ल | ता | ■ | मा | ■ | क | ■ | च | क | म | क | ■ |
| र | म्य | ■ | प | द | र | प | स | र | णे | ■ | दा | ल | न |
| ण | ■ | खे | ट | र | ■ | द | र | ड | ■ | दा | न | ■ | व |
| ■ | घ | ळ | ■ | वा | प | र | ■ | का | न | न | ■ | सो | ना |
| सो | म | ■ | रा | जा | ■ | मो | का | ■ | र | व | ळ | ना | थ |
| ■ | घ | र्म | ■ | ■ | स | ड | क | ■ | व | ■ | ■ | र | ■ |
| द | मा | ■ | क | ळ | प | ■ | र | ख | र | खा | ट | ■ | घ |
| र | ट | र | ट | ■ | क | ले | व | र | ■ | स | र | का | र |

# कलासक्त



**भारताची महागायिका गानकोकिळा लता मंगेशकर व भारतीयांतून फाळणीच्या वेळी पाकिस्तानात गेलेली मल्लिका ए तरन्नुम नूरजहान यांची भारत–पाक सीमेवरील नो मॅन लँडवर घडलेल्या ऐतिहासिक भेटीची सुरस कथा दोन्ही देशांत मशहूर आहे. या दोन्ही गायिकांमधिल परस्परांवरील प्रेम, जिव्हाळा व भावनिक ओढ त्यावेळी जगजाहीर होती. भारत पाकचे विभाजन झाल्यावर नूरजहान आपले पती शौकत हुसेन यांच्यासह पाकिस्तानात गेली. या दोन्ही महागायिका दोन देशांत वाटल्या गेल्या, पण त्यांचे प्रेम कमी झाले नाही. दररोज रात्री त्या ट्रंक कॉल करून एकमेकांशी हितगुज करीत असत. आपण गायलेली गाणी परस्परांना ऐकवीत असत. त्यावेळी भारत पाकिस्तान हॉट लाईन चालू नसल्याने ट्रन्क कॉल करून वाट पाहत बसावे लागत असे. या दोघींच्या बोलण्याची वेळ माहीत असल्यामुळे टेलिफोन एक्सचेंज मधील कर्मचारी त्यांच्या फोनची प्रतिक्षा करीत असत व त्यांचा फोन आल्यावर ताबडतोब तो जोडून देत असत व त्यांचे संभाषण ही ऐकत असत. त्यांच्या बोलण्याचा व गाण्यांचा मनसोक्त आस्वाद घेत असत.**

## दोन महागायिकांची नो मॅन लँडवर भेट!

रंगबहार

**शरद कोरडे**

नूरजहान या वयाने व अनुभवाने लता मंगेशकर यांच्यापेक्षा मोठ्या होत्या. मूकपटांपासून त्यांनी आपल्या अभिनयाला सुरुवात केली होती. दिलसुख पाचोली यांच्या १९३९ सालच्या 'गुल- ए- बकावली' या चित्रपटातून अभिनय करून त्यांनी आपल्या बोलपटांतील कारकिर्दीला सुरुवात केली होती. या पंजाबी चित्रपटात त्यांनी एक गाणेही गायले होते. 'साला जवानिया ना माने और पिंजरे दे विच' हे त्यांनी चित्रपटासाठी गायलेले पहिले गाणे. त्यानंतर १९४२ सालच्या पांचोली निर्मित व शौकत हुसेन दिग्दर्शित 'खानदान' या चित्रपटात त्यांनी नायिकेचे काम केले. ज्यामध्ये प्राण सिकंद त्यांचा नायक होता त्यात नूर जहाँ यांनी गायलेले 'कौनसे बदली मे मेरा चांद है आजा' हे गाणे खूप लोकप्रिय झाले व त्याला खूप प्रसिद्धी मिळाली. नूरजहान यांना शास्त्रीय संगीताची व गाण्यातील विविध शैलींची जाण होती. त्यांनी आपल्या गाण्यात नवनवीन प्रयोग केले.त्यांच्या खास वैशिष्ट्यांमुळे त्यांना 'ठुमरीची महाराणी' म्हणत. आपल्या गाण्यात त्या सखोल भावना व आपला आत्मा ओतीत असत. १९४५ सालच्या 'झीनत' या चित्रपटात त्यांनी 'आहे ना भरी शिकवे न किये' ही कव्वाली जोहराबाई अंबालेवाली व अमीरबाई कर्नाटकी या सहगायिका होत्या. त्या कव्वाली गाणाऱ्या पहिल्या अभिनेत्री होत्या. मेहबूब खान यांच्या गाजलेल्या 'अनमोल घडी' या चित्रपटाच्या त्या नायिका होत्या व सुरेंद्र त्यांचा नायक होता. या चित्रपटांतील नौशाद यांनी संगीत दिलेली सर्व गाणी खूप गाजली होती. त्यांतील नूर जहान यांनी गायलेली 'आजा मेरी बरबाद मोहब्बत के सहारे', जवा है मोहब्बत', 'आवाज दे कहा है', ही गाणी खूप गाजली. मास्टर विनायक यांच्या १९४५ सालांतील 'बडी मा' या चित्रपटाची नुरजहान नायिका होती. या चित्रपटात ईश्वरलाल, याकूब व सरस्वती देवी हे कलावंत होते. के. दत्ता यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली नूरजहान यांनी तीन सोलो गाणी गायली होती. या चित्रपटात लता मंगेशकर यांनी ईश्वरलाल व मीनाक्षी यांच्यासह दोन गाणी गायली होती. याचवेळी नूरजहान यांची लतादीदी सोबत ओळख झाली व दोघी मैत्रिणी झाल्या. लतादीदींच्या आवाजावर व त्यांच्या संगीतसाधनेवर नूरजहान फिदा झाल्या व प्रेमाने त्या म्हणाल्या, 'तू पुढे खूप मोठी गायिका होशील' असा विश्वास त्यांनी लता दीदींना दिला.


१९४७ साली भारत–पाक फाळणी झाल्यावर नूर जहान आपल्या पतीसह पाकिस्तानात गेल्या. तेथेही त्यांनी चित्रपटांतून भूमिका केल्या व खूप गाणीही गायल्या, तसेच गाण्याचे जलसेही केले. तेथेही त्यांना खूप चाहते मिळाले व खूप प्रसिद्ध मिळाली. लतादीदींशी त्यांचा सतत संपर्क होता. लता मंगेशकर व संगीतकार सी. रामचंद्र या दोघांनी 'झांजर' नावाचा एक चित्रपट निर्मितीसाठी घेतला होता. या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी दोघेही अमृतसरला आले होते. लतादीदींनी रात्री नूरजहान यांच्याशी संपर्क साधला. दोघींनी दुसऱ्या दिवशी भेटण्याचे ठरविले. संकेतस्थळ ठरले भारत–पाक सीमेजवळील 'नो मॅन लण्ड'. भारत–पाक सीमेलगत अटारी बॉर्डरला लागून ही ५५ यार्डची ही नो मॅन लँड आहे. जिच्यावर कुठल्याही देशाची सत्ता नाही. जिच्या बाजूला भारत व पाक सैन्याचा जागता पहारा असतो. अशा ठिकाणी लाहोरहून नुरजहान व अमृतसरहून लता मंगेशकर सी. रामचंद्र यांच्यासह नो मॅन लँड मध्ये एका वृक्षाखाली भेटल्या. दोन्ही बाजूंकडील सैन्यानी त्यांना अडविले नाही. दोन्ही कडील सैनिक हे अद्भुत दृश्य पाहत होते. दोघींची गळा भेट झाली, दोघीही एकमेकींना मिठी मारून रडल्या. सोबत आणलेले खाद्यपदार्थ एकमेकींना भरविले, गप्पागोष्टी केल्या व नंतर साश्रू नयनांनी एकमेकींचा निरोप घेतला. नूरजहान लाहोरला तर लतादीदी अमृतसरला निघून गेल्या. हा सोहळा पाहण्याचे भाग्य भारत–पाक सैनिकांना व सी. रामचंद्र यांना लाभले. सी. रामचंद्र यांनी आपल्या 'माझ्या जीवनाची सरगम' या जीवन चरित्रात या भेटीचे सविस्तर वर्णन केले आहे. त्यात त्यांनी 'माझ्या थोर भाग्यामुळे या भेटीचा साक्षीदार होण्याचा अलभ्य लाभ मला झाला' असे म्हटले आहे. सी. रामचंद्र यांचे चरित्र सध्या कोठेही उपलब्ध नाही. त्याची कारणे वेगळी आहेत, त्याचा उहापोह येथे नको.

नूरजहान यांनी पाकिस्तानात गेल्यानंतर सुमारे १४ चित्रपटांतून कामे केली. त्यात 'दुपट्टा' हा १९५२ सालचा चित्रपट खूप गाजला. त्यानंतर बोलणार 'फतेहखान, लटके जिगर, इंतेजार, अनारकली, परदेशीया, मिर्झा गालिब, यांचा समावेश आहे. १९९६ सालच्या 'सखी बादशाह' हा त्यांचा शेवटचा चित्रपट व त्यातील 'की दम दम दाभरोसा' हे त्यांचे शेवटचे गाणे.

सन १९८२ मध्ये भारत व पाकिस्तान यांचे संबंध दुरावलेले व ताणलेले होते हे संबंध सुरळीत व्हावे म्हणून तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भारतीय क्रिकेट टीम पाकिस्तानला पाठविली होती त्यानंतर बडोद्याचे संस्थानिक फत्तेसिंग गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हे टीम गेली होती तेव्हा सुनील गावस्कर हे भारतीय टीमचे कप्तान होते पत्ते सिंग क्रिकेटचे जाणकार होते व पाकिस्तानातील नेत्यांची त्यांचे चांगले संबंध होते म्हणून त्यांच्याकडे भारतीय टीमचे नेतृत्व दिले होते यानिमित्ताने पाकिस्तानातील काही ठिकाणी दर्शनीय सामनेही खेळविले जाणार होते या निमित्ताने लाहोर येथे एक भव्य पार्टीचे आयोजन पाकिस्तान तर्फे करण्यात आले होते. या पार्टीमध्ये भारताचे प्रतिनिधी म्हणून फत्तेसिंग गायकवाड सर्वांचे स्वागत करीत होते व सुनील गावस्कर त्यांच्यासह उभे होते याचवेळी एक महिला दिमाखात प्रवेश करते ती कोणीतरी प्रमुख अतिथी असावी असे सर्वांना वाटत होते पत्तेसिंग यांनी पुढे होऊन उत्साहाने त्यांचे स्वागत केले वळून त्यांनी त्यांचा परिचय करून गावस्कर यांच्याशी करून दिला व हे भारतीय क्रिकेटचे कप्तान सुनील गावस्कर आपण यांना ओळखत असालच असे म्हणतात ती महिला म्हणाली नाही मी यांना ओळखत नाही मी फक्त इमरान खान व झहीर आबास यांना ओळखते सुनील गावस्कर यांनी या बोलण्यातील उपेक्षेचा भाव ओळखला त्यानंतर पत्ते फत्तेसिंग यांनी गावस्करांना त्या महिलेची ओळख करून दिली या थोर गायिका मल्लिका आहे तर तरन्नुम नूर जहा आहेत आपण यांना जाणत असालच त्यावर स्वाभिमानी व हजरजबाबी गावस्कर म्हणाले नाही मी यांना ओळखत नाही मी केवळ लता मंगेशकर यांना ओळखतो त्यावर त्यावर नुरजहा यांचा चेहरा पाहण्यासारखा झाला त्यानंतर त्याच वर्षी नुरजहा भारत भेटीवर आल्या होत्या त्यावेळी त्यांनी प्रथम पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भेट घेतली त्यानंतर त्या मुंबई येथे आल्या तेथे त्यांच्या सन्मानासाठी एक कार्यक्रम आयोजित केला होता त्यात दिलीप कुमार व लता मंगेशकर सामील झाल्या होत्या सामील झाले होते नूर जहान यांनी जुन्या आठवणी जागवून काही गाणीही म्हटली होती.

प नूर जहान यांचे पाकिस्तानातील मोठ्यापदांवरीलनेत्यांशीवअधिकाऱ्यांशी स्नेहाचे संबंध होते. अनेक क्रिकेटरनशी ही त्यांची सलगी होती. पाकिस्तानात गेल्यावर काही काळाने त्यांनी शौकत हुसेन यांच्यापासून तलाक घेतला व पुढे दोन लग्नेही केली. पाकिस्तानी क्रिकेटर नजर मोहम्मद याच्याबरोबर असलेले त्यांचे प्रेम संबंध त्यांनी जाहीरपणे प्रकट केले होते. तरीही नूर जहान यांनी चार दशके रसिकांच्या मनावर गारुड केले. २३ डिसेंबर २००० रोजी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना कराचीच्या आगाखान युनिव्हर्सिटी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे त्यांचा मृत्यू झाला. पाकिस्तानचे प्रेसिडेंट परवेज मुशर्रफ त्यांच्या उत्तर क्रियेस हजर होते. नूर जहान एखाद्या महाराणी प्रमाणे आयुष्य जगली व तिचा अंत्यविधी शासकीय सन्मानाने झाला. ●●

**खलनायक म्हटलं की अक्राळविक्राळ, असभ्य चेहरा समोर येतो. ग्रामीण बाज असलेली व्यक्तीरेखा समोर येते. आवाजातला कर्कशपणा, क्रूर चेहरा सगळं सगळं खलनायक या नावाला शोभणारे असते. भारतीय चित्रपट सृष्टीत अनेकांनी खलनायक साकार केले परंतु अजित त्यांच्या वेगळ्या शैलीमुळे रसिकांच्या मनात कायम राहिले. तसे अजित यांनी हिरोच्या भूमिकेत देखील अभिनय केला सुरुवातीला पण खलनायक म्हणूनच ते नावारुपाला आले.**



## एक रुबाबदार खलनायक "अजित"

**श्रीराम शेटये**

चित्रपट सृष्टीत एक सर्वात वेगळा रूबाबदार खलनायक भारतीय चित्रपट सृष्टीवर विराजमान झाला. ते म्हणजे हमिद अली उर्फ अजित. हिंदी चित्रपटसृष्टीच्या क्रूर खलनायकांच्या रांगेत शांत, अनौपचारिक, सौम्य, सुशिक्षित, सूट आणि पांढरे बूट घालून गोड पण दमदार आवाजात प्रेक्षकांच्या मनात धडकी भरवणाऱ्या मात्र तेवढाच निर्दयी असणाऱ्या खलनायकाची एन्ट्री झाली. हिंदी चित्रपटसृष्टीत केवळ आपल्या संवादफेकीने ओळखले जाणारे मोजके कलाकार आहेत. त्यात खलनायक अजित म्हणजे संवादफेकीचे बादशहाच म्हणावे लागेल.

आपल्या विशिष्ट संवादफेकीमुळे अजित ओळखले जातात मात्र चित्रपटसृष्टीत येण्यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला आहे. २७ जानेवारी १९२२ मध्ये गोवलकोंडा येथे पश्तून कुटुंबात जन्मलेले हामिद अली खान उर्फ अजित यांना लहानपणापासून अभिनयाची आवड होती. त्यांचे कुटुंब अफगाणिस्तानातील कंदाहारहून उत्तर प्रदेशातील शाहजहानपूर येथे स्थलांतरित झाले होते. निजाम मीर उस्मानच्या सैन्यात सैनिक असलेले त्याचे वडील त्याच्या चित्रपटांमध्ये येण्याच्या विरोधात होते. अजित यांचे प्रारंभिक शिक्षण आंध्रप्रदेशातील वारांगल जिल्ह्यात पूर्ण झाले. चाळीसच्या दशकात नायक बनण्यासाठी त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीकडे आपली पावले वळवली. घरचा विरोध असल्याने मदत मिळण्याची शक्यताच नव्हती. त्यामुळे महाविद्यालयीन अभ्यासाची पुस्तके विकून मुंबईच्या रेल्वेभाड्याचे पैसे जमवले आणि स्वप्ननगरी मुंबईत पाऊल ठेवले. स्वप्नातील शहरात त्याचा प्रदीर्घ संघर्ष सुरू झाला. खिशात फारसे पैसे नसल्याने फुटपाथवर तर कधी गटार बांधण्यासाठी असलेल्या सिमेंटच्या पाईपमध्ये झोपावे लागले.

१९४६ मध्ये त्यांना पहिला चित्रपट मिळाला शाहे मिस्त्र. यात त्यांची भूमिका छोटी होती. पण त्यांच्या भरदार आवाजामुळे आणि सुंदर दिसण्यामुळे, विशेषतः महेश भट्ट यांचे वडील नानाभाई भट्ट यांनी त्यांच्यातील स्पार्क ओळखला. त्यांना अधिक महत्त्वाच्या भूमिका मिळू लागल्या. १९४६ ते १९५६ या दरम्यान अजित हिंदी चित्रपटसृष्टीत काम मिळविण्यासाठी संघर्ष करीत होते. शाहे मिस्त्र नंतर त्यांना ज्या ही भूमिका मिळत गेल्या त्या ते स्वीकारत गेले. त्यात पतंगा, जिद, सरकार, सईयां, तरंग, मोतीमहल, सम्राट और तीरंदाज असे अनेक चित्रपट केले. मात्र ते बॉक्स ऑफिसवर खास चालले नाही. हमीद खान या त्यांच्या खऱ्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या त्यांच्या सुरुवातीच्या चित्रपटांना फारसे यश मिळाले नाही.

१९५० मध्ये दिग्दर्शक अमरनाथ यांनी त्यांना त्यांचे नाव हामिद अली खान ठेवण्यापेक्षा एक छोटे नाव ठेवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर त्यांनी आपले नाव हामित अली खान बदलून अजित ठेवले. अमरनाथ यांनीच दिग्दर्शन केलेल्या बेकसूर या चित्रपटात अजित या नावाने नायक म्हणून पहिल्यांदा काम केले. 'बेकसूर' मध्ये त्यांची नायिका होती मधुबाला. त्यानंतर नास्तिक (१९५३) हा अजित यांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वाचा चित्रपट होता, यात त्यांनी नलिनी जयवंत यांच्यासोबत मुख्य भूमिका साकारली होती. 'देख तेरे संसार की हालत क्या हो गई भगवान' हे गाणे त्यांच्यावर चित्रित करण्यात आले आहे. 'हातिमताई' (१९४७), 'जीवन साथी' (१९४९), 'जनमपत्री' (१९४९), 'ढोलकी' (१९५१), 'बडा भाई' (१९५४), 'मिलन' (१९५४), 'बारादरी' (१९५५), 'नकाब' (१९५५), 'हलाकू' (१९४९) आणि 'इन्साफ' (१९५६) हे त्यांनी नायक म्हणून केलेले चित्रपट. मधुबाला, मीना कुमारी, गीता बाली आणि नलिनी जयवंत (१५ चित्रपट) यासारख्या आघाडीच्या नायिकांसोबत काम करूनही त्यांना अभिनेता म्हणून फारशी प्रसिध्दी मिळाली नाही.

१९५७ मध्ये बी.आर. चोपडा यांचा नया दौर या चित्रपटात ग्रामीण युवकाच्या भूमिकेत अजित दिसले. ही भूमिका ग्रे शेड्स असलेली होती. चित्रपट नायक दिलीपकुमार यांच्यावर केंद्रीत होता पण दिलीपकुमार यांच्या उपस्थितीत अजित आपल्या काही ग्रे शेड असलेल्या भूमिकेमुळे प्रेक्षकांच्या लक्षात राहिले. यानंतर मात्र त्यांनी निश्चय केला की, नायक होण्यापेक्षा खलनायकाची कामे करुन आपला अभिनय प्रेक्षकांपुढे ठेवायचा. त्यानंतर ते खलनायकाची भूमिका मिळविण्यासाठी प्रयत्न करीत होते. १९६० मध्ये मुगले आजम या गाजलेल्या चित्रपटात त्यांना भूमिका मिळाली. पुन्हा समोर होते अभिनय सम्राट दिलीपकुमार मात्र या ही वेळेस अजित आपल्या छोट्या पण महत्वपूर्ण भूमिकेतून प्रेक्षकांच्या लक्षात राहिले. त्यानंतर त्यांना जिंदगी और ख्वाब, हिमालय की गोद में, सूरज, प्रिन्स, आदमी और इंसान या सारखे गाजलेले चित्रपट मिळाले. या यशाच्या जोरावर एक खलनायक म्हणून अजित आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचे मनोरंजन करु लागले.

टी. प्रकाश राव दिग्दर्शित राजेंद्र कुमार आणि वैजयंतीमाला अभिनीत सूरज या चित्रपटात मुख्य लनायक म्हणून त्यांना संधी मिळाली. या भूमिकेने तेव्हा त्यांना खलनायक म्हणून ओळख मिळाली. १९७३ हे वर्ष अजित यांच्या सिने करियरमध्ये महत्वाचे वर्ष ठरले. या वर्षी त्यांचे खलनायक म्हणून जंजीर यात त्यांनी थरारक डॉन तेजाची भूमिका साकारली, यादों की बारात मधील ज्याने एका पायात ८ आणि दुसऱ्या पायात ९ आकाराचे बूट घालणारा खलनायक, समझौता, कहानी किस्मत की आणि जुगनू हे चित्रपट आले आणि त्यांनी यशस्वीतेचे नवीन किर्तीमान स्थापन केले.

अजित यांना त्यांच्या भूमिकांमधील सर्वात जास्त आवडणारी भूमिका म्हणजे निर्माता दिग्दर्शक सुभाष घई यांच्या १९७६ मध्ये आलेल्या कालीचरण या चित्रपटातील लॉयनची भूमिका होती. यानंतर त्यांच्या नावापुढे लॉयन ही उपाधिच जोडली गेली. या चित्रपटांतील त्यांचा संवाद 'सारा शहर मुझे लॉयन के नाम से जानता है' आजही लोकप्रिय आहे. या व्यतिरिक्त जंजीरमधील 'लिली डोंट बी सिली' किंवा यादो की बारात मधील 'मोना डार्लिंग' हे संवादही प्रेक्षकांमध्ये आजही लोकप्रिय आहेत.

कालीचरणच्या यशानंतर अजित यांच्या करियरमध्ये जबरदस्त बदल झाला. ते खलनायकांच्या दुनियेचे बेताज बादशहा झाले त्यानंतर त्यांनी मागे वळून कधी पाहिलेच नाही. सत्तरच्या दशकात त्यांनी ५७ हून अधिक चित्रपटांमध्ये खलनायक साकारला होता. त्यांची संवाद सादरीकरणाची शैली आजही लोकप्रिय आहे. यामुळे जावेद जाफरी यांची 'मॅगी' साठीची टॅगलाइन, 'बास, पास द सॉस' आणि 'पारले-जी' ची जाहिरात गाजली होती. नायकाची भूमिका उठावदार होण्यामागे खलनायकाचे मोठे योगदान असते. अजित यांच्या खलनायकासमोर धर्मेंद्र नेहमीच नायक म्हणून सुपरहिट ठरले आहेत. धर्मेंद्र यांच्यासोबत यादो की बारात, जुगनू, प्रतिज्ञा, चरस, आजाद, रामबलराम, रजिया सुलतान, राजतिलक यासारखे अनेक हिट चित्रपट दिले आहेत. क्रूर खलनायकांच्या या जगात अजित यांचा स्टाइलिश खलनायक आपले वेगळेपण आणि आब राखून होता. ९० च्या दशकात अजित यांची तब्येत वारंवार खराब होत असल्यामुळे त्यांनी चित्रपटातून कामे करणे कमी केले. तरीही १९९२ मध्ये जिगर या चित्रपटात त्यांनी चरित्र भूमिका साकारली, १९९३ मध्ये शक्तिमान, आदमी, १९९४ मध्ये आतिश, आ गले लग जा, बेताज बादशहा हे चित्रपट त्यांनी केले. वैयक्तिक आयुष्यात अजित यांची दोन लग्ने झाली होती. या विवाहातून त्यांना पाच मुलं झाली. शाहीद अली खान, झाहिद अली खान, आबिद अली खान, शेजाद खान आणि अरबाज खान. आपल्या संपूर्ण चित्रपटसृष्टीतील वाटचालीत २०० चित्रपटातून नायक खलनायक साकारत आपल्या संवादशैलीची स्टाइल गाजवणाऱ्या अजित यांनी २२ ऑक्टोबर १९९८ रोजी इहलोकाचा निरोप घेतला.

अजित यांनी पाच दशके चित्रपट सृष्टीवर राज्य केले. त्यांची खलनायकी चित्रपट सृष्टीत कधीच विसरली जाऊ शकत नाही. ●●

## पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात "तो, ती आणि फुजी"

**अत्यंत महत्त्वाच्या आणि मानाच्या २४व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (PIFF), "तो, ती आणि फुजी"ची अधिकृत निवड झाली असून, या महोत्सवातील प्रतिष्ठित मराठी फीचर फिल्म स्पर्धा विभागात या चित्रपटाचा जागतिक प्रीमियर होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या "संत तुकाराम" सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट पुरस्कारासाठी हा चित्रपट स्पर्धेत असून, हा त्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरतो.**




**राम कोंडीलकर**

ह्या चित्रपटाचे चित्रीकरण जपान आणि भारतात झाले असून हा एक अभूतपूर्व मराठी रोमँटिक चित्रपट आहे. जपान केवळ पार्श्वभूमी किंवा वेगळे स्थळ म्हणून नाही, तर पात्रांच्या आतल्या भावनिक अंतराचे प्रतिबिंब असलेल्या भावनिक अवकाशासारखा उलगडतो. हा चित्रपट अंतर, काळ आणि बदलत्या भावनिक वास्तवामुळे नातेसंबंध कसे बदलतात याचा शोध घेतो. सुरुवातीला अतिशय उत्कट असलेले एक नाते काळानुसार, प्राधान्यक्रमांमुळे, परस्परविरोधी स्वभावांमुळे व अनाठायी अपेक्षांमुळे कसे विषारी बनते हे या कथानकातून उलगडते. विभक्त झाल्यानंतर सात वर्षांनी ते पुन्हा एकदा जपानमध्ये भेटतात तेव्हा जुन्या जखमा, अर्धवट राहिलेल्या गोष्टी, भावना, इच्छा पुन्हा एकदा डोकं वर काढतात आणि काळाने बदललेली माणसं त्यांच्यातील विरलेले प्रेम पुन्हा शोधू शकतात का?

इरावती कर्णिक यांनी ह्याच्या आधी "झिम्मा", "आनंदी गोपाळ" यांसारखे महत्त्वाचे चित्रपट लिहिलेले आहेत व मोहित टाकळकर यांनी "मीडियम स्पायसी", "द ब्राईट डे", "चिरेबंदी", "ऑकेजनल रिफ्लेक्शन ऑन द कॉन्टिन्जेन्सीज ऑफ लाईफ" असे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत.

या चित्रपटातून ललित प्रभाकर आणि मृण्मयी गोडबोले पुन्हा एकदा एकत्र पडद्यावर येत आहेत. २०१७ मधील बहुचर्चित "चि व चि सौ का" नंतर ही जोडी पुन्हा दिसणार असून, त्यांच्या सादरीकरणात सहजता आणि भावनिक खोली जाणवते. टोरंटो इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल २०२५ मधील "बयान", बर्लिनाले २०२३ मधील "घात" आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेता "पिकासो" यांसारख्या चित्रपटांसाठी ओळखले जाणारे शिलादित्य बोरा यांनी प्लटून वन फिल्म्स या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट निराळ्या, दिग्दर्शक–केंद्रित सिनेमाला प्रोत्साहन देण्याच्या बांधिलकीला पुढे नेतो. "आपल्या दोघांच्या आठवणी वेगवेगळ्या असतील तर?" ह्या एका वाक्याने मी फार प्रभावित झालो असं चित्रपटाच्या निवडीबद्दल बोलताना निर्माते शिलादित्य बोरा म्हणाले. हाच प्रश्न या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे. दोन व्यक्ती एकाच नात्यात, एकाच क्षणात असतात, पण त्या अनुभवांना वेगवेगळ्या पद्धतीने जतन करतात. काळ जसा पुढे सरकतो, तसं प्रेम बदलतं, कधी कधी तुटतंही. ते खोटं होतं म्हणून नाही, तर आठवणी, प्राधान्यक्रम आणि आपापली विश्व वेगळी होऊ लागतात. मराठी सिनेमाच्या कक्षा कशा रुंदावतील, त्याच्या सीमा आपल्याला कशा ओलांडता येतील ह्याचा विचार या चित्रपटामध्ये नक्की आहे. "घात" च्या तीव्र वास्तववादापासून ते "पिकासो" च्या शांत, अंतर्मुख करणाऱ्या जगापर्यंत अशा निराळ्या धाटणीच्या चित्रपटांची निर्मिती करण्याचा प्रयत्न प्लटून वन फिल्म्स ने नेहमीच केला आहे. "तो, ती आणि फुजी" ही त्याच मालिकेतील नवी कथा, नव्या पद्धतीने सांगायचा प्रयत्न आहे. यासारख्या महत्त्वाच्या महोत्सवात हा चित्रपट सादर करताना आम्हाला खूप आनंद होत आहे." दिग्दर्शक मोहित टाकळकर म्हणाले, "पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील मराठी स्पर्धा विभागात "तो, ती आणि फुजी" ची निवड होणं अत्यंत समाधानकारक आहे. दरवर्षी पुणे शहर अत्यंत गंभीरपणे आणि कुतूहलाने ह्या महोत्सवाची वाट पाहातं. हा एक प्रकारे सांस्कृतिक क्षण आहे. मध्ये भाषेच्या सीमांना ओलांडून वेगवेगळ्या देशांचे चित्रपट प्रदर्शित तर होतातच परंतु ह्या कामांचा एकमेकांमध्ये संवाद घडतो, याचा मला विशेष आनंद आहे. हा चित्रपट ठामपणे शहरी आहे, समकालीन पुण्यात रुजलेला आहे. यातील पात्रं सोप्या उत्तरांनी प्रश्न सोडवताना दिसत नाहीत. आपापली भावनिक अस्वस्थता ठामपणे मांडतात आणि त्यावर अडूनही राहतात. चित्रपटाची कथा सरळसोट नाही. पात्रांच्या फाटलेल्या मनाची गुंतागुंत दाखवणारी आहे. गोष्टी सोप्या उत्तरांनी मिटवण्याऐवजी भावनिक अस्वस्थतेत असण्याची हिंमत ठेवतो. चित्रपटाच्या पहिल्या सार्वजनिक प्रदर्शनासाठी पेक्षा योग्य व्यासपीठ दुसरं असूच शकत नाही. विचारवंत, प्रश्न विचारणाऱ्या आणि अस्वस्थ होण्याची तयारी असलेल्या प्रेक्षकांसमोर हा चित्रपट प्रथमच सादर होतो आहे, याबद्दल मी कृतज्ञ आहे." अनुभवी आणि संवेदनशील, सर्जनशील टीममुळे हा चित्रपट शक्य झाला आहे. ●●



# जग ऑटोमेटेड कार्सचं

**रंजक विज्ञान**

आजकाल आपण ऐकतो की काही गाड्या स्वतःहून चालतात. या गाड्यांमध्ये ड्रायव्हर नसतो. अशा गाड्यांना ऑटोमेटेड कार्स म्हणतात. म्हणजेच गाडी चालवण्यासाठी नेहमी माणसाने स्वत: स्टीअरिंग धरायलाच हवे, असे नाही. ही गोष्ट जादूसारखी वाटते खरी, पण यामागे विज्ञान आणि संगणक यांचा मोठा वाटा आहे.

या प्रकारच्या कार्स आजूबाजूचे जग पाहू आणि समजू शकतात. त्यासाठी गाडीवर कॅमेरे, सेन्सर आणि अंतर मोजणारी उपकरणे बसवलेली असतात. ही उपकरणे रस्ता, सिग्नल, समोरची वाहने, माणसे, प्राणी आणि अडथळे ओळखतात. ही सगळी माहिती गाडीतील संगणकाकडे जाते. तो संगणक फार वेगाने ठरवतो की गाडी थांबवायची, हळू चालवायची की वळण घ्यायचे.

टेस्ला ही अशी गाडी बनवणारी एक प्रसिद्ध कंपनी आहे. टेस्लाची कार रस्त्यावर चालताना सतत निरीक्षण करते. समोर गाडी आली तर अंतर ठेवते. सिग्नल लाल असेल तर थांबते. समोरचा रस्ता मोकळा असेल तर पुढे जाते. चालक गाडीत असतोच. पण अनेक वेळा गाडी स्वतः निर्णय घेते. अर्थात आत बसलेल्या माणसाचे लक्ष रस्त्यावर असणे महत्त्वाचे असते.

फक्त टेस्लाच नाही, तर अजूनही अनेक कंपन्या अशा गाड्या बनवत आहेत. बायडू अपोलो गो ही चीनमधली कंपनी स्वतंत्रपणे रस्त्यावर रोबोटॅक्सी चालवते आहे. या कंपनीच्या गाड्या अनेक शहरांमध्ये ऊबरसारख्या सेवा देत आहेत. याशिवाय काही कंपन्या स्वतः चालणाऱ्या टॅक्सी तयार करत आहेत. काही गाड्या सामान पोहोचवण्यासाठी वापरल्या जात आहेत. मोठ्या कार कंपन्याही हळूहळू अशा प्रकारचे तंत्रज्ञान आपल्या गाड्यांमध्ये बसवत आहेत.

भविष्यात या कार्स अजून हुशार होतील. त्या पाऊस, धुके किंवा अंधारातही नीट चालतील, अपघात टाळतील आणि रहदारीचे धोके कमी करतील. तरीसुद्धा रस्ता खरा असतो आणि चूक झाली तर परिणाम गंभीर असू शकतात. म्हणूनच तंत्रज्ञान कितीही आधुनिक आणि प्रगत असले तरी जबाबदारी आणि सावधपणा माणसाने ठेवायला हवाच.

# बहुपयोगी तांबे

**तांबे हे एक महत्त्वाचे खनिज आहे. ते निसर्गात म्हणजेच जमिनीत आणि दगडांमध्ये सापडते. तांब्याचा रंग लालसर तपकिरी असतो. ते सहज वाकवता येते. म्हणूनच माणसांनी खूप वर्षांपूर्वीपासून तांब्याचा वापर सुरू केला. तांबे टिकाऊ असते. ते गंजत नाही. धातूच्या या गुणांमुळे ते उपयोगी मानले जाते.**




**माहिती खनिजांची**

तांबे जगाच्या अनेक भागात सापडते. भारतात तांबे प्रामुख्याने राजस्थान, झारखंड आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये आढळते. राजस्थानमधील खेतडी परिसर, झारखंडमधील सिंहभूम भाग आणि मध्य प्रदेशातील मलाजखंड हे तांब्याच्या खाणींसाठी प्रसिद्ध भाग आहेत. इतर देशांत चिली, पेरू, चीन आणि अमेरिका येथे मोठ्या प्रमाणावर तांबे मिळते.
जमिनीत सापडणारे तांबे थेट वापरता येत नाही. ते खडकांमध्ये मिसळलेले असते. त्यामुळे आधी खाणींतून खडक बाहेर काढले जातात. हे खडक लहान तुकड्यांत फोडून त्यातील तांबे वेगळे केले जाते. नंतर ते प्रचंड उष्णतेवर तापवून शुद्ध केले जाते. या प्रक्रियेत माती, दगड आणि इतर अशुद्ध पदार्थ बाजूला होतात आणि शुद्ध तांबे मिळते. तांबे अधिक शुद्ध व्हावे यासाठी काही ठिकाणी वीजेचा वापर केला जातो.
शुद्ध तांबे अनेक कामांसाठी वापरले जाते. वीज वाहून नेण्याची क्षमता तांब्यात असते. त्यामुळे घरातील वीजवाहिन्या तांब्यापासून बनवल्या जातात. मोबाईल, टीव्ही, संगणक आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये तांबे वापरले जाते. पाणी वाहण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नळांमध्येही तांब्याचा वापर होतो. तांब्याची भांडीही बनवली जातात. त्यातील काही विशिष्ट गुणधर्मामुळे तांब्याच्या भांड्यात पाणी ठेवलं तर ते काही प्रमाणात शुद्ध राहते असे मानले जाते. नाणी, तार, मोटारगाड्यांचे भाग आणि छप्पर बनवण्यासाठीही तांब्याचा उपयोग केला जातो. तांबे इतर धातूंमध्ये मिसळून पितळ आणि कांस्य यासारखे मिश्रधातू तयार केले जातात.
एकूणच तांबे हे माणसाच्या दैनंदिन जीवनात खूप उपयोगी असलेले खनिज आहे. त्यामुळे त्याचा जपून आणि योग्य वापर करणे खूप महत्त्वाचे आहे.

# विंध्य पर्वतरांग

विंध्य पर्वतरांग ही भारतातील एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. ही भारतातील प्राचीन पर्वतरांगांपैकी एक मानली जाते. ही पर्वतरांग उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांना वेगळी करणारी नैसर्गिक सीमा आहे. विंध्य पर्वतरांग गुजरातपासून सुरू होऊन मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि बिहारपर्यंत पसरलेली आहे. तिची सरासरी उंची सुमारे तीनशे ते सहाशे मीटर आहे. ही पर्वतरांग हिमालयासारखी अजूनही वाढत नाही. त्यामुळे तिचे डोंगर गोलसर आणि कमी उंचीचे दिसतात. ही प्रामुख्याने कठीण खडकांनी बनलेली आहे. विंध्य पर्वतरांग म्हणजे सलग उंच डोंगर नाहीत, तर काही ठिकाणी उंचसखल जमीन आणि काही ठिकाणी सपाट माथ्याचे डोंगर यांचा समूह आहे. म्हणून काही भागांत ती पठारासारखी वाटते. विंध्य पर्वतरांगेच्या उत्तरेकडील नद्या गंगा खोऱ्याकडे वाहतात तर दक्षिणेकडील नद्या नर्मदा खोऱ्यात मिळतात. या पर्वतरांगेतून अनेक नद्या उगम पावतात. नर्मदा, सोन, ताप्ती आणि केन या नद्यांचे उगम विंध्य परिसरात आहेत. नर्मदा नदी विंध्य आणि सातपुडा पर्वतरांगांमधून वाहते आणि पश्चिमेकडे जाऊन अरबी समुद्राला मिळते. त्यामुळे या पर्वतरांगेचा जलसंपत्तीच्या दृष्टीने मोठा उपयोग होतो.



**ओळख पर्वतांची**


विंध्य पर्वतरांग परिसरात विविध प्रकारची वनसंपदा आढळते. साग, साल, बांबू यांसारखी झाडे येथे मोठ्या प्रमाणावर दिसतात. या जंगलांमध्ये वाघ, चित्ता, अस्वल, हरिण, माकड यांसारखे अनेक प्राणी राहतात. त्यामुळे हा भाग जैवविविधतेसाठी महत्त्वाचा आहे. इतिहासाच्या दृष्टीनेही विंध्य पर्वतरांग महत्त्वाची आहे. प्राचीन काळात उत्तर भारत आणि दक्षिण भारत यांमधील प्रवास या पर्वतरांगांमुळे कठीण होता. त्यामुळे संस्कृती, भाषा आणि जीवनशैली यांत फरक निर्माण झाला. अनेक राजवटींच्या सीमा विंध्य पर्वतरांगेजवळ होत्या. रामायण आणि महाभारतातही विंध्य पर्वतरांगेचा उल्लेख आढळतो.

आजही विंध्य पर्वतरांग परिसरात शेती, खाणकाम आणि वनव्यवसाय चालतो. चुनखडी, कोळसा आणि इतर खनिजे येथे सापडतात. एकूणच विंध्य पर्वतरांग ही भारताच्या भूगोल, इतिहास आणि निसर्गसंपत्तीच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे.

# बनवा ध्रुवीय अस्वल

**करून तर पाहा**

आपल्याला थोडी थंडीसुद्धा सहन होत नाही. मग बर्फाळ प्रदेशात राहणाऱ्या प्राण्यांचं काय? अंटार्टिका खंडात खूप बर्फ असतो. पेंग्विन, पोलर बेअर (ध्रुवीय अस्वल) यांसारखे प्राणी तिथे राहतात. थंडीपासून बचाव करण्यासाठी निसर्गानेच त्यांच्या शरीराची रचना विशिष्ट पद्धतीने केलेली असते. पेंग्विन, ध्रुवीय अस्वलासारखे प्राणी आपण टिव्हीवरच बघू शकतो. पण असे प्राणी तुम्ही तयार करू शकता. ध्रुवीय अस्वलाची कलाकृती साकारूया...



**साहित्य :** कार्डपेपर, कापसाचे बोळे, गम, गुगली आईज, पॉम पॉम, मार्कर

**कृती :** कार्डपेपरवर मध्यम आकाराचं वर्तुळ काढा. आता या वर्तुळाच्या वरच्या बाजूला कानांच्या जागी दोन छोटी वर्तुळं काढायची आहेत. कप किंवा छोट्या वाटीच्या मदतीने तुम्ही ही वर्तुळं काढू शकता. हे आकार कापून घ्या. आता गोल आकाराच्या कार्डपेपरवर गम लावा. गम सगळीकडे नीट पसरवून घ्या. आता तुमच्याकडचे कापसाचे बोळे घ्या. हे बोळे वर्तुळावर चिकटवायचे आहेत. गम नीट वाळू द्या. डोळ्यांच्या जागी गुगली आईज चिकटवा. नाकाच्या जागी पॉप पॉम चिकटवा. झालं तुमचं पोलर बेअर तयार.

# बना अनुवादक

जग जवळ येत आहे. शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसंच इतर कारणांमुळे लोक परदेश प्रवास करतात. आज इंग्रजीचा वापर होत असला तरी जगभरात असे अनेक देश आहेत जिथे मातृभाषेला प्राधान्य दिलं जातं. अशा देशांमधले लोक भारत किंवा इतर देशात जातात तेव्हा संवाद साधण्याचा अडसर निर्माण होतो. अनुवादक हा अडसर दूर करतो. विविध भाषा शिकून तुम्हीही या क्षेत्रात करीअर करू शकता. उत्तम अनुवादक बनण्यासाठी तुम्हाला भाषेची उत्तम जाण असायला हवी. भाषेसोबतच त्या देशातल्या संस्कृतीची माहिती असणं गरजेचं आहे. इंग्रजीसह विविध भाषांमधल्या पुस्तकांचा अनुवाद तुम्ही करू शकता. अनुवादक म्हणून पर्यटनाच्या क्षेत्रातही खूप संधी आहेत. विविध देशांमधून भारतात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांना मार्गदर्शन करण्याचं काम दुभाषा किंवा अनुवादक करू शकतो. पुस्तकांचा अनुवाद करायचा असेल तर भाषांवर पकड असणं गरजेचं आहे. मूळ लेखनाचा लहेजा कायम ठेवणं आवश्यक असतं.



**कोण होणार?**

अनुवादक म्हणून काम करताना भाषा बोलता, लिहिता आणि वाचता येण्यासोबतच धैर्य आणि स्थैर्यही गरजेचं आहे. हिंदी, इंग्रजीशिवाय इतर भाषांमधलं साहित्य तुम्ही मातृभाषेत आणू शकता. भारतात अनेकविध भाषा बोलल्या जातात. प्रत्येक राज्यात साहित्याची परंपरा आहे. हे साहित्य आपल्या मातृभाषेत आणण्याचं काम यानिमित्ताने करता येईल. परकीय भाषांमधल्या साहित्याचा अनुवादही तुम्ही करू शकता.

मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ यांसह अनेक खाजगी संस्थांमध्ये विविध भाषा शिकवल्या जातात.

# डोळे जपा

**आय केअर**

तुमच्या बऱ्याच मित्रमैत्रिणींना चष्मा लागला असेल. लहान वयात चष्मा लागण्याचं प्रमाण आजकाल खूप वाढलं आहे. तुम्ही मुलं स्मार्टफोन वापरता. लॅपटॉप, कॉम्प्युटरला डोळे लाऊन बसलेले असता. या सगळ्याचा डोळ्यांवर खूप ताण येतो. त्यामुळे डोळ्यांची काळजी घेणं सर्वात जास्त गरजेचं आहे. पोषक आहार घेऊन डोळ्यांचं आरोग्य राखता येतं. मग तुम्हीही न कंटाळता पोषक आहार घ्यायला सुरूवात करा. डोळ्यांच्या आरोग्यासाठी काय चांगलं? पाहुया...

✻ पालक, मेथीसारख्या पालेभाज्या खा. या पालेभाज्यांकडे बघून नाक मुरडू नका. पालकात बीटा केरोटिन, क जीवनसत्त्व तसंच इतर पोषक घटक असतात. या घटकांमुळे सूर्याच्या घातक किरणांपासून डोळ्यांचं रक्षण होतं.

✻ काजू, बदाम, जर्दाळूसारखा सुका मेवा आणि सूर्यफुलाच्या बियांमधून शरीराला ई जीवनसत्त्व मिळतं. हे ई जीवनसत्त डोळ्यांसाठी खूप गरजेचं असतं. ई जीवनसत्त्वामुळे डोळ्यांच्या अनेक समस्या दूर होतात. डोळ्यांचं आरोग्य उत्तम राहतं.

✻ आंबट फळांमध्ये क जीवनसत्त्व असतं. क जीवनसत्त्वामुळे डोळ्यांचे टिश्यू बळकट होतात. त्यामुळे संत्र, मोसंब, लिंबू यांसारखी फळं खा.

✻ डोळ्यांचं आरोग्य राखण्यासाठी गाजर खाण्याचा सल्ला दिला जातो. यात बीटा केरोटिन असतं. यामुळे डोळ्यांचं रक्षण होतं.

✻ लाल, पिवळ्या, हिरव्या भोपळी मिरच्या म्हणजे पोषक घटकांचा खजिना आहे. त्यामुळे त्या बाजूला काढून टाकू नका. यातल्या पोषक घटकांमुळे डोळे चांगले राहतात. दृष्टी सुधारते.



# फरक प्रिंटर्समधला

**स्मार्ट नॉलेज**

प्रिंटिंगच्या गरजा लक्षात घेऊन घरच्या घरी झटपट प्रिंट काढण्यासाठी वेगवेगळे प्रिंटर बाजारात उपलब्ध आहेत. हे प्रिंटर कॉम्प्युटर लॅपटॉपला किंवा मोबाईलला कनेक्ट करून सहज प्रिंट्स काढता येतात. प्रिंटरमध्ये लेझर आणि इंकजेट असे दोन प्रकार पहायला मिळतात. लेझर आणि इंकजेट या दोन्ही प्रकारांची स्वत:ची वैशिष्ट्य आहेत. याबाबत माहिती घेऊया...



रंगीत प्रिंटससाठी इंकजेट प्रिंटर उपयुक्त ठरतात. या प्रिंटच्या मदतीने रंगीत प्रिंटस घेता येतात. तसंच फोटोच्या प्रिंट्सही तुम्ही घेऊ शकता.तर लेझर प्रिंटरच्या मदतीने कागदपत्रांच्या प्रिंट्स घेतल्या जातात. लेझर प्रिंटरमधून काढलेल्या प्रिंटमधली अक्षरं अगदी स्पष्ट दिसतात. तर इंकजेट प्रिंटरमध्ये ती थोडी धुरकट दिसतात.

या दोन्ही प्रिंटरची काम करण्याची पद्धत पूर्णपणे वेगळी आहे. या दोहोंमध्ये वेगळ्या कार्टेजचा वापर केला जातो. लेझर प्रिंटरमध्ये टोनर कार्टेजचा वापर केला जातो. तर इंकजेटमध्ये इंक कार्टेजचा वापर केला जातो. इंकजेट प्रिंटरचा वापर तुलनेने बराच सोपा आहे. तर लेझर प्रिंटरचं तंत्रज्ञान थोडं अवघड आहे. लेझर प्रिंटरचा वापर करण्यासाठी जास्त पैसे खर्च करावे लागतात. इंकजेट प्रिंटर छोट्या जागेत अगदी सहज मावतो. तर लेझर प्रिंटरला जास्त जागा लागते. लेझर प्रिंटरचं काम झटपट चालतं. तर इंकजेट प्रिंटरला थोडा वेळ लागतो. तसंच इंकजेट प्रिंटरमध्ये सतत कागद बदलत बसावा लागतो.

इंकजेट प्रिंटरच्या तुलनेत लेझर प्रिंटर जास्त चांगल्या प्रकारे काम करतो.

# रो-रो फेरी म्हणजे नक्की काय?

**माहित आहे?**

रो-रो फेरी सेवा म्हणजे नेमकं काय, याविषयी जाणून घेऊया...
रो-रो म्हणजे रोल ऑन रोल ऑफ फेरी सेवा. गुजरातमधल्या घोघा आणि दहेज या बंदरांदरम्यान ही सेवा सुरू आहे. विशेष म्हणजे दक्षिण आशियातली ही अशाप्रकारची पहिलीच सुविधा आहे. अशी सेवा सुरू करण्याचा मान भारताला मिळाला ही बाब आपल्या प्रत्येकासाठी अभिमानास्पद म्हणावी लागेल. मध्ये समुद्र किंवा नदी असेल तर आपल्याकडचं वाहन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेता येत नाही. पण रो-रो सेवेच्या माध्यमातून वाहन बोटीवर चढवलं जातं आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेलं जातं.

गुजरातमधल्या या फेरी सेवेमुळे एका वेळी १०० पेक्षा जास्त वाहनं आणि जवळपास २५० प्रवासी बोटीतून प्रवास करू शकतील. मोठे ट्रक, गाड्या, बस अशी वाहनं फेरीमधून नेणं आता शक्य होणार आहे. घोगा हे बंदर भावनगर जिल्ह्यात आहे. तर दहेज भरूचमध्ये आहे. ही फेरी सेवा या दोन्ही जिल्ह्यांना जोडते. यापुढच्या टप्प्यात खंबातचं आखात आणि कच्छचं आखात या दरम्यानही ही सेवा सुरू करण्यात येणार आहे. शिवाय मुंबई आणि दक्षिणेतल्या इतर बंदरांनाही रो-रो फेरी सेवेच्या माध्यमातून जोडलं जाणार आहे. यामुळे वाहनांची ने-आण करणं सोपं जाणार आहे. या प्रकल्पासाठी तब्बल ६१४ कोटी रूपयांचा खर्च आला. या सेवेमुळे घोघा आणि दहेज या दोन बंदरांमधल्या प्रवासाचा वेळ वाचतो. या दोन बंदरांमुळे दक्षिण गुजरात आणि सौराष्ट्र एकमेकांना जोडले जातात. या प्रवासासाठी आठ तास लागत असत. पण फेरी सेवेमुळे हा वेळ अवघ्या एक तासावर आला आहे. या सेवेमुळे इंधन आणि वेळ या दोन्हीची बचत होते.



# फ्लू झाला तर...

**हेल्थ वेल्थ**

सर्दी,खोकला, ताप असेल तर शाळेत न गेलेलं चांगलं. हा फ्लूसुद्धा असू शकतो. फ्लू म्हणजे एन्फ्लूएंझा. हा साथीचा आजार आहे. या रोगाचे जंतू हवेच्या माध्यमातून सगळीकडे पसरतात. शिंकल्यावर तसंच खोकल्यावर हे जंतू हवेत पसरतात आणि आसपासच्या लोकांनाही फ्लू होऊ शकतो. त्यामुळे फ्लू झाल्यावर शक्यतो घरात थांबायला हवं.

कफ, घसा खवखवणं, नाक गळणं, अंग दुखणं, डोकं दुखणं, दमल्यासारखं वाटणं ही फ्लूची लक्षणं असतात. फ्लूच्या जंतूमुळे जुलाब, उलट्यांसारख्या समस्याही निर्माण होतात. फ्लू झाल्यानंतर घरी राहिल्याने या रोगाचा फैलाव रोखता येतो. तसंच आराम केल्यामुळे हा रोग लवकर बरा होतो.

सर्दी, खोकला, डोकेदुखीसारखी लक्षणं दिसत असतील तर डॉक्टरांकडे जाऊन औषधं घ्या. लक्षणं फ्लूची असली तरी तुम्हाला फ्लू असेलच असं नाही. त्यामुळे डॉक्टरांकडून तपासणी करून घेणं गरजेचं आहे. गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका. घरी थांबा. तुमच्या खोलीत आराम करा. शिंकताना, खोकताना तोंडावर हात ठेवा. आराम करा.



भरपूर पाणी प्या. पूर्ण बरं घराबाहेर जाऊ नका. औषधं वेळेवर घ्या.

# महाराष्ट्र संघ ठरला महाविजेता

## नरसिंह यादव दंगल लीग; चुरशीच्या लढतीत हरियाणाला नमवले

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अर्जुन पुरस्कार विजेते व ऑलिम्पियन नरसिंह यादव यांच्या संकल्पनेतून आणि नरसिंह फाउंडेशन तसेच नागरिक संरक्षण दल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‍नरसिंह यादव दंगल लीगफ स्पर्धेत महाराष्ट्र संघाने विजयी झेंडा फडकावला.



विलासराव देशमुख मैदान, लोखंडवाला, कांदिवली (पूर्व), मुंबई येथे झालेल्या या एकदिवसीय कुस्ती लीगमध्ये महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाब या देशातील चार बलाढ्य कुस्ती राज्यांचे संघ सहभागी झाले होते. प्रत्येक संघातून ५ पुरुष व २ महिला अशा एकूण ७ खेळाडूंनी सहभाग घेतला असून, स्पर्धेत एकूण २८ कुस्तीपटूंनी आपली ताकद आजमावली..

स्पर्धेची सुरुवात हरियाणा व पंजाब यांच्यातील चुरशीच्या सामन्याने झाली. या लढतीत हरियाणाच्या ५ कुस्तीपटूंनी विजय मिळवला, तर पंजाबच्या २ कुस्तीपटूंनी बाजी मारली. परिणामी पहिला सामना हरियाणा संघाने जिंकला.दुसऱ्या सामन्यात उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र यांच्यात रंगतदार सामना झाला. महाराष्ट्राच्या ४ कुस्तीपटूंनी विजय मिळवत संघाला आघाडी मिळवून दिली, तर उत्तर प्रदेशच्या ३ कुस्तीपटूंनी विजय मिळवला. या सामन्यात महाराष्ट्र संघ विजयी ठरला.

अंतिम सामन्यात महाराष्ट्र आणि हरियाणा आमनेसामने आले. महाराष्ट्रच्या पृथ्वीराज पाटील, रविराज चव्हाण, आदर्श पाटील, अमृता पूजारी आणि सोनाली मंडलिक या पाच कुस्तीपटूंनी शानदार विजय मिळवला, तर हरियाणाच्या अंकुश सागर दहिया आणि कुसुम दहिया यांनी आपापले सामने जिंकले. अंतिम फेरीत महाराष्ट्रने ५२ असा विजय मिळवत नरसिंह यादव दंगल लीगचे चॅम्पियनपद पटकावले.

या स्पर्धेसाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, मीरा-भाईंदर पोलीस आयुक्त निकेत कौशिक, आमदार अतुल भातळखर, आमदार संजय उपाध्याय, दुबईतील उद्योगपती काझी अब्दुल मतीन, संपत साळुंखे, माजी खासदार गोपाळ शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेते मुकेश ऋषी यांनी प्रेक्षकांशी साधलेल्या संवादामुळे मैदानात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी बोलताना आयोजक नरसिंह यादव म्हणाले, देशातील कुस्तीला नवसंजीवनी देण्यासाठी अशा लीग स्पर्धा अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. या माध्यमातून अनेक नवोदित कुस्तीपटू घडतील. मुंबई व परिसरातील प्रेक्षकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल मी मनापासून आभारी आहे.

विजेत्या महाराष्ट्र संघाला आयोजक नरसिंह यादव आणि डॉ. शिल्पी शेरॉन-यादव यांच्या हस्ते चांदीची गदा आणि नरसिंह यादव दंगल लीगची मानाची ट्रॉफी प्रदान करण्यात आली. ही स्पर्धा कुस्तीप्रेमींसाठी अत्यंत रोमांचक ठरली. सर्व संघांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले आणि संघबळाच्या जोरावर महाराष्ट्राने चॅम्पियनपदावर आपले नाव कोरले.

## महिला क्रिकेटपटू घडविण्यासाठी उपक्रम

**रायगड :** राष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने, हिमालया वेलनेसने वंडरवूमन अकॅडमी या अभिनव डिजिटल मेंटॉरशिप प्लॅटफॉर्मचा शुभारंभ केला आहे. हा उपक्रम आरसीबी महिला संघाच्या सहकार्याने राबवण्यात येत असून, देशभरातील महिला क्रिकेटपटूंना त्यांच्या आदर्श खेळाडूंशी थेट जोडण्याचे उद्दिष्ट आहे. हिमालया वेलनेस देशभरातील इच्छुक तरुण क्रिकेटपटूंना नोंदणी करण्यासाठी आमंत्रित करत असून, त्यांना १०० शिष्यवृत्तींची संधी, तसेच आरसीबी महिला खेळाडूंकडून थेट प्रेरणादायी संदेश, क्रिकेटविषयक माहिती आणि आत्मविश्वास वाढवणारे मार्गदर्शन मिळणार आहे.या लॉन्चबाबत बोलताना राजेश कृष्णमूर्ती, बिझनेस डायरेक्टर-कन्झ्युमर प्रॉडक्ट्स डिव्हिजन म्हणाले, हिमालयामध्ये आम्ही उद्देशपूर्ण आणि मोजता येणारा परिणाम देणारे उपक्रम राबवण्यावर भर देतो.

# टीम इंडिया देवदर्शनाला पद्मनाभस्वामी मंदिरात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय टीमचे खेळाडू न्यूझीलंडविरोधातील पाचव्या आणि अंतिम टी २० सामन्यासाठी तिरुअनन्तपुरम पोहचले. न्युझीलंड विरोधात सामना खेळण्यापूर्वी भारतीय क्रिकेट टीमचे खेळाडू सकाळीच प्रसिद्ध श्री पद्मनाभस्वामी मंदिरात पोहचले. त्यांनी मंदिरात पूजा केली. प्रार्थना केली. भारतीय खेळाडू हे काल तिरुअनन्तपुरम इथं पोहचले. शुक्रवारी सकाळी सव्वा नऊ वाजता हे खेळाडू मंदिरात पोहचले. यावेळी सर्वांनी मनोभावे पूजा केली. या खेळाडूंनी पद्मनाभस्वामींकडे काय मागितले हे त्यांनाच माहिती. पण हे खेळाडू अत्यंत प्रसन्न वाटत होते. सात खेळाडूंनी मंदिरात जाऊन प्रार्थना आणि पूजा केली.

टीम इंडियाच्या खेळाडूंनी मंदिरात जाण्यासाठी पारंपारिक पोशाख घातला होता. मंदिरात दर्शनासाठी कर्णधार सूर्यकुमार यादव, ऑलराऊंडर अक्षर पटेल, फलंदाज रिंकु सिंह, वरुण चक्रवर्ती सहभागी झाले होते. याशिवाय गोलंदाज कुलदीप यादव, रवी बिश्नोई, कोच टी दिलीप हे पण मंदिरात होते. या सर्वांनी मनोभावे पूजा केली. यावेळी अखेरच्या आणि निर्णायक सामना जिंकण्याची प्रार्थना केली. मंदिरात खेळाडू जवळपास अर्धातास होते. श्री पद्मनामस्वामी मंदिर हे वास्तूकलेचा अप्रतिम नमुना आहे. येथील नक्षी आणि मंदिराची स्थापत्यकला मनमोहक आहे. हे मंदिर जगभरात प्रसिद्ध आहे. हे मंदिर हिंदू धर्मियांचं एक पवित्र स्थळ आहे. दक्षिण भारतातील केरळ राज्यात हे मंदिर आहे. भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघात टी २० चा आंतरराष्ट्रीय अंतिम सामना हा शनिवारी होणार आहे.

भारत आणि न्युझीलंड यांच्यात पाचवा सामना तिरुअनन्तपुरम येथे होणार आहे. यापूर्वीचे तीन सामने भारताने जिंकले आहेत. तर एक सामना न्यूझीलंडच्या पारड्यात गेला आहे. भारताने हा अखेरचा सामना जिंकला तर मालिका भारत आघाडी घेत खिशात घालेल. या अखेरच्या सामन्यात संजू सॅमसन त्याच्या होमपिचवर कमाल दाखवण्याची शक्यता आहे. तर अक्षर पटेल हा सुद्धा दमदार कामगिरी करेल असा अंदाज आहे. विशाखापट्टणम येथे टी २० चा आंतरराष्ट्रीय सामना खेळला गेला.

त्यात भारताने प्रमुख पाच गोलंदाजांना संधी दिली होती. तर ऑलराऊंडर हार्दिक पांड्या आणि शिवम दुबे यांना गोलंदाजी दिली नव्हती. हा सामना भारताने गमावला. टीम इंडियाने अगोदरच तीन सामने जिंकले आहेत. ही मालिका जिंकली आहे.

# जिल्हास्तरीय क्लासिक स्पर्धा १ फेब्रुवारीला

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या वतीने जिल्हास्तरीय क्लासिक स्पर्धा सबज्युनिअर, जूनियर, सीनियर, मास्टर ,(पुरुष व महिला) यांची आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धा ही १ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ या वेळेत होणार आहेत.या स्पर्धेचे उद्‍घाटन रायगड जिल्ह्याचे क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्या हस्ते होणार आहे.

या स्पर्धा प्रसंगी महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव आंतरराष्ट्रीय पंच,राष्ट्रीय संघटनेचे सहसचिव शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित संजय सरदेसाई हे विशेष निरीक्षक म्हणून येणार आहेत. तसेच शिवछत्रपती पुरस्कार सन्मानित अनंत चाळके, संजय माधव, सतीश पाताडे, सनदी लेखापाल यशवंत गोळे, अध्यक्ष गिरीश वेदक, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, पनवेल तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष पंकज भगत, प्राध्यापक नवनाथ गायकर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. काही मान्यवर सदिच्छा भेट देण्यासाठी येणार आहेत.

# सबालेंका सलग चौथ्यांदा पोहोचली अंतिम फेरीत

**। मेलबर्न । वृत्तसंस्था ।**

दोन वेळा विजेतेपद पटकावणारी मानांकित अरिना सबालेंकाने एलिना स्वितोलिनाचा सरळ सेटमध्ये पराभव करत सलग चौथ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपनच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे.अंतिम फेरीत तिचा सामना एलिना रिबाकिनाशी होईल.

२०२३ च्या अंतिम फेरीतही हेच दोन खेळाडू आमनेसामने आले होते. रिबाकिनाने सहाव्या मानांकित जेसिका पेगुलाचा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

रिबाकिना म्हणाली, २०२३ मध्ये सबालेंकाविरुद्धचा सामना शानदार होता. त्यावेळी तिने माझ्यापेक्षा चांगला खेळ केला आणि विजेतेपद जिंकले.

सबालेंकाने ओपन युगात इव्होन गुलागाँग आणि मार्टिना हिंगीस यांच्यानंतर सलग चौथ्यांदा ऑस्ट्रेलियन ओपनच्या एकेरीची अंतिम फेरी गाठणारी ती तिसरी महिला खेळाडू ठरली आहे.

# रायगडच्या महिला खेळाडूंना उत्कृष्ट जिल्हा खेळाडू पुरस्कार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड कार्यालय यांचे वतीने २६ जानेवारी २०२६ रोजी विविध खेळात आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य जिल्हा स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूचा गौरव फलोत्पादन मंत्री, भरत गोगावले यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत केला.



रायगडचे क्रीडा अधिकारी प्रकाश चंद्रकांत वाघ हे नेहमीच खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. यासाठी त्यांना त्यांचे सहकारी अंकिता मयेकर, देविदास पाटील आणि संदीप गुरव, निळकंठ आखाडे, सुचिता ढमाले यांचे सहकार्य होते.

२०२२/२३, २०२३/२४ आणि २०२४/२५ साठी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक आणि दिव्यांग खेळाडू यांना पुरस्कारांनी सन्मानित केले.

त्यानुसार २०२२/२३. चा उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार पॉवरलिफ्टिंग साठी सलोनी स्मिता पद्माकर मोरे आणि पॉवरलिफ्टिंग २०२३/२४ उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार अमृता माधुरी ज्ञानेश्वर भगत या दोन महिला खेळाडूना देण्यात आला.

सलोनी मोरे हिला प्रा.नवनाथ चंद्रिका ज्ञानदेव गायकर आणि अमृता भगत हिला विक्रांत संगीता अनिल गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले आहे. यापूर्वी २०१९/२० मध्ये प्रतिक्षा सुनीता बबन गायकवाड हिला सुद्धा पॉवरलिफ्टिंगचा उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार मिळाला होता. तिला सुद्धा प्रा.नवनाथ गायकर यांनी प्रशिक्षण दिले होते.

# ‘पद्मश्रीने माझी नाराजी दूर केली’

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

खेलरत्न पुरस्कारासाठी वारंवार प्रतीक्षेत राहिल्यानंतर पद्मश्री सन्मानाने माझी सर्व नाराजी दूर झाल्याची प्रतिक्रिया दिग्गज गोलकीपर सविता पुनिया हिने व्यक्त केली.



३०० हून अधिक सामने खेळण्याचा मान मिळवणाऱ्या सविताने या सन्मानामुळे कुटुंबिय आनंदी झाल्याचे सांगितले. ती म्हणाली, कुटुंबियांनी माझे यश आणि माझा संघर्ष पाहिला आहे. मला सन्मान मिळताना पाहणे, हीच त्यांची इच्छा होती. पद्मश्री सन्मानामुळे माझा प्रवास आठवला. २००३ ला शाळेच्या शिक्षकांनी दिलेल्या माहितीनुसार वडिलांसोबत हॉकी चाचणी दिली. आई अंथरुणाला खिळलेली होती. मी स्वयंपाक करायचे तर वडील नोकरीसोबतच घरकाम करायचे. अशा परिस्थितीत मी हॉकी खेळत असे. आजही तो काळ आठवला की आई-वडिलांचे बलिदान आठवते.

# दिग्गज मनप्रीत सिंगला वगळले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय हॉकीमधील दिग्गज खेळाडूंपैकी एक आणि मधल्या फळीतील अनुभवी खेळाडू मनप्रीत सिंग याचे नाव आगामी एफआयएच प्रो लीग हंगामापूर्वीच्या वरिष्ठ पुरुष राष्ट्रीय कोचिंग शिबिरासाठी निवडलेल्या ३३ संभाव्य खेळाडूंच्या यादीत समाविष्ट केलेले नाही.

हॉकी इंडियाने गुरुवारी ही संभाव्य खेळाडूंची यादी जाहीर केली. पुढील महिन्यात राऊरकेला येथे प्रो लीगचा हंगाम सुरू होणार आहे.दोन ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या संघांचा सदस्य आणि मनप्रीत १५ वर्षांत पहिल्यांदाच शिबिरासाठीच्या संभाव्य खेळाडूंच्या यादीत स्थान मिळवू शकलेला नाही. हॉकी इंडियाचे विद्यमान अध्यक्ष दिलीप तिर्की यांच्या सर्वाधिक ४१२ आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या विक्रमाशी बरोबरी करण्यापासून मनप्रीत एक सामना दूर आहे.

राऊरकेला येथे १० ते १५ फेब्रुवारीत एफआयएच प्रो लीग सामन्यांपूर्वी १ ते ७ फेब्रुवारीदरम्यान हे सराव शिबिर आयोजित केले जाईल. या यादीत गोलकीपर कृष्ण बहादूर पाठक यालाही स्थान दिलेले नाही.

## यूपी वॉरियर्सचा दणदणीत पराभव | एलिमिनेटरच्या दोन जागांसाठी चुरस

# आरसीबीची अंतिम फेरीत धडक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

वुमन्स प्रीमियर लीग स्पर्धेच्या साखळी फेरीतील १८ व्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि यूपी वॉरियर्स हे संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात नाणेफेकीचा कौल आरसीबीच्या बाजूने लागला आणि कर्णधार स्मृती मंधानाने प्रथम गोलंदाजी स्वीकारली. यूपी वॉरियर्सने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात ८ गडी गमवून १४३ धावा केल्या. तसेच विजयासाठी १४४ धावांचं आव्हान ठेवलं आहे.



हे आव्हान आरसीबीने १३.१ षटकात पूर्ण केलं. या स्पर्धेत आठ पैकी ६ सामन्यात विजय मिळवून १२ गुणांसह आरसीबीने अंतिम फेरीत स्थान पक्क केलं आहे. तर अजूनही एलिमिनेटरच्या दोन जागांसाठी चार संघात चुरस असणार आहे. गुजरात जायंट्स, मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स हे दावेदारांपैकी एक आहेत. तर यूपी वॉरियर्सचं संपूर्ण गणित जर तर वर अवलंबून आहे.

यूपी वॉरियर्सकडून कर्णधार मेग लेनिंग आणि दीप्ती शर्मा यांना चांगली सुरूवात करून दिली. पहिल्या विकेटसाठी या दोघांनी ७४ धावांची भागीदारी केली. मेग लेनिंगने ३० चेंडूत ४१ आणि दीप्ती शर्माने ४३ चेंडूत ५५ धावा केल्या. मात्र त्यानंतर डाव पत्त्यासारखा कोसळला. एकही फलंदाज १५ धावांचा टप्पा गाठू शकलं नाही. एमी जोन्स १, हरलीन देओल १४, क्लो ट्रायन ६, श्वेता सेहरावत ७, सिम्रन शेख १०, सोफी एक्सलस्टोन ० धावांवर बाद झाले. आरसीबीकडून नदीन दी क्लार्कने भेदक गोलंदाजी केली. तिने ४ षटकात २२ धावा देत ४ गडी बाद केले. तर ग्रेस हॅरिसने २, लॉरेन बेलने १ आणि श्रेयंका पाटीलने १ गडी बाद केला.

यूपी वॉरियर्सने विजयासाठी दिलेल्या १४४ धावांचा पाठलाग करताना आरसीबीने आक्रमक सुरुवात केली. हॅरिस आणि स्मृतीने जो गोलंदाज समोर दिसेल त्याला फोडून काढलं. पहिल्या विकेटसाठी या जोडीने १०८ धावांची भागीदारी केली. ग्रेस हॅरिस ३७ चेंडूत १३ चौकार आणि २ षटकार मारून ७५ धावांवर बाद झाली. स्मृती मंधानाने २७ चेंडूत नाबाद ५४ धावांची खेळी केली. तिने ८ चौकार आणि २ षटकार मारले. जॉर्जिया वोलने १६ धावा केल्या. आता आरसीबीचा संघ थेट ५ फेब्रुवारीला जेतेपदासाठी मैदानात उतरणार आहे. त्यांना अंतिम फेरीत कोणाचं आव्हान मिळतं हे पाहणं औत्सुक्याचं ठरणार आहे.

## निवडक



### बहिष्काराच्या धमकीवरून यू-टर्न

**लाहोर :** पाकिस्तान संघ पोकळ धमक्या देत असला तरी तो आयसीसी टी-२० विश्वषचकात खेळणार आहे. त्यासाठी २ फेब्रुवारी रोजी हा संघ कोलंबोकडे प्रस्थान करेल. पीसीबीने बहिष्काराचे शस्त्र म्यान केल्याचे निष्पन्न झाले असून, १५ फेब्रुवारीचा भारत-पाक सामनादेखील पूर्वनियोजित वेळापत्रकानुसारच होईल, असे बोर्डाच्या सूत्रांनी गुरुवारी स्पष्ट केले. भारतात खेळण्याबाबत बांगलादेश क्रिकेट बोर्डाच्या सुरक्षा चिंतेला पीसीबीने पूर्ण पाठिंबा दर्शविला. त्याच वेळी आयसीसीमधील आपली स्थिती धोक्यात न घालता यापेक्षा पुढे काही करता येणार नाही.बीसीसीआय, पीसीबी आणि आयसीसी यांच्यात त्रिपक्षीय करार आहे. याअंतर्गत २०२७ पर्यंत आयसीसी स्पर्धांतील भारत- पाकिस्तानचे सर्व सामने तटस्थ स्थळी खेळवले जातील. सूत्रांनी पुढे सांगितले, विशेष बाब अशी की पाकिस्तानला विश्वचषकातील पूर्ण सामने श्रीलंकेत खेळायचे आहेत. संघ अंतिम फेरीत पोहोचला तरी अंतिम सामना तिथेच होईल. अशा परिस्थितीत स्पर्धेचा किंवा भारताविरुद्धच्या सामन्याचा बहिष्कार करण्याचा आधार काय असू शकतो? पीसीबी आपल्या सहभागाविषयी औपचारिक घोषणा करेल, अशी अपेक्षा आहे.

### पीटी उषा यांच्या पतीचे निधन

**नवी दिल्ली :** भारताची माजी धावपटू व भारताच्या ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षा पीटी उषा यांच्या पतीचं निधन झालं आहे. पीटी उषा यांचे पती व्ही. श्रीनिवासन यांचं वयाच्या ६७ व्या वर्षी आकस्मिक निधन झाले आहे. शुक्रवारी सकाळी श्रीनिवासन त्यांच्या राहत्या घरी बेशुद्ध होऊन कोसळले आणि त्यानंतर त्यांना लगेचच जवळच्या रुग्णालयात नेण्यात आलं, परंतु डॉक्टर मात्र त्यांना वाचवू शकले नाहीत आणि त्यांची प्राणज्योत मालवली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीटी उषा यांच्याशी फोनवरून संवाद साधला आणि शोक व्यक्त केला. माजी केंद्रीय सरकारी कर्मचारी असलेले श्रीनिवासन हे पीटी उषा यांच्या त्यांच्या गौरवशाली क्रीडा कारकिर्दीत सतत त्यांच्यासोबत होते. त्यांना त्यांचा आधार आणि त्यांच्या अनेक व्यावसायिक कामगिरीमागील शक्ती म्हणून ओळखलं जात असे. पीटी उषा यांनी १९९१ मध्ये श्रीनिवासन यांच्याशी लग्न केलं. या दोघांनाही विघ्नेश उज्ज्वल नावाचा मुलगा आहे. श्रीनिवासन हे केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलातून पोलिस उपअधीक्षक म्हणून निवृत्त झाले.



### जिद्दी अल्कराजची झुंजार खेळी

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ स्पर्धेतील पहिल्या सेमीफायनलमध्ये स्पेनचा युवा कार्लोस अल्कराज आणि अनुभवी जर्मन स्टार अलेक्झांडर इव्हेरेव्ह यांच्यात काँटे की टक्कर पाहायला मिळाली. टेनिस जगतातील अव्वल मानांकित कार्लोस अल्कराज याने थरारक आणि ऐतिहासिक पुनरागमन करत अलेक्झांडर इव्हेरेव्हचा पराभव केला. तब्बल ५ तास २७ मिनिटे चाललेल्या या मॅरेथॉन लढतीत अल्कराजने ६-४, ७-६ (५), ६-७ (३), ६-७(४), ७-५ असा विजय मिळवत फायनल गाठली. या सामन्यात अल्कराजला तीव्र क्रॅम्प्स आणि दुखापतीचा सामना करावा लागला. सामन्यादरम्यान त्याने उपचार घेतले, इतकेच नव्हे तर पिकल ज्यूसचीही मागणी केली होती. जवळपास साडे पाच तास चाललेल्या लढतीत जाणवणारा शारीरिक थकवा आणि वेदना सहन करत सामना हातून निसटतोय असे वाटत असताना अफलातून जिद्दीनं खेळत त्याने आपलं अधिराज्य कायम राखलं. ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धेतील दुसऱ्या सेमीफायनलमध्ये यानिक सिनर (सलग दोन वेळा विजेता) आणि नोव्हाक जोकोविच (मेलबर्नचा १० वेळचा बादशहा) यांच्यात रंगणार आहे. या दोघांमधील विजेता फायनलमध्ये अल्कराजला भिडेल. अवघ्या २२ व्या वर्षी अल्कराज करिअर ग्रँड स्लॅम पूर्ण करणारा इतिहासातील सर्वात तरुण पुरुष टेनिसपटू ठरण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

### मुंबई इंडियन्सला विजय अनिवार्य

**बडोदा :** गतविजेता मुंबई इंडियन्स संघ महिला प्रीमियर लीग ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या सामन्यात आज, शुक्रवारी गुजरात जायंट्सविरुद्ध खेळेल, तेव्हा दोन्ही संघांसाठी विजय अनिवार्य असेल. या सामन्यात चमकदार कामगिरी करत दोन्ही संघ प्ले-ऑफमधील आपले स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न करतील. गुजरातचा संघ आठ गुणांसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे आणि त्यांची निव्वळ धावगती -०.२७१ अशी आहे. गुजरातचा संघ मुंबई (निव्वळ धावगती ०.१४६) आणि दिल्ली कॅपिटल्स (निव्वळ धावगती-०.१६४) यांच्यापेक्षा दोन गुणांनी पुढे आहे. त्यामुळे गुजरातचा संघ सध्या भक्कम स्थितीत आहे. मात्र, गुजरातसाठी चिंताजनक बाब म्हणजे, त्यांनी मुंबईविरुद्ध याआधीचे आठही सामने गमावले आहेत. त्यामुळे आजच्या सामन्यातही हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील मुंबई संघाचे पारडे जड मानले जाईल. गेल्या लढतीत गुजरातने दिल्ली कॅपिटल्सवर, तर मुंबईने रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुवर विजय मिळवला होता. दिल्लीविरुद्ध मुंबईकडून नॅट स्किव्हर-ब्रंटने लीगमधील पहिल्या शतकाची नोंद केली. हेली मॅथ्यूजने गोलंदाजीत तीन बळी मिळवले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)